म. ग्रं. सं. ठाणे.
विषय



# क्रांतीनंतरचा क्युबा

माधव गडकरी

REFBK-0024201

श्रीविद्या प्रकाशन

संदर्भ भू प्रवास
६८७
24209
१४।६।९४

# क्रान्तीनंतरचा क्युबा

[अमेरिकेच्या परिसरातील एक छोटं राष्ट्र]

माधव गडकरी

REFBK-0024201

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

प्रकाशक
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

© सौ. कुन्दा गडकरी, मुंबई

प्रकाशनकाल : प्रथमावृत्ती
१० जानेवारी १९८४

मुखपृष्ठ : कमल शेडगे

मूल्य : पंचवीस रुपये

मुद्रक
चि. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
' शिव पार्वती '
सदाशिव पेठ, टिळक रोड
पुणे ४११०३०

जिच्या निरपेक्ष प्रेमाने
व आशीर्वादाने
सारे मला लाभले
त्या माझ्या नुकत्याच
दिवंगत झालेल्या
आईस –

# मनोगत

परदेश प्रवासाचे योग माझ्या आयुष्यात अचानक येतात व पंधरा दिवसाच्या तयारीने मी अनेक परदेश-यात्रा केल्या भारत क्युबा सांस्कृतिक करारानुसार भारतातील दोन भाषिक वृत्तपत्रांच्या संपादकांना क्युबाला पाठविण्याची योजना भारत सरकारने आखली होती त्यानुसार मला निमंत्रण आले व क्युबाची सफर घडली भारत सरकारने न्यूयॉर्कमार्गे क्युबाचे जाण्या-येण्याचे विमान-तिकीट दिले व त्या देशात उतरल्यापासून सर्व व्यवस्था फिडेल कॅस्ट्रो याच्या सरकारची होती, आणि ती त्यांनी उत्तम ठेवली. क्युबातील माझे वास्तव्यही तसे बेताचे होते, परंतु १९५९ साली फिडेल कॅस्ट्रो व चे गुव्हेरा या दोघांनी तेथे क्रान्ती घडवून आणल्यानंतर गेल्या २५ वर्षांत त्यांनी कोणते बदल घडवून आणले हे मला पाहावयाचे होते पाश्चात्त्य व कम्युनिस्ट दोन्ही विचारप्रणाली अनुसरणाऱ्या देशात मी नेहमी जात आलो त्या देशात जाताना पूर्वग्रहाचा चष्मा लावून मी जात नाही साम्यवादी राष्ट्रात गेलो की तुमच्याकडे वृत्तपत्र व व्यक्तिस्वातंत्र्य कुठे आहे म्हणून त्यांना छेडत बसत नाही. त्याचप्रमाणे अमेरिकेत गेलो की, त्या भांडवलशाही झगझगाटाने मी दिपूनही जात नाही या सर्व पोथीनिष्ठ तत्त्वप्रणालींना मर्यादा आहेत व देशपरत्वे त्यांचे स्वरूप बदलते असा माझा अनुभव आहे.

क्युबा हे अमेरिकेच्या परसातील अगदी छोटे राष्ट्र आपण अमेरिकेच्या मागील अंगणात आहोत याचे भान फिडेल कॅस्ट्रोंनी ठेवले आहे व त्याप्रमाणे जमिनीची व घराची खाजगी मालकी पूर्णतः नष्ट केलेली नाही त्याचा सर्व तपशील या पुस्तकात दिला आहे त्याचबरोबर अमेरिकेने जरा सबुरीने घेतले असते व बे ऑफ पिग्जची घटना घडली नसती तर क्युबा आजच्याइतका रशियाचा अंकित झाला नसता तटस्थ राष्ट्रांच्या दिल्लीतील परिषदेपासून ग्रेनेडाच्या आक्रमणापर्यंत कॅरिबियन समुद्रातील बेटाची कथा या पुस्तकात सांगितली आहे. शेवटी ग्रेनेडाच्या विशपला अधिक डाव्यांनी ठार केले व अमेरिकेला

आक्रमणाची संधी दिली सहजीवनाचा विचार यामधून रुजायला हवा, परंतु तो बड्या राष्ट्रांच्या राजकारणामुळे कसा रुजत नाही याचे विवेचन या पुस्तकात आहे

मराठीमध्ये परदेशावरील प्रत्यक्ष भेटीवर आधारित राजकीय पुस्तके कमी आहेत 'माओनतरचा चीन' नतर हे दुसरे साम्यवादी राष्ट्रावरील माझे पुस्तक प्रसिद्ध होत आहे दोन्ही पुस्तके श्रीविद्या प्रकाशनच्या श्री मधुकाका कुलकर्णी यानी काढली. विविध देशात जे नवे प्रयोग होत आहेत, किंबहुना आपल्या देशाचा विकास घडवून आणण्यासाठी जे प्रयत्न केले जात आहेत ते वाचकापुढे पुढे ठेवावेत व आपल्याही देशाची प्रगती आपण वेगाने घडवून आणली पाहिजे असे त्याना जाणवावे, या उद्देशाने हे लिहिले आहे आम्ही साखरेतून राजकारणाचे डाव खेळतो, क्युबा अर्थकारणाचे खेळतो हे छोटेसे पुस्तक अभ्यासू वाचकाना आवडेल याची खात्री वाटते आवडले तर त्याचे श्रेय प्रकाशक मधुकाका कुलकर्णी याचे आहे

या पुस्तकातील सर्व लेख 'मुंबई रविवार सकाळ'मधून प्रसिद्ध झालेले नाहीत. काही नवे आहेत तर काहींचे पुनर्लेखन केले आहे. 'सकाळ' संस्थेच्या संचालकाचे पाठबळ मला नेहमीच मिळाले त्याचा मी आभारी आहे

कल्पना मुद्रणालयाचे श्री चिं. स लाटकर याच्या छपाईच्या कोंदणात माझी बहुतेक पुस्तके आतापर्यंत मिरवली त्याची मैत्री हा आयुष्यातील योग आहे त्याचेही मी आभार मानतो


दि १ जानेवारी १९८४ रोजी क्युबात क्रान्तीचा रौप्यमहोत्सव साजरा झाला असेल त्या सुमारासच हे पुस्तक प्रसिद्ध होत आहे दिल्लीत मार्च १९८३ मध्ये भरलेल्या तटस्थ राष्ट्र परिषदेमुळे क्युबा-भारत मैत्री हा विषय दूरदर्शनच्या माध्यमातून घरोघर गेला त्या सर्व घटनाचा अर्थ समजून घेण्यास हे पुस्तक उपयोगी पडो हीच इच्छा

दि. २ जानेवारी, १९८४

– माधव गडकरी

# अनुक्रमणिका



| | | |
|---|---|---|
| १ | क्युबाकडे प्रयाण | १ |
| २. | क्युबाचे राजकीय अतरग | १० |
| ३ | परिवर्तनशील शेतकऱ्याचे क्युबा | २२ |
| ४ | साखरेचा देश क्युबा | ३२ |
| ५. | क्युबाची सहावी संवेदना | ४० |
| ६ | पिकादुरा खोऱ्यातील एक सफर | ४८ |
| ७. | एक पायोनियर्स कॅम्प | ५७ |
| ८. | नॅशनल ॲसेम्ब्ली व वृत्तपत्रे | ६२ |
| ९. | क्रांतीचा बुलंद नेता कॅस्ट्रो | ७१ |
| १० | स्वातंत्र्याकडून तटस्थतेकडे | ८२ |
| ११. | तटस्थ राष्ट्रांची दिल्ली परिषद | ९२ |
| १२ | ग्रेनेडातील आक्रमण | १०० |





क्रान्ती युध्दातील फिडेल कॅस्ट्रो



तरुणपणीचा फिडेल कॅस्ट्रो




क्युबाच्या क्रान्तीचा आद्य नेता ओसे मार्टी याचे राजधानी हवाना येथील स्मारक फिडेल कॅस्ट्रो तेथे भाषण करताना.




हवाना येथील ऐतिहासिक किल्ला मोरो कॅसल, एकेकाळी येथे स्पेनचा झेंडा लागला नंतर अमेरिका व क्युबाचा नंतर फक्त क्युबाचा.




हवाना विद्यापीठाची ही इमारत क्रान्तीकारक तरुणाची ही गंगोत्री



क्युबा म्हणजे साखरेचा देश. एका साखर कारखान्याचे विहंगम दृश्य. कारखान्याचे नाव '३० नोव्हेंबर साखर कारखाना'. ३० नोव्हेंबरला १९५६ मध्ये कॅस्ट्रोने क्युबाच्या भूमीवर क्रान्तीसाठी पाऊल ठेवले त्याचे हे कृतीशील स्मारक



सिन फियागो येथील अत्याधुनिक खत कारखाना




दूरदूरच्या वाड्या मोडून झोपड्यात राहणाऱ्या शेतकऱ्यांना एकत्र आणणारी ही आधुनिक वसाहत. अशा असंख्य वसाहती क्यूबात बांधल्या जात आहेत



त्या पैकी एका घरात फिडलचा मोठा भाऊ रमॉन गप्पा मारीत बसला आहे



क्युबाचा चिरुट जगभर जातो त्याचो ही तबाखू



शेतीची यंत्रे तयार करणारा कारखाना



क्युबात अनेक सुरेख समुद्रकिनारे आहेत सान्ता मारिना किनाऱ्यावर आलेले कॅनडाचे पर्यटक



आणि हे तुफानी लोकनृत्य




नवी दिल्लीतील विज्ञान भवनात भरलेल्या तटस्थ राष्ट्र शिखर परिषदेत क्युबाचे राष्ट्राध्यक्ष फिडेल कॅस्ट्रो ७ मार्च, १९८३ रोजी भाषण करतानाचे छायाचित्र




क्युबाचा राष्ट्रीय ध्वज हवानाच्या मंत्रालय चौकात फडकत असातानाचे छायाचित्र




तिकीट




कोलबसाने शोधलेला क्युबा.




२८ ऑक्टोबर १४९२ रोजी कोलबसाने क्युबा बेट जगाच्या दृष्टीने शोधून काढले. महाराष्ट्रापेक्षा पुष्कळच व तामिळनाडू ह्या प्रातापेक्षाही थोडा लहान असा हा चौदा प्राताचा देश आहे क्षेत्रफळ ११०९२२ चौ. कि. मीटर्स. लोकसख्या एक कोटी. बेटाची लाबी १२०० कि. मीटर्स. जास्तीत जास्त रुदी २९० किलो मीटर्स ग्रेनेडा त्रिनिदादजवळ आहे

१

# क्युबाकडे प्रयाण

भारत सरकारच्या परराष्ट्रखात्याकडून एक दिवस ' अर्जंट ' लखोटा आला. मागोमाग टेलिफोन्स आले.

" तुम्ही क्युबाला जाण्यास तयार आहात काय ? "

" क्युबा आणि बल्गेरियाला दोन संपादकाना आम्हाला पाठवायचे आहे. तुम्ही कुठे जाऊ इच्छिता ? "

मी क्युबाची पसती कळविली. एक महिन्याने अलिप्त राष्ट्रांची शिखर परिषद दिल्लीत आहे, आधीची क्युबात भरली होती, हे सर्व विचारात घेऊन मी क्युबाची निवड केली. दि. ४ फेब्रुवारी रोजीच मला जाण्यास ते सागत होते. परंतु त्या दिवशी अंबाजोगाई येथे साहित्य समेलन होते. म्हणून आठ दिवस दौरा पुढे ढकलून घेतला. भारत सरकारचीही तयारी नव्हती. त्याची फाइल कुठेतरी पडलेली होती. सर्व सोपस्कार होऊन क्युबाला जाण्यासाठी दि. १२ फेब्रुवारी १९८३ रोजी रात्री दोन वाजता दिल्लीच्या पालम विमानतळावर गेलो.

दुसरे सपादक श्री. व्ही. पी. रामचद्रन् हे माझ्याबरोबर होते. केरळमधील ' मातृभूमी ' दैनिकाचे ते सपादक. केरळमध्ये त्रिवेंद्रम, कोचीन व कालिकत अशा तीन ठिकाणाहून हे दैनिक निघते. भाषिक पत्राना महत्त्व देण्याच्या विकसनशील देशाच्या धोरणामुळे आमची निवड झाली होती. भारत-क्युबा सास्कृतिक करारान्वये आमची ही भेट आयोजित करण्यात

आली होती. विमानाचे तिकीट भारत सरकारने काढले होते व क्युबात उतरल्यावर आम्ही त्यांचे पाहुणे होतो. दिल्ली-न्यूयॉर्क-मेक्सिको-हवाना-न्यूयॉर्क- दिल्ली अशी एअर इंडियाची तिकिटे घेऊन दोन संपादक पालम विमानतळावर आले. दि. १२ फेब्रुवारी १९७९ रोजी मी मुंबईहून पीकिंगला गेलो होतो. दि. १३ फेब्रुवारी १९८३ रोजी दुसऱ्या कम्युनिस्ट देशाकडे—क्युबाकडे मी निघालो होतो.

माझ्याआधीच श्री. रामचंद्रन् तेथे पोहोचले होते व वाईट चेहरा करून उभे होते.

" मला ते जाऊन देत नाहीत ! " ते म्हणाले.

" का, काय झाले ? " मी विचारले.

" अमेरिकेचा व्हिसा नसल्यामुळे ते मला उतारू म्हणून स्वीकारायलाच तयार नाहीत ! " श्री. रामचंद्रन् म्हणाले. न्यूयॉर्कच्या दृष्टीने आम्ही खरे 'ट्रान्झिट' पॅसेंजर्स होतो. हे सर्व एअर इंडियाच्या अधिकाऱ्यांना सांगून पाहिले, परंतु काही उपयोग झाला नाही. माझ्याकडे अमेरिकेचा व्हिसा होता. मुंबईत माझे मित्र डॉ. ए. जी. कुलकर्णी यांच्या सहकार्याने व अमेरिकन कौन्सिलने स्वत: लक्ष घातल्याने एक दिवसात तो मला मिळाला होता. श्री. रामचंद्रन् यानाही मिळाला असता. पूर्वतयारीसाठी आम्ही दोन दिवस दिल्लीत होतो. परंतु " कशाला हवा " असा प्रश्न ते स्वतःच करीत राहिले व शेवटी अडचणीत आले. आपण न्यूयॉर्क विमानतळावर तात्पुरता व्हिसा मिळवू असे मी त्यांना सुचविले. परंतु ते धोका पत्करण्यास तयार नव्हते ते रात्री परत घरी गेले व पहाटे साडेचार वाजता एअर इंडियाच्या विक्रमादित्य या नावाला साजेशा जम्बोमध्ये मी एकटाच चढलो.

विमानात शिरलो व समोर पाहिले तर कपिलदेव बसलेला ! भारतीय क्रिकेट संघ त्याच विमानाने वेस्ट इंडिजला निघालेला होता व आश्चर्य असे की, हे खेळाडू ज्या जागांवर बसले होते तेच सीटचे क्रमांक दिल्लीहून चढलेल्या माझ्यासारख्या काही प्रवाशांना दिलेले होते. त्यामुळे झोपेने पेंगलेल्या आमच्या कसोटीवीरांना कसे उठवायचे व जागा कशा मिळवायच्या असा प्रश्न निर्माण झाला व एअर इंडियाच्या कर्मचाऱ्यांची पहिली कसोटी सुरू झाली.

एका उतारूने आपली जागा मागण्याचा प्रयत्न केला. बसलेला उतारू उठला व उभा राहिला पलीकडे त्याची पत्नी बसलेली होती. लहान मुलगी जवळ होती. तो मोहिंदर अमरनाथ होता परंतु मोहिंदर जराही रागावला नाही. तो मोहिंदर आहे हे कळताच दिल्लीकर उतारूने आग्रह सोडला. शेवटी मोहिंदर सहकुटुंब एक्झिक्युटिव्ह क्लासमध्ये बसण्यास गेला.

कपिलदेवाची स्वारी युगांडाच्या इदी अमिनच्या थाटात होती. रंगीत, पट्टेरी डिझाइन्सची सिल्कची लुंगी त्याने गुंडाळली होती व अंगात राखाडी रंगाचा खूप मोठा सिल्कचा झब्बा घातलेला होता. त्याचे एकट्याचेच शरीर आडदांड वाटले. बाकीचे सर्व सडपातळ आहेत. दिवसभर मग हे सर्व भोवती वावरत होते व त्यामुळे प्रवासातील तो दिवस कुठे गेला हे कळलेच नाही

त्यात दुबईला सकाळी विमान थांबले. त्या वेळी माझ्या घड्याळात आठ तर दुबईला सकाळचे सात वाजले होते. क्रिकेटपटू उठले, परंतु उतरले नाहीत. दरवाज्यातच हवा खात थांबले. परतु किरमाणी मात्र उतरून गेला व प्रवाशाचा पहिला लोंढा परत आला, त्यात किरमाणी दिसेना. तेव्हा मॅनेजर ' किरमाणी–किरमाणी ' करू लागले. किरमाणी आला नाही तर विकेट कीपिंग कोण करणार याची थट्टा सुरू झाली. किरमाणीच्या डोक्यावर एक केस नाही व दाढी मात्र वाढलेली. त्यामुळे तो दिसतोही विचित्र. सर्वांत उत्साही तो दिसला. विशेषत' हवाई सुंदरींशी तो क्रिकेटबद्दल सारखा बोलत होता. माझ्यासमोरच किरमाणी एका हवाई सुंदरीला घेऊन बसला व त शेवटी असा कॅच औट कसा होतोस, असे ती त्याला विचारत होती. सध्या त्या हवाई सुदरीनेच त्याचा झेल घेतलेला दिसला.

गावसकर त्याना निरोप देण्यासाठी मुंबई विमानतळावर आला होता असे कळले. परतु गावसकर या दौऱ्यात दुसऱ्या कसोटीपासून तरी सामील होणार का, याबद्दल सर्वजण साशंक दिसले. कपिलदेव कर्णधार कसा झाला या विषयावरच निघण्यापूर्वी दिल्लीत आम्ही बोलत होतो. तेव्हा विमानात हे सर्व भेटतील अशी कल्पना नव्हती. गावसकरच्या विरुद्ध वेदीने हे सर्व घडवून आणले, त्यास दिल्लीतील इंग्रजी वृत्तपत्राच्या दोन क्रीडा-प्रतिनिधींनी गावसकरविरुद्ध पद्धतशीर आघाडी उघडून साहाय्य केले

असे कळले ते खरे दिसते. मुंबईचे वर्चस्व नष्ट करायचे व पंजाबचे खेळाडू संघात अधिक आणायचे असा प्रांतीय संघर्षही त्यात आहे. खेळातही राजकारण आहे. त्यात मंत्री श्री. साळवे हे गावसकरच्या विरुद्ध गेले अशी माहिती विमानात मिळाली. भारतीय संघातील खेळाडूंना मिळणारे पैसे हे त्यांच्या सीनियॉरिटीप्रमाणे मिळावेत ही जी मागणी गावसकरने केली त्यास खेळाडूंचाही विरोध आहे.

गावसकरशिवाय चाललेल्या भारताच्या क्रिकेट संघाबरोबरच मीही न्यूयॉर्कला उतरलो

पांढऱ्या शुभ्र बर्फाने आच्छादलेल्या न्यूयॉर्कमध्ये दि. १२ फेब्रुवारी रोजीच न्यूयॉर्क वेळेप्रमाणे सायंकाळी ६–३० वाजता मी उतरलो. अमेरिकेचे घड्याळ भारतापेक्षा १३ तासांनी मागे असल्यामुळे ज्या दिवशी आपण निघतो त्याच दिवशी न्यूयॉर्कला पोहोचतो. पत्रकार जेथे जातो तेथे बातमी घडते असे नेहमी होत नाही. सायंकाळी साडेचार वाजताच आमचे विमान राजमान्य राजश्री ' विक्रमादित्य ' न्यूयॉर्क शहरावर येऊन पोहोचले होते. परंतु तासभर घिरट्या घालीत राहिले. विमान उतरविण्यासाठी धाव-पट्टीच मिळत नाही, असे कॅप्टन सांगत होता. तासाभराने विमान उतरले तर विमान ' पार्क ' करण्यासाठी जागा मिळेना. शेवटी पाऊण तासाने विमान ' किनाऱ्याला ' लागले व आम्ही बाहेर आलो तेव्हा कळले की, दोन दिवस न्यूयॉर्कचा हा सुप्रसिद्ध केनेडी विमानतळ हिमवर्षावामुळे बंद होता. गेल्या २८ वर्षांनंतर प्रथमच इतका हिमवर्षाव न्यूयॉर्कवर झाला होता. विमानातून आम्हाला तर सर्वत्र बर्फच दिसत होते परंतु हे हिवाळ्यामुळे असावे असे मी धरून चाललो होतो.

' विक्रमादित्य ' हे दि. १२ रोजी केनेडी विमानतळावर उतरलेले फक्त दुसरे विमान होते. त्याआधी ' लुफ्तान्सा 'चे एक विमान उतरले. परंतु त्यांनाही पाच तास विमानतळाच्या एका कोपऱ्यात बर्फ साफ करून मार्ग तयार होईपर्यंत थांबावे लागले. दोन दिवसात विमाने न गेल्यामुळे शुक्रवारपासून येथे आलेले सर्व प्रवासी न्यूयॉर्कमध्ये अडकून पडले होते. हॉटेल्स भरून गेली होती. रस्ते बर्फाने व्यापल्यामुळे मोटारी धावत नव्हत्या. बर्फात पुरल्या गेलेल्या मोटारी जागोजागी दिसत होत्या. शाळा-

कॉलेजाना सुटी दिलेली होती. जगातील एक मोठे धावणारे शहर बर्फा-खाली बुडून गेले होते.

बर्फाच्या इतक्या राशी मीही पूर्वी पाहिल्या नव्हत्या. दि. १४ फेब्रुवारी उजाडला, परंतु सूर्यनारायणाने काही दर्शन दिले नाही. सायंकाळी ६–३० वाजता विमान आल्याने सहा वाजताचे मेक्सिकोचे विमान चुकले अशा समजुतीत मी होतो. परंतु ते उडूच शकले नव्हते. त्यामुळे एका भव्य इंटरनॅशनल हॉटेलमध्ये एअर इंडियाने मला आणून सोडले. येथे हॉटेलात प्रवेश मिळविण्यासाठी रांगा लागल्या होत्या. दोन-दोन तास रांगेत लोक उभे होते. टेलिफोन्स बिघडलेले होते. एकच टेलिफोन चालू होता व तेथेही रांग होती. कर्मचारी न आल्यामुळे जे आले होते ते रात्रंदिवस काम करून थकले होते. "असा हिमवर्षाव आम्ही कधी पाहिला नव्हता," असे प्रत्येकाच्या तोंडी होते. बर्फाला इंग्रजी शब्द 'आइस्' हा वापरणे चूक आहे. येथे 'स्नो' हा शब्द उपयोगात आणला जातो. न्यूयॉर्कच्या इतिहासात गेल्या २८ वर्षांत न आलेले 'स्नो स्टॉर्म'— हिम-वर्षाव मला प्रत्यक्ष पाहावयास मिळावयास हवा होता असे वाटले. परतु वादळ थांबले म्हणून तर विमान उतरले. सबंध शहर त्या वादळाच्या छायेत पांढऱ्याशुभ्र चादरीखाली विसावावे तसे झोपलेले होते.

सकाळी उठताच जाडजूड 'न्यूयार्क टाइम्स' विकत घेतला. हवामान खात्याच्या लहानशा चुकीमुळे या वादळाचे अदाज कसे चुकले व इतके मोठे हिमवादळ येते आहे याचा अदाज कसा देता आला नाही, यावर जोरदार चर्चा व बातमीपत्रे 'न्यूयार्क टाइम्स'ने प्रसिद्ध केली आहेत. कॉम्प्युटरच्या जगात आघाडीवर असलेल्या या अत्याधुनिक देशालाही निसर्गाने चकविले होते.

ज्या शुक्रवारी हे हिमवादळ झाले, त्या दिवशी सकाळी पाच वाजता हवामान खात्याने असे जाहीर केले की, चार ते आठ इंच इतके बर्फ शहर व आजूबाजूच्या भागात पडेल. हा अदाज वर्तविल्यानतर ४५ मिनिटानी वादळ प्रत्यक्ष आले. हिमवर्षाव होऊ लागला तरी सहा इचापेक्षा बर्फ अधिक साचणार नाही, असा पुकारा हवामान खात्याने केला लाँग आयलंडमध्ये १० इच बर्फ साचेल असा अदाज त्यांनी दिला. प्रत्यक्षात न्यूयॉर्कच्या सेंट्रल पार्कमध्ये १७·६ इच बर्फ साचला, तर केनेडी विमान-

तळावर २२ इंच इतके बर्फाचे थर जमले. बोस्टनमध्ये असेच सहा इंच बर्फ साचेल हा अंदाज दिला होता तर तेथे १४ इंचाच्या हिमभिंती उभ्या राहिल्या. एका लहानशा चुकीमुळे हा अंदाज फसला असे हवामान खात्याने आता मान्य केले आहे. न करून काय करतील? हे हिमवादळ अमेरिकेच्या किनाऱ्यावर आदळून समुद्रात निघून जाईल असा अंदाज होता. त्याऐवजी ते १०० ते १५० मैलावर थांबून राहिले. वादळ येत आहे हे हवामान खात्याने सांगितले. परत जाईल असे गृहीत धरले, परंतु तसे सहजपणे ते गेले नाही. ते रेंगाळले व न्यूयॉर्क शहर हिममय केले.

वॉशिंग्टनमध्येही १६.६ इंच बर्फ साचले तर तेथील विमानतळावर २२.८ इंच म्हणजे केनेडी विमानतळाइतकेच बर्फ जमले. याचा परिणाम सर्व वाहतूक थांबण्यात झाला. बर्फाचा निचरा कसा होतो, तोही या वेळेस पाहावयास मिळाला. इंग्रजी चित्रपटात बर्फाच्या राशीतून काळ्या आकृती चालत येताना आपण पाहतो, ते दृश्य तेथे सर्वत्र होते. बर्फात अडकल्याने बंद पडलेल्या मोटारी ओढून नेणे हेच मुख्य काम चालले होते. न्यूयॉर्क-न्यूजर्सी यामधील लिंकन टनेलमधून रोज एक लाख मोटारी जातात, तो बोगदा वाहतुकीस खुला केलेला नव्हता.

या चुकाबद्दलचे वृत्त देताना एकदा खूप तयारी केली व ती कशी फुकट गेली हेही दिले आहे. गेल्याच महिन्यात न्यूयॉर्कवर खूप मोठा हिमवर्षाव होणार असा अंदाज हवामान खात्याने दिला. ८ ते १२ इंच बर्फ साचेल हा अंदाज होता परंतु वादळाने १०० मैल उत्तरेलाच [illegible]

शेवटी हवामान खात्याचा तज्ज्ञ म्हणतो, "असे हिमवादळ १०० वर्षांतून एकदाच येते. त्याचा अंदाज लागत नाही, हे त्याचे वैशिष्ट्य असते!" निसर्गाविरुद्धच्या लढाईत माणूस अजून पराभूत आहे हेच त्याने मान्य केले.

अशा समृद्ध अमेरिकेला पराभूत करणाऱ्या क्युबाकडे मला जायचे होते. अमेरिकेचे क्युबाबरोबरचे संबंध इतके वाईट की, न्यूयॉर्कहून हवानाला सरळ जाण्याची सोयच नाही. म्हणून न्यूयॉर्कहून मेक्सिकोला जायचे मी ठरविले होते. अमेरिकेचा व्हिसा असल्यामुळेच मी रात्री न्यूयॉर्क शहरातील

हॉटेलात राहू शकलो व नंतर लक्षात आले की, तो असल्यामुळेच मेक्सिकोचा व्हिसा नसतानाही मला पॅन अमेरिकन कंपनीने आपल्या विमानात चढू दिले. क्युबाला त्याच वेळी साखर-तंत्रज्ञाची जागतिक परिषद होती. त्यासाठी भारतातून साखर-व्यवसायातील नामवंत मंडळी क्युबाकडे निघाली होती. परंतु अमेरिका-क्युबा शत्रुत्वामुळे प्रत्येकाला हवानाला पोहोचताना त्रास होत होता. महाराष्ट्रातील एका प्रतिनिधीला मेक्सिकोचा व्हिसा नाही म्हणून न्यूयॉर्क-मेक्सिको विमानात घेतले नाही. मला प्रवेश मिळाला व पॅन अमेरिकन विमानाने सकाळी ११ वाजता मेक्सिकोच्या दिशेने झेप घेतली.

कुठे न्यूयॉर्क–कुठे मेक्सिको ! मेक्सिको मध्य अमेरिकेत येते. उतरलो तेव्हा रात्र झाली होती. एकटाच होतो. ' व्हिसा नाही,' असे म्हणताच तेथील अधिकाऱ्याने मला आत नेले. पॅन अमेरिकन कंपनीच्या अधिकाऱ्याने एक फॉर्मवर सही केली. माझा पासपोर्ट काढून घेतला. दुसऱ्या दिवशी मी हवानाला जाणार या आश्वासनावर त्यांनी बाहेर जाण्यास अनुमती दिली. परदेश प्रवासात पासपोर्ट कुणाच्या हवाली करू नये हा मुख्य नियम. परंतु इलाज नव्हता. दुसऱ्या दिवशी हवानाला जाणारे विमानही नव्हते. मग दोन रात्री मी मेक्सिकोत मुक्काम केला मेक्सिको शहर पिंजून झाले. सर्वत्र भटकत राहिलो व एअर मेक्सिकन विमानाने निघालो.

पासपोर्ट परत मागण्यासाठी गेलो. तो अधिकारी म्हणाला, " विमानात मिळेल " विमानात बसलो. पासपोर्ट मागितला. स्टुअर्ड म्हणाला, " चिंता करू नका. पासपोर्ट माझ्याकडे आहे. मेक्सिकोची हद्द संपेल तेव्हा मिळेल."

स्वस्थ बसलो एकदम विमान खाली आले. मला वाटले क्युबा आले. मी सावरून उठू लागलो, तर शेजारचा प्रवासी म्हणाला, हे मेक्सिको देशातील शेवटचे हद्दीवरचे गाव आहे. आम्ही खाली उतरलो. चहा घेतला. परतताना तो स्टुअर्ड उभा होता. त्याने पासपोर्ट दिला.

विमानात आलो. आता नक्कीच क्युबाला आलेलो होतो मेक्सिकोतील भारतीय वकिलातीने, या विमानाने मी येत असल्याचा निरोप हवानातील भारतीय वकिलातीला दिला होता. त्यांनी क्युबाच्या परराष्ट्र खात्याला दिला होता. हवानाजवळ विमान पोहोचले तेव्हा आकाश अंधारत आलेले

होते. थोडा प्रकाश होता. नारळाची झाडं डोलताना दिसत होती. मनात आले, पुन्हा गोव्याला तर विमान उतरत नाही !

आणि ती क्युबाची राजधानी हवाना होती. विमानाच्या खाली जिन्याशी माझ्या स्वागताला क्युबन अधिकाऱ्याबरोबर श्री. रामचंद्रन् उभे ! त्यांना पाहून मला कमालीचे आश्चर्य वाटले. पालम विमानतळावरून त्या रात्री परत गेलेले श्री. रामचंद्रन् माझ्या एक दिवस आधी क्युबात पोहोचले होते. दुसऱ्या दिवशी त्यांनी मंत्र्यांना मध्यस्थी घातले. एअर इंडियाचे तिकीट बदलले व ते प. जर्मनीत फ्रँकफुर्टला आले, व तेथून रशियन विमानाने हवानाला आले. फ्रँकफुर्ट-हवाना हा प्रवास १२ तासाचा व कंटाळवाणा होता, परंतु ते आधी पोहोचले. माझा न्यूयॉर्कमध्ये एक व मेक्सिकोत एक असे दोन दिवस वाटेत गेले होते. दुसऱ्या दिवशी श्री. बाळासाहेब विखे पाटील हवानात भेटले. ते तर माद्रिदहून—स्पेनहून आले होते. मुंबईहून लंडन, लंडनहून माद्रिद व माद्रिदहून हवाना !

याचे कारण काय ? आमच्या परसात कम्युनिस्ट राष्ट्र निर्माण झाले तेथे तुम्हाला सहजपणे आम्ही पोहोचू देणार नाही हा अमेरिकेचा निर्धार ! अमेरिकेतील मियामीचा किनारा हा तर हवानापासून ९० मैलावर आहे. न्यूयॉर्कहून हवानाला आम्ही चार तासात जाऊ शकलो असतो. परंतु नाही ! भांडवलशाही राष्ट्र अमेरिका, प्रचंड मोठी अमेरिका, भारतापेक्षा आकाराने तिप्पट अशी अमेरिका आणि त्याच्या अंगणातील, तामीळनाडू प्रांतापेक्षा आकाराने कमी असे क्युबा याच्या संघर्षाचा इतिहासच मग संपला असता. भवितव्यता शांततेचे गीत गात बसली असती. हा विचारसंघर्ष पाहायला आलो होतो. क्युबा सरकारच्या वतीने श्री. फर्नांदो. एन. गार्सिया रिअर्को आले होते. एक दुभाषी होती. तिचे नाव नान्सी. ती म्हणाली, " तुमचे विमान येण्यापूर्वीच येथे एक मोठे वादळ झाले. काही झाडेही पडली ! "

" आता काही होणार नाही. कारण मी येऊन पोहोचलो आहे ! " मी थट्टेने म्हटले

पाऊसही पडल्याने हवानातील हवा सुखद बनली होती. अमेरिकेने क्युबा सोडताना आपल्या मर्सिडिज गाड्याही सोडल्या. त्यांपैकी एक आमच्या

सेव्हेला तिथे आली होती. हवानाच्या विमानतळाचे नाव ' ओसे मार्टी एअरपोर्ट.' मर्सिडिज गाडी, आणि आम्ही तिघे यांचा हा प्रवास या विमान-तळापासून सुरू झाला तो दहा दिवस चालला. आपले जीवन आपण घडवू या निर्धाराने काम करणाऱ्यांचा देश पाहण्यास मी निघालो होतो.

# २

oooooooooooooooooooooooooooooooooooooo

## क्युबाचे राजकीय अंतरंग

क्युबा कसा आहे, हा प्रश्न प्रत्येक वाचकाच्या मनात असेल. आयर्लंड हे बेट अटलांटिक महासागरात ज्याप्रमाणे कमलपर्णासारखे तरंगते आहे, तसेच क्युबा हे बेट अमेरिकेच्या छायेत, कॅरिबियन समुद्रात व अटलांटिक महासागराच्या लाटांशी खेळतच आणि लाल रंग उधळत बागडते आहे. तो रंग अमेरिकेला आवडणारा नाही. आपल्या परसात साम्यवादी राष्ट्र आले याचा राग त्यांना आहे. परंतु या क्युबातच एका टोकाला अजूनही अमेरिकेचा लष्करी तळ आहे व केनेडी–क्रुश्चेव्ह यांच्या झटापटीनंतरही तो तेथे कायम आहे. तो हालचाल करणार नाही असे आश्वासन केनेडींनी त्या वेळी दिले. ते अजून तरी अमेरिकेने पाळले आहे व ग्वान्तनामोचा हा तळ आम्ही नाहीसा करण्याचा प्रयत्न करणार नाही हे रशिया-क्युबाने संयुक्तपणे दिलेले आश्वासन तेही पाळत आहेत.

क्युबाची भाषा स्पॅनिश. प्रत्येक देशाच्या भाषा व समस्या या इतिहास व भूगोल यामधून निर्माण होतात. क्युबाची राजधानी हवानामधून आम्ही दुसऱ्या दिवशी बाहेर हिंडण्यास गेलो तेव्हा सीमेवरचा मोरो कॅसल–किल्ला दिसला. क्युबावर दीर्घकाळ स्पेनची सत्ता होती. त्यामुळेच या बेटाची भाषा स्पॅनिश झाली. १७६२ मध्ये अमेरिकेच्या मुख्यत्वे मदतीने क्युबन स्वातंत्र्यवीरांनी स्पेनचा पराभव केला व तेव्हा अमेरिकेचा व क्युबाचा असे दोन्ही झेंडे या मोरो कॅसलवर झळकले. ११ महिने दोन्ही

राष्ट्राचे झेंडे येथे लागले. त्यानंतर क्युबाचा एकट्याचा झेंडा फडकला. त्यानंतर अनेक राजवटी झाल्या २८ मे १९०२ रोजी क्युबन प्रजासत्ताक स्थापन झाले व दुसऱ्या देशाचा झेंडा क्युबात बरोबरीने लावता येणार नाही असे घटनेत नमूद करण्यात आले' ' आइल ऑफ यूथ ' हे ' आइल ऑफ मॅन'चे नाव या बेटाचा ताबा १९३४ मध्ये अमेरिकेने क्युबा सरकारला दिला. तेथे तेल असावे या समजुतीत अमेरिका होती. क्युबात नंतर बाटिस्टाची राजवट आली. अमेरिकन भांडवलदाराचा केवळ हस्तक म्हणून त्याने राज्य केले. त्याचा परिणाम कॅस्ट्रो व चे गुव्हेरा यांनी केलेल्या उठावात झाला. क्युबाचे आजचे अर्थकारण साखर, सिमेंट, रम, तंबाखू, कॉफी यांच्या उत्पन्नावर अवलंबून आहे. बाटिस्टाच्या राजवटीत क्युबात साखर तयार होई व ती सरळ अमेरिकेला जाई. उत्पादक शेतकरी उपाशी व अमेरिकेचा नागरिक क्युबाच्या उत्पन्नाचा मिटक्या मारीत आस्वाद घेतो आहे, असे चित्र निर्माण झाले होते. क्युबा नावापुरते स्वतंत्र, परंतु व्यवहारात अमेरिकेची वसाहत बनली. हे वसाहतवादाचे जोखड कॅस्ट्रोने सर्वसामान्य लोकांच्या मानेवरून उतरविले म्हणून आज तो त्या देशाचा नायक झाला. क्युबा हे निर्नायकी नाही. त्याला शिकंदर नायक आहे. शरीराने बलदंड, लष्करी गणवेषात वावरणारा, कॅस्ट्रो एकापरीने सर्वत्र आहे. परंतु कुठेही दिसत मात्र नाही असे त्याचे राजकीय चित्र आहे. ' ग्रँडमा ' नावाच्या बोटीतून फिडेल कॅस्ट्रो १९५८ मध्ये क्युबाच्या किनाऱ्यावर उतरले व त्या दिवसापासून त्या जिल्ह्याचे नाव ' ग्रँडमा ' झाले. हवानातील प्रमुख वृत्त-पत्राचे नावही ' ग्रँडमा ' झाले. ' ग्रँडमा ' दैनिकाच्या कार्यालयात वेळ ठरवून आम्ही गेलो होतो. एका स्त्रीने स्वागत केले. संपादकीय खात्यातील ती एक प्रमुख होती. परंतु तिला आम्ही विचारले, " आपल्या दैनिकाचे संपादक कुठे आहेत ? " तिने शांतपणे उत्तर दिले, " कम्युनिस्ट पार्टीच्या एका खास बैठकीस ते गेले आहेत ! "

## तीन भाऊ

१९८३ हे क्युबातील क्रान्तीचे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. क्युबाची सत्ता घटनेनुसार नॅशनल असेंब्लीकडे आहे. कम्युनिस्ट पार्टीकडे आहे.

परंतु त्याचे शेवटी सूत्रचालन फिडेल कॅस्ट्रो ही एकच व्यक्ती करते व त्याचे दोन भाऊ त्याना मदत करीत आहेत. रमॉन कॅस्ट्रो व रमुल कॅस्ट्रो ही त्या दोन्ही भावांची नावे. रमॉन हा फिडेलपेक्षा मोठा व दुसरा धाकटा. फिडेल राष्ट्रप्रमुख तसाच लष्कराचाही कमांडर-इन-चीफ. परंतु लष्करातील दुसरे पद या धाकट्या भावाकडे आहे. त्याचे लष्करी गणवेषातील फोटो काही ठिकाणी लावलेले होते. तसे क्युबात सर्वत्र दिसते ते ओसे मार्टीचे चित्र. शाळाच्या बाहेर, रुग्णालयाच्या आवारात, सहकारी गृह सोसायट्यात सर्वत्र ओसे मार्टीचे पुतळे किंवा तैलचित्रे पाहावयास मिळतात. दुसरे चित्र चे गुव्हेराचे. परतु त्याचेही प्रमाण कमीच आहे. फिडेलची चित्रे फार कमी आढळली. त्याच्या धाकट्या भावाचे चित्र काही ठिकाणी दिसले व त्यावरून फिडेलनंतर रमॉनचे स्थान क्युबात आहे असे समीकरण आम्ही मांडले. परंतु त्या १४ दिवसाच्या आमच्या वास्तव्यात एकदाही हे तिन्ही भाऊ प्रत्यक्षात अगर दूरदर्शनवर आम्हाला दिसले नाहीत. लोकाच्या मनात असलेला, परंतु त्यांनाही न दिसणाऱ्या फिडेल कॅस्ट्रोच्या क्युबात आमच्या दृष्टीने कसलेही भीतीचे वातावरण नव्हते. आम्ही एकटे कुठेही फिरू शकत होतो. परंतु क्युबाचे राज्यकर्ते व नेते अमेरिकन हल्ल्याच्या भीतीच्या छायेत कायम वावरत आहेत. भीतिगंडाने क्युबातील सर्व राजकारण भारलेले आहे असे माझे मत झाले. ज्या देशाचा इतका लोकप्रिय नेता कुठे राहतो हे सांगायला बरोबरचे मार्गदर्शक तयार नाहीत तेथे भेटीचे काय? आम्ही तेथे पोहोचलो, त्या आधीच 'हिंदुस्तान टाइम्स'चे माजी संपादक श्री. खुषवंतसिंग तेथे होते. आमच्याबरोबर असलेले फर्नांदोच त्याच्याबरोबर होते. श्री. खुषवंतसिंग यानीही कॅस्ट्रो यांची भेट व्हावी म्हणून आग्रह धरला. भारताचे तेथील राजदूतांनी त्याच्यासाठी बरीच खटपट केली. परतु काही दाद लागली नाही.

आम्हीही मुलाखतीची मागणी केली होती. तुमचे प्रश्न आधी दिलेत तर बरे होईल असे सांगण्यात आले. 'मातृभूमी'चे संपादक श्री. रामचद्रन् व मी मिळून त्याना फक्त पाच प्रश्न तयार करून दिले. प्रश्नही अटीतटीचे नव्हते व दिल्लीत भरणाऱ्या अलिप्त राष्ट्र शिखर परिषदेच्या संबंधात होते. परतु कसचे काय? आमच्याबरोबर असलेले अधिकारी

श्री. फर्नांदो याना विचारले. ते एकच उत्तर देत, " वर पाठविले. उत्तर येईल तसे करू." कम्युनिस्ट राजवटीमध्ये एक सिस्टिम असते. आपल्या-सारखा वैयक्तिक सबंध असत नाही. त्याले लेखी दिले म्हणजे काम संपले. परराष्ट्र खात्याच्या फर्स्ट सेक्रेटरींशी आमची चर्चा झाली. त्यांनाही भेटीबाबत सांगितले. परंतु आपल्याप्रमाणे तेथे टेलिफोन करून " मुलाखतीचे काय झाले बुवा " असं कुणी विचारत नाही. " आमच्या सिस्टिममध्ये ते बसत नाही ". असे ते म्हणत. या कॅस्ट्रो भेटीबाबत पोर्तुगालशी संबध असलेले माझे ॲडव्होकेट मित्र श्री. नरेंद्र कामत यांच्याशी आल्यावर बोलत होतो. ते म्हणाले, " माझा भाऊ प्रीती कामत पोर्तुगालमध्ये मोठा वकील आहे. सालाझार सत्तेवर असताना तो वेगवेगळ्या उच्च पदस्थाच्या क्षेत्रात निदान २५ वर्षे वावरला. परंतु त्याने सालाझारला कधीच पाहिले नाही. डिक्टेटर्स हे स्वत चेच असे कैदी असतात. क्युबात आज कॅस्ट्रो लोकप्रिय असूनही व तो सालाझारसारखा हुकूमशाहा नसूनही तेच झाले आहे. कारण अमेरिकेचे एजंट त्याच्यावर केव्हाही झडप घालतील ही त्याना सतत वाटत असलेली भीती." अमेरिकेच्या सी. आय. ए. ची दुष्कीर्ती सर्वत्र आहे. परंतु शेवटी सतत खून करण्याच्या प्रयत्नात ते असतील व त्या भीतीने स्वदेशातही मोकळेपणाने हिंडता येत नसेल तर ती क्रान्तीही अपुरी वाटते.

### क्रान्तीचे संरक्षक

म्हणून क्युबात क्रान्तीच्या संरक्षकांना सर्वांत महत्त्वाचे स्थान आहे. दि. २१ फेब्रुवारी रोजी त्यानी आम्हाला सबंध देशासाठी असलेल्या क्रान्ति-सरक्षक समितीच्या मध्यवर्ती कार्यालयात नेले. क्युबात ही समिती सी. डी. आर. ( कमिटी फॉर डिफेन्स ऑफ रेव्होल्युशन ) या नावाने ओळखली जाते. त्याचे हे मध्यवर्ती कार्यालयही मोठे होते. २८ सप्टेंबर १९६० रोजी या मध्यवर्ती समितीची स्थापना फिडेल कॅस्ट्रोच्या मार्गदर्शनाखाली झाली. १९५८ मध्ये क्युबात कॅस्ट्रोनी क्रान्ती घडविल्यावर ताबडतोब सर्वत्र थंड झाले असे नव्हे. या क्रान्तीच्या विरुद्ध असलेले काही लोक होतेच. त्यानी काही गुंडाच्या मदतीने उसाच्या पिकाची नासाडी केली. युनोला भेट देऊन

फिडेल परतला तर विरोधकांनी हवाना विमानतळावर गर्दीत बॉम्ब फोडले. तेव्हा मोनकारा या गावी फिडेल कॅस्ट्रोचे भाषण झाले व त्या भाषणात त्यांनी क्रान्तीच्या सरक्षणासाठी अशी नागरिकाची समिती हवी अशी कल्पना माडली. त्याप्रमाणे प्रथम मध्यवर्ती, नतर प्रातपातळीवर, नंतर गावपातळीवर व हवानासारख्या शहरात वॉर्डपातळीवर या समित्या स्थापन झाल्या.

या समितीने सर्वप्रथम रात्रीचे पहारे सुरू केले. स्वातंत्र्य मिळाले, क्रान्ती झाली, शेतकऱ्याचे-कामकऱ्याचे राज्य आले, परतु प्रतिक्रान्तिवादी स्वस्थ नाहीत, त्याना डोके वर काढू देऊ नका, असा सदेश कॅस्ट्रोचा होता. अगदी तमाम जनतेशी जाऊन ही समिती भिडली. क्युबात कम्यु-निस्ट पक्षाचे फक्त चार टक्के लोक सदस्य आहेत. परंतु या क्रान्तिसरक्षण समितीचे १८ वर्षांवरील ८२ टक्के लोक सदस्य आहेत.

क्युबाची लोकसख्या फक्त एक कोटी. आकार तामिळनाडू या एका प्रांतापुरता. महाराष्ट्रापेक्षा आकाराने एकतृतीयाश हा देश आहे. परतु आज जग गाजवतो आहे. या एक कोटीपैकी ५० लाख लोक आज क्रान्ति-सरक्षक समितीत आहेत. चीनमध्ये मी प्राताच्या क्राती समित्या पाहिल्या होत्या परंतु येथे संरक्षण समित्या आहेत, त्याची रचना कॅस्ट्रोनी मोठ्या हुशारीने केली आहे व या पाच लाख लोकांकडून विधायक कार्यही पुष्कळ करून घेतले आहे. आपल्याकडे ज्या पक्षाचे सरकार असते, त्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनाही आपल्या गावात एखादे चागले काम करून घ्यायचे असेल तर घेता येत नाही. कारण सरकार पक्ष व सरकार यांत नियमांचे कुंपण घेऊन नोकरशाही उभी असते. कम्युनिझम क्षणभर बाजूला ठेवला तरी लोकांपर्यंत कार्यक्रम पोहोचविण्याची त्याची कार्यपद्धती नेहमीच प्रभावी ठरली आहे. आता या क्रान्तिसरक्षक समितीच्या ५० लाख स्त्री-पुरुष सदस्याना कॅस्ट्रोनी शस्त्रे दिली नाहीत. ती दिली तर आपण जाग्यावर राहणार नाही हे त्याना माहीत आहे.

देशात त्यांनी ३० हजाराचे सरक्षक पथक बनविले. आपल्याकडे होम-गार्डस् असतात तसेच. त्यानाही पहाऱ्याची ड्यूटी ३० दिवसानी एकदा दिली. अमेरिकेच्या प्रभावाखालील राजवटीने क्युबातील सामान्य लोकाकडे सर्व तऱ्हेचे दुर्लक्ष केले होते. अनेक तऱ्हेचे भीषण रोग येथे होते. लहान

मुलाना ट्रिपल इंजेक्शन्स कधीच दिली जात नव्हती. कॅस्ट्रोची हुशारी ही की त्यांनी क्रांतीचे संरक्षण म्हणजे रात्रीचा पहारा व शत्रुवत असलेल्या लोकाच्या चुगल्या असे होऊ दिले नाही. लोकाच्या आरोग्य सेवेचे काम त्यानी या गावपातळीवरील, वॉर्डपातळीवरील समितीमार्फत सुरू केले. १९६२ पासून आता सर्व मुलाचे व्हॅक्सिनेशन झाले आहे.

त्याच वेळी अमेरिकेने क्षेपणास्त्राचे प्रकरण उभे केले. युद्ध झाले असते तर क्युबाकडे सैनिकासाठी पुरेसे रक्त नव्हते. या क्रान्ति-संरक्षक समितीने रक्तपेढी स्थापन केली. १० हजारानी रक्तदान केले. गतवर्षी दोन लाख २५ हजार लोकांनी रक्तदान केले. क्युबात डोळे येण्याची साथ फार आली. काहींना आंधळेपण आले. अमेरिका कुमार्गाने क्युबात साथीचे रोग पसरविण्याचा प्रयत्न करते अशी या सरकारची दृढ समजूत आहे. या क्रान्ति-संरक्षक समित्यानी या रोगाशी सामना दिला व नागरिकाना मदत केली.

## साक्षरता प्रसार

क्राती म्हणजे काय याचा अर्थ भारताला स्वातंत्र्य मिळून आता ३६ वर्षे झाली तरी समजलेला नाही असे काही वेळेस वाटते. आपला देश मोठा आहे हे खरे. परंतु एक कोटीच्या क्युबाने जे केले ते ८० लाखाच्या फक्त मुंबई शहरात आम्ही का करू शकत नाही? एखाद्या जिल्ह्यातही का करू शकत नाही? १९६२ मध्ये १० लाख क्युबन शेतकरी व कामगार हे निरक्षर होते, आज एकही व्यक्ती तशी निरक्षर नाही. १० लाखांना त्यानी २० वर्षांत साक्षरच केले नाही तर आधुनिक तंत्रज्ञानाशी त्याची ओळख करून दिली.

आम्ही क्युबात असतानाच हवाना साखर-तंत्रज्ञांची जागतिक परिषद भरली याचा उल्लेख यापूर्वी आला आहे. कॅस्ट्रो दक्षिण आफ्रिकेतील वर्ण-विद्वेशी राजवटीवर तुफान टीका करतात. परंतु हवानातील त्या परिषदेत दक्षिण आफ्रिकेचे ऊसतज्ज्ञ व साखरतज्ज्ञ आपले संशोधन सागत होते. अमेरिकेचे युनोतर्फे आलेले श्री. ॲचिसन् तेथे होते. आपल्या महाराष्ट्र साखर-सघाचे व्यवस्थापकीय सचालक श्री. मो. स. मराठे यानीच माझी त्याच्याशी ओळख करून दिली. उसाच्या चिपाडापासून कागद तयार

करणारे अनेक आहेत, परंतु वृत्तपत्रांना हवा असलेला न्यूजप्रिंट तयार करण्यात अमेरिकेसह अनेक प्रगत देश अयशस्वी झाले आहेत तर क्युबा-तील तंत्रज्ञांनी त्यात यश मिळविले आहे. ज्या अमेरिकनांचा 'यांकी' म्हणून तिरस्काराने उल्लेख क्युबन्स करतात, त्यापैकीच एक यांकी—मिस्टर ॲचिसन् हे सर्व आम्हाला सांगत होते व तेच या क्युबातील कारखान्याला मार्गदर्शन करीत आहेत. त्यांनी एक फार महत्त्वाचे विधान केले. ते म्हणाले, "नवे तंत्रज्ञान आत्मसात करण्यात अल्पशिक्षित क्युबन्सही जी हुशारी दाखवितात ती जबर आहे!" रोगराई, अज्ञान व पिळवणूक यामधून देशाला बाहेर काढून साक्षर, सुशिक्षित, तंत्रप्रिय, उद्योगी अशा स्थितीला हे छोटे का होईना ज्याने राष्ट्र नेले, त्याचे मोठेपण वादातीत आहे.

कम्युनिस्ट देशात व्यक्तिस्वातंत्र्याला मर्यादा आपोआप येतात. परंतु येथे ६० हेक्टर्सपर्यंत म्हणजे १५० एकर्सपर्यंत जमीन एखाद्या मालकाला आपल्याकडे ठेवता येते. तुमचे राहते घर तुम्हाला सोडवत नसेल तर तेही तुम्हाला तुमच्या मालकीचे ठेवता येते. तुमच्या शेतीत तुम्ही स्वतः हवे ते उत्पन्न काढू शकता. त्याचा फायदा तुम्ही घेऊ शकता. खाजगी मालकी उपभोगलेली पिढी देशात आहे व अमेरिकेच्या छायेत आपण आहोत याची जाण कॅस्ट्रोनीही ठेवली व लोकांचे सर्वच व्यवहार देशाच्या गुदामात त्यांनी आणून टाकले नाहीत. त्यामुळे पक्षाचे सदस्य कमी, पोलंडप्रमाणे खाजगी मालकीला मुभा व क्रान्ति-संरक्षक समित्याही विधायक कार्याला जुंपून कॅस्ट्रोंनी बरीचशी व्यावहारिक रचना क्युबात केली आहे.

### वॉर्ड समितीला भेट

अर्नाॅदो ॲकॉस्टा हे राष्ट्रीय क्रान्ति-संरक्षक समितीचे प्रमुख आम्हाला भेटले. पक्ष, नॅशनल ॲसेंब्ली व प्रत्यक्ष लोक यांच्यातून या राष्ट्रीय समितीचे सदस्य कसे निवडले जातात व त्यामुळे कम्युनिस्ट पार्टी, पार्लमेंट व लोक यांच्यातील दुवा म्हणून ही समिती कशी काम करू शकते याची सविस्तर माहिती त्यांच्याकडून ऐकल्यानंतर दोन दिवसांनी रात्री ९ वाजता आम्ही एका वॉर्डाच्या समितीला भेट दिली.

आपल्या गावची पंचायत बसावी, तसे हवानातील एका वॉर्डातील

सामान्य नागरिक तेथे जमले होते आमची ही सभा फार चांगली झाली. प्रत्येक ठिकाणी गेल्यावर पार्टीने आदेश दिल्याबरहुकूम लोक बोलत. तसे येथे या मंडळींना बोलण्याची संधी द्यायची नाही, असे आम्ही ठरविले होते व त्यासाठी आम्हीच प्रश्न विचारण्यास सुरुवात केली आणि तेही सहजपणे गप्पा मारतो आहोत असे सुरू झाले. स्पॅनिश भाषा आडवी येत होती. परंतु दोघांना इंग्रजी येत होते, बाकी दुभाषी नान्सीचा मारा सुरू होता. या चर्चेतून असे दिसून आले की, या सर्वांचे ' इन्कम ग्रुप्स '— उत्पन्नाचे गट सारखे नव्हते. क्युबात मंत्र्याला ४५० पेसोदस् इतके वेतन मिळते. त्याची डॉलरबरोबर तशी तुलना करून उपयोगी नाही. रशियाने जसा आपला रुबल डॉलरशी निगडित न ठेवता वर ठेवला आहे तसे क्युबाच्या पेसोदचे आहे. डॉलरपेक्षा पेसोद महाग. एक डॉलर म्हणजे एका पेसोदचे ८० सेंटस्. या सर्व नागरिकांचे कपडे सारखे नव्हते. काहींचे कपडे उंची होते. त्यात दोन पोलिसही होते. ते ड्युटीवरून आले होते व अगदी बावळट चेहरा करून बसले होते. तरुण वाहतुकीचे इतर नियम पाळत नाहीत अशा सामान्य तक्रारीही त्याच्या चालू होत्या. त्यात ज्या स्त्री-सदस्या होत्या त्यात दोन गोऱ्या तर दोन कृष्णवर्णीय होत्या. एका वृद्धेने पूर्वी शेती नसल्यामुळे आपल्या मुलांच्या शिक्षणाची कशी आबाळ झाली व आता शिक्षण व आरोग्य दोन्हीची जबाबदारी सरकारने घेतल्याने व जागोजाग शाळा झाल्याने शिक्षणप्रसार कसा झाला आहे ते सांगितले. ही वृद्ध स्त्री शाळात न जाणाऱ्या मुलांवर क्रान्ति-संरक्षक समितीच्या वतीने लक्ष ठेवते. आपल्याकडे हे काम कोण करतो ? निवृत्त स्त्री-पुरुषांना हे करता येण्याजोगे काम आहे.

क्युबात २० टक्के तरी कृष्णवर्णीय लोक असावेत. एक स्त्री पार्टीची पक्की कार्यकर्ती होती. " अजून आमच्या देशात क्रान्तीचे विरोधक आहेत," असे ती म्हणत होती. " आमची विचारनिष्ठा महत्त्वाची आहे, ती आम्हा सर्वांत आहे असे नाही," असे ती बोलली. तेथे जमलेल्या चांगल्या कपड्यातील दोघांना ते उद्देशून असावे. बोलण्याची संधी आपल्याला हवीच असा आग्रह धरणारे जसे आपल्याकडे असतात, तसे तेथेही होते. ज्याने मुळीच बोलू नये असे प्रमुखाला वाटत होते, तो आमच्या प्रश्नाचा फायदा

घेऊन बोलत होता. इतक्यात कॉकटेल्स आली. क्युबात ' हवाना रम ' ही अतिशय लोकप्रिय. आणि त्याची उत्तम कॉकटेल्स तयार करतात. वातावरण अधिक सुधारते आहे असे पाहून मी हवाना दूरदर्शनाचा विषय काढला ' दूरदर्शनच्या कार्यक्रमात काही सुधारणा हवी असे तुम्हाला वाटते का ? ' असे दोघाना विचारले. आणि क्षणात तिथं दोन गट पडले. सरकारी बाजू परदेशी पाहुण्यापुढे मांडलीच पाहिजे असे वाटणाऱ्यानी समर्थन सुरू केले तर काहींनी बदल सुचविले. एक गोष्ट खरी की, आपल्याकडे श्रीमती गांधींसाठी सर्व कार्यक्रम बाजूला सारून तासन्‌तास आपला टी व्ही. त्यांच्यासाठी राबविला जातो तसे तेथे घडत नाही. अमेरिकेत दाखविले जाणारे चित्रपटही क्युबात दाखविले जातात हल्ली अमेरिकेत खास प्रौढासाठी दाखविल्या जाणाऱ्या चित्रपटांचे प्रदर्शन रात्री ११ नतर सुरू होते. परंतु त्यापैकी एक चित्रपट मी क्युबातील एका समुद्रकिनारी आमचा मुक्काम होता तिथे पाहिला. क्युबा सोवळे ठेवलेले नाही. क्युबात नाइट क्लब्जही आहेत. जगातील सुदर नाइट क्लब्जमध्ये ज्याची गणना होईल असा नारळाच्या झावळ्याच्या छायेत, उघड्यावर चालणारा ' ट्रॉपिकाना ' हा नाइट क्लब खुद्द हवानात आहे. अमेरिकनाचा तो त्या वेळी फार आवडता होता. आता कॅस्ट्रो सरकारच्या मालकीचा तो आहे. सरकारी पाहुणे म्हणून आम्ही तो पाहिला आणि क्युबन स्त्रीसौंदर्याचेही दर्शन घेतले. कम्युनिस्ट देशात आपण आहोत असे पदोपदी वाटणार नाही असे हे क्युबा शेवटी शेतकऱ्याच्या व कामकऱ्याच्या हिताचा सर्व विचार करते आहे. क्रान्तीपूर्वी निदान एक लाख शेतकरी भूमिहीन होते. हलाखीच्या स्थितीत होते. मियामीसारखे सुंदर टोलेजंग अमेरिकेचे शहर नव्वद मैलावर असताना क्युबातील अनेक खेड्यांत रस्ते नव्हते, वीज नव्हती, शाळा नव्हत्या, रुग्णालये नव्हती. कॉम्रेड फिडेलनी ती आम्हाला दिली, असे कृतज्ञतेने बोलणाऱ्या शेतकऱ्यात आम्ही फिरलो. क्युबा हा शेवटी ऊस पिकविणाऱ्या, भात पिकविणाऱ्या, तंबाखू, कॉफी अशा विविध गोष्टी पिकविणाऱ्या शेतकऱ्याचा आहे. साखरेच्या आणि सिमेंटच्या कारखान्यात काम करणाऱ्या कामगाराचा आहे. कम्युनिस्ट पक्षाचे सदस्यत्वही त्यांना आधी दिले जाते. पांढरपेशाना दूर ठेवले जाते. यामुळे पक्षाचे स्वरूप

बिघडणार नाही अशी त्याची अपेक्षा असावी

## हवे तर निघून जा

त्यात कॅस्ट्रोंनी पूर्व बर्लिनप्रमाणे येथे भिंत उभारलेली नाही. ज्या क्युबातील नागरिकाना देश सोडून जायचे असेल त्याना जाण्याची संधी दिली जाते. त्यामुळे रोज उठून देश सोडून जाणारे लोक निघत नाहीत.

मध्यंतरी अमेरिकेने विरोधी प्रचार करून असंख्याना देश सोडण्यास प्रवृत्त केले. त्या वेळच्या स्थितीचे वर्णन ' ग्रँडमा ' दैनिकाच्या संपादक प्रतिनिधीकडून आम्ही ऐकले. १९७९ मध्ये या प्रचारामुळे एकदम मोठ्या प्रमाणावर क्युबन लोक देश सोडून निघाले. त्याना कॅस्ट्रोने अडविले नाही. एक लाख बारा हजार लोक त्या वेळी देश सोडून गेले. मारिया बंदरात त्याना नेण्यासाठी अमेरिकेने बोटी पाठविल्या.

' ग्रँडमा 'तील ती स्त्री हसत सांगत होती. " परंतु आमच्या फिडेलने काय केले ? तुरुंगही खुले केले व त्या सर्व चोर दरोडेखोरानाही या गर्दीत आणून सोडले व त्यानाही पाठवून दिले. फ्लोरिडामध्ये या लोकांसाठी अमेरिकेने ' निर्वासित ' छावण्या उघडल्या. तेथे या चोरदरोडेखोरांनी लुटालूट केली. " तुम्हाला स्वतंत्र विचाराचे लोक हवेत ना, हे घ्या ! "

या चोरदरोडेखोर मंडळींनी फ्लोरिडात नव्या समस्या खरोखरच निर्माण केल्या. येथे क्युबात कॅस्ट्रोने एक आदेश दिला. " लोकहो, तुम्हाला क्रान्ती हवी की नको याची साक्ष अमेरिकेचा निषेध मोर्चा काढून द्या ! " आणि या आदेशाबरोबर २० लाख लोक हवानाच्या रस्त्यावर जमले. त्याची ' ग्रँडमा 'ने प्रसिद्ध केलेली खास व खरोखरच प्रचंड गर्दीची असलेली छायाचित्रे आम्हाला त्यानी दाखविली तो प्रचंड मोर्चा पाहण्यासाठी परदेशी वार्ताहर आले व सर्वांची खात्री झाली की, अमेरिकेत आपले भवितव्य ठरविण्यासाठी निघालेले हे एक लाख बारा हजार लोक म्हणजे सर्व क्युबा नव्हे.

फिडेल कॅस्ट्रोचे वय सध्या ५५ आहे. परंतु त्याचे जे दर्शन दिल्ली दूरदर्शनवर घडले, त्यात वार्धक्याच्या छटा जास्त दिसल्या. राजकीय तणाव तर आहेच, परंतु आज क्युबा हे दक्षिण अमेरिकेतील विविध देशातील

डाव्या पक्षाचा आधार झाला आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध लढण्यासाठी मोझाबिकमध्ये क्युबाचे सैन्य जाते हे समजू शकते. परतु ते अफगाणिस्तानमध्येही आल्याचे ताजे वृत्त आहे. क्युबामध्ये ५० हजार रशियन्स आज आहेत. परतु लष्करी गणनेपात ते कुठेच नाहीत. मुख्यत्वे तंत्रज्ञ म्हणून ते आहेत. परंतु क्युबाच्या लष्करी तळावर ते असणारच. एका मोठ्या दुकानात आम्ही गेलो होतो. तेथे सर्व आलेले ग्राहक रशियन्स होते. त्याच्यासाठीच मुख्यत्वे ते दुकान आहे व वस्तू थोड्या स्वस्त विकल्या जातात. 'लोडा' या रशियन मोटारीच क्युबात अधिक आहेत. याच दुकानात 'लेनिनग्राड' या नावाच्या रशियन ब्लेडसुद्धी विकण्यास होत्या. परंतु याचा अर्थ क्युबन शेतकऱ्याच्या अगर अधिकाऱ्याच्या घरी रशियन वस्तूच आहेत असे नव्हे. सर्वांकडे जपानचेच टी. व्ही. सेटस् होते. इलेक्ट्रॉनिक आयुधे तर सर्व जपानकडून क्युबाने घेतलेली दिसली. रशियाची निकटची मैत्री आहे. फिडेल कॅस्ट्रोचा पायही मॉस्कोत अडकला आहे, परतु त्यातही काहीतरी वेगळेपण टिकविण्याचा प्रयत्न आहे. एकजण सुरुवातीलाच म्हणाला, "अमेरिकेने इतका विरोध केला नसता तर कॅस्ट्रोंनी रशियाशी इतकी निकट मैत्री केली नसती !" मी त्यास म्हटले, "रशियाला मित्र मिळवून देण्याचे काम अमेरिका नेहमीच यशस्वीपणे करीत आली आहे. भारत हेही त्याचे उदाहरण आहे." अर्थात ते पूर्ण खरे नाही. वसाहतवादी दृष्टिकोणाचा त्याग जोपर्यंत अमेरिकेसारखी श्रीमंत राष्ट्रे करीत नाहीत, पिळवणुकीचे धोरण सोडत नाहीत, तोपर्यंत श्रमणाऱ्यासाठी झेंडा घेऊन काही लोक उभेच राहणार व ते विजयीही होणार हे गृहीत धरावयास हवे. सोव्हिएतचे राजकारण दिवसेंदिवस दक्षिण अमेरिकेत यशस्वी होत आहे, हा त्याचा पुरावा आहे. त्यामुळे "व्यक्ती मारल्या गेल्या तरी विचार मरत नाहीत," हे कॅस्ट्रोंनी दिल्लीत उच्चारलेले वाक्य खोटे नाही. परतु शेवटी तसा विचार पेलणारी व्यक्तीही लागते फिडेल कॅस्ट्रो क्युबाला लाभला म्हणून आज तेथे प्रत्येक शेतकऱ्याला पुरेसे उत्पन्न मिळाले, प्रत्येकाला काम मिळाले, अन्न, वस्त्र, निवारा लाभला शिक्षण व आरोग्य विनामूल्य दारी आले. भिकारी नाहीसे झाले. श्रीमंत अमेरिकनाची हौस पुरवणाऱ्या वारांगनाचा वर्ग नाहीसा झाला. आज त्याही उत्तम रोजगारात

गुंतल्या आहेत. हो चि मिन्हने व्हिएतनाममध्ये जे परिवर्तन घडवून आणले ते फिडेल कॅस्ट्रोने क्युबात घडविले. शेतकऱ्यांचा हा मुख्यत्वे देश. त्यानी साथ दिल्यामुळे हे घडले. त्याच्या सहवासातील क्षणाचे चित्रण पुढील प्रकरणात.

दा. क्र.

# ३

०००००००००००००००००००००००००००००००००००००

## परिवर्तनशील शेतकऱ्यांचे क्युबा

क्युबामध्ये क्रांती होण्यापूर्वी एक लाख लोक भूमिहीन होते. त्यांच्याकडे स्वत:ची जमीन नव्हती, परंतु क्रांतीचा नेता फिडेल कॅस्ट्रो हा स्वत:ही शेती नसलेला शेतमजूर नव्हता. तो स्वत: धनिक शेतकरी घराण्यात जन्मलेला होता. कॅस्ट्रो कुटुंबाकडे पुष्कळ शेती होती तरीही त्यांनी सत्ता हाती येताच पहिला कायदा केला तो शेतीचा व या सर्व भूमिहीनांना कसण्यासाठी जमीन उपलब्ध करून दिली. १७ मे १९५९ हा दिवस क्युबात शेतकऱ्यांचा दिवस म्हणून मानला जातो. याचे कारण त्या दिवशी त्या देशात एकही शेतकरी कसण्यासाठी जमीन नसलेला राहिला नाही. आधीच्या प्रकरणात सांगितल्याप्रमाणे १५० एकरपर्यंत खाजगी मालकीची जमीन ठेवण्याची परवानगी देऊन फिडेल कॅस्ट्रोंनी भूमिहीनांना जमीन दिली. याचा अर्थ अमेरिकेच्या प्रभावाखाली क्युबा असताना बडे जमीनदार होते, भरपूर जमीन पडिक होती. जे पळून गेले, त्यांची जमीन सरकारकडे आली, जे राहिले त्यांनी आपली काही जमीन सहकारी शेतीत समाविष्ट केली व पर्यायाने प्रत्येक शेतकऱ्याच्या वाट्याला कसण्यासाठी जमीन देता आली. सहकारी शेतीत त्याचे रूपांतर झाले. आज क्युबामध्ये ४० टक्के जमीन ही सहकारी शेतीखाली आहे तर ६० टक्के जमीन खाजगी मालकीची आहे.

ही माहिती नॅशनल असोसिएशन ऑफ स्मॉल फार्मर्स या संस्थेचे प्रवक्ते

जुआँ अँन्तोनियो गोन्साल्वीस यानी दिली. त्यांच्या कार्यालयास आम्ही भेट दिली व तेथे क्युबातील एकूण शेती व्यवस्थेची सविस्तर चर्चा झाली ६० टक्के शेती अजूनही खाजगी मालकीची आहे हे सांगितल्यावर गोन्साल्वीस यानी ताबडतोब पुस्ती जोडली. "१९९० मध्ये सर्व जमीन सहकारी शेतीखाली येईल !" क्रातीनंतर तीन महिन्यातच शेतीचा कायदा झाला व चित्र पालटत गेले. छोटे, मध्यम व बडे असे तिन्ही प्रकारचे शेतकरी होते. ४०० एकरपर्यंत जमीन असलेले बडे जमीनदार त्यात होते. १५० एकरापेक्षा अधिक असलेल्या त्यांच्या जमिनींचे या कायद्याने राष्ट्रीयीकरण झाले. १५० एकरपर्यंत जमीन खाजगी मालकीची ठेवता येत असली तरी या प्रवक्त्याच्या सांगण्याप्रमाणे ३५ एकर हीच खाजगी मालकीची क्युबातील आज सरासरी आहे. दोन लाख शेतकरी आज या संघटनेच्या कक्षेत आहेत. त्यांपैकी एक लाख ९१ हजार सरळ सदस्य आहेत. ही संस्था तशी स्वायत्त आहे. कम्युनिस्ट पक्षाच्या आदेशानुसार ती आपली धोरणे ठरविते. १९७५ मध्ये क्युबा कम्युनिस्ट पक्षाचे पहिले अधिवेशन भरले व त्यात प्रथम कामगारांच्या बरोबरीने शेतकरी मोठ्या प्रमाणावर हजर झाले. क्युबन शेतकरी तसा एकटेपणाने जगत होता. त्याचे सर्व अर्थकारण व्यक्तिप्रधान होते. एकत्र येऊन संघटितपणे शेती केल्याशिवाय मिळालेल्या जमिनीचाही आपण नीटपणे उपयोग करू शकणार नाही हे त्याच्या लक्षात आले. २० टक्के जमीनच फक्त लागवडीयोग्य होती अधिक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी अवजारांची, बुलडोझर्सची गरज होती. श्री. गोन्साल्वीस म्हणाले, की सुरुवातीला ७५ सहकारी शेती सोसायट्या निर्माण झाल्या. आज क्युबामध्ये १४२२ सहकारी शेती सोसायट्या आहेत व त्यांचे ४३ हजार भागधारक आहेत त्यात १७,५०० स्त्रिया भागधारक आहेत. ४४ टक्के शेतकरी आज सहकारी शेतीच्या कक्षेत आले आहेत. प्रत्येक सहकारी सोसायटीकडे साधारण एक हजार एकर जमीन आहे. या १४२२ सहकारी सोसायट्यांपैकी सर्वांत जास्त सोसायट्या या ऊस उत्पादकांच्या आपल्या पद्धतीने त्यांना बागाईतदार शेतकरी म्हणावयास हरकत नाही. त्यांच्या ४८५ सहकारी सोसायट्या आहेत. त्यानंतर ३०० सोसायट्या कॉफी पिकविणाऱ्यांच्या.

२३० तबाखू पिकविणाऱ्याच्या. २२० भाजीपाला काढणाऱ्याच्या तर १६८ सोसायट्या गुराच्या खाद्यापासून इतर अनेक शेतीमालाचे उत्पादन करणाऱ्या आहेत. देशाच्या एकूण गरजेनुसार सर्व बागाइतदार व इतर शेतकऱ्यानी किती जमिनीत काय व किती पिकवायचे याचे नियोजन त्याना करता आले. आपल्याकडे सर्वांनाच श्रीमत व्हायचे असल्याने गळेकापू स्पर्धा, एक वर्ष अवास्तव उत्पन्न, त्यामुळे भावाचे चढउतार या सर्व गोष्टींतून या शेतकऱ्याची आज सुटका झालेली आहे. १९५९ च्या क्रातीनंतर वस्तूचे दर वाढणार नाहीत, जमिनीच्या किंमती वाढणार नाहीत अशी अर्थ-व्यवस्थाच कम्युनिस्ट राजवटीने चीनप्रमाणे निर्माण केल्यामुळे शेती व बागायत व्यवसायाला स्थैर्य आले. या सहकारी सोसायट्या जोडीला फळे व फुले यांचे उत्पन्नही काढत आहेत. क्युबात सर्वांत लोकप्रिय फळ म्हणजे मुसंबे. मुसब्याच्या रसाचा जेथे जाऊ तेथे आमच्यावर मारा होई. गेल्याबरोबर एक ग्लास व निघताना एक ग्लास असे चाले. आपल्याकडे कोकणात जाताना जशी सर्वत्र आब्याची झाडे दिसतात तशी क्युबात सर्वत्र दिसत होती. आणि, विशेष म्हणजे सर्व झाडाना भरपूर मोहोर आलेला होता. त्यांचा व आपल्या आब्याचा हंगाम अगदी एक आहे.

### भातशेतीचे सरकारी क्षेत्र

भातशेती मात्र सर्व सरकारी क्षेत्रात आहे व त्यासाठी सरकारने भरपूर भाडवलही गुंतवलेले आहे. जेवणात रोज भात असेच. आणि तो दोन तऱ्हेचा असे. १९८२ मध्ये क्युबात भाताचे उत्पादन पाच लाख टन झाल्याचे श्री. गोन्साल्वीस यानी सागितले. जगातील अनेक समाजवादी देशात हे गृहस्थ जाऊन आलेले होते. विविध देशांतील शेतीचे प्रयोग व व्यवस्था आणि मुख्यत्वे त्यांचे सघटन त्यानी पाहिलेले होते. परतु नेहमीचा अनुभव असा की आकडेवारी देण्यास ते काकू करीत. त्याना माहिती नव्हती असे नाही. परंतु ती न देण्याकडे त्याचा कल असे. पुढे आम्ही त्याची सरकारी प्रकाशित पुस्तकेच मिळविली व त्यात आकडेवारी प्रसिद्ध झालेली आहे हे दिसल्यावर सर्व तोंडे बोलू लागली.

सहकारी शेतीतील घटकाला त्याच्या मासिक खर्चासाठी पैसे कसे

मिळतात हा प्रश्न त्यांच्यापुढे आम्ही ठेवलाच. त्यानंतर आम्हाला या भाग-धारकाच्या उत्पन्नाकडे जायचे होते. सर्व सहकारी सोसायट्या फायद्यात आहेत असे गोन्साल्वीस म्हणाले. प्रत्येक भागधारकाला पंधरवड्यासाठी पाच पेसोदस् आगाऊ दिले जातात. मग महिन्याचा हिशेब होतो तेव्हा सोसायटीला झालेल्या नफ्यातील वाटा जमा होतो व साधारण २५० ते ३०० पेसोदस् दरमहा सहकारी सोसायटीतील शेतकऱ्यास मिळतात. मंत्र्याला तेथे ४५० पेसोदस् पगार मिळतो हे लक्षात ठेवले तर शेतकऱ्याच्या जीवनमानाचे गणित मांडता येते. एकूण येणाऱ्या नफ्यातील ५० टक्के रक्कम सदस्य शेतकऱ्यांना वाटली जाते. २० टक्के रक्कम अवजारे व आयुधे यावर खर्च केली जाते. त्यात सरकारी मदत मोठ्या प्रमाणावर असते. १० टक्के रक्कम सामाजिक उपक्रमासाठी ठेवली जाते, तर पाच टक्के क्रीडा व पाच टक्के करमणुकीवर खर्च केली जाते. येथे एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, काही सहकारी सोसायट्यांतील भागधारकांकडे खाजगी बागायत असते. तेथेही ते उत्पन्न घेत असतात व त्यामुळे आजही क्युबात असे शेतकरी आहेत की, त्यांचे मासिक उत्पन्न हजार पेसोदच्या घरात आहे. आर्थिक विषमता अजूनही अस्तित्वात असल्याचे हे चित्र आहे. परंतु २५० पेसोदस् उत्पन्नाची सोय प्रत्येकाची केल्यामुळे तो उपाशी नाही, तो अर्धपोटी नाही, तो बेकार नाही व रस्त्यावर उभे राहून भीक मागण्याची वेळही त्याच्यावर येण्याची शक्यता नाही. किंमतीच अशा पद्धतीने स्थिर ठेवल्या आहेत की, अन्न व वस्त्र तो त्यात घेऊ शकतो व निवारा, शिक्षण व आरोग्य या तिन्हीची जबाबदारी घेण्यास सरकार सिद्ध आहे. आणि आपल्याकडे रोजगार हमी योजनेतही वेळेवर मजुरी न दिल्याने भूकबळी झाल्याच्या बातम्या येतात.

## शेती उत्पन्नावर विमा

खाजगी शेती असलेल्या शेतकऱ्याबद्दल बरेच प्रश्न श्री. गोन्साल्वीस यांना विचारले. बटाट्याचे उत्पन्न असे खाजगी जमीनमालक पुष्कळ काढतात. दर हेक्टरमागे ५० टन बटाटा ते पिकवतात. त्याशिवाय टोमॅटो व आले काढणारे खाजगी जमीनमालक आहेत. त्यात अगदी या वर्षी

फिडेल कॅस्ट्रोंनी तेथे शेती उत्पन्नावरील विम्याची योजना सुरू केली व तिचा फायदा जमिनीची खाजगी मालकी असलेल्यानाही देऊ केला. देश समृद्ध करा या एकाच आकांक्षेने भारलेला हा नेता आहे व भारत संमिश्र अर्थव्यवस्थेखाली निरर्थकतेचे पीकच जास्त काढतो, त्यापेक्षा त्याची संमिश्र अर्थव्यवस्था ही खरीखुरी वाटते. कारण जमीन पाडून ठेवली, पीक काढण्याचे बुद्धिपुरस्सर टाळले व आळशाचे बिऱ्हाड तेथे मांडले तर जमीन त्या मालकाकडे राहात नाही. सरकारच्या मालकीचे जे फार्म्स आहेत तेथे काम करणाऱ्याना किती पैसे सरकार देते याबद्दल आम्ही उत्सुक होतो. त्याना १५० ते १६० पेसोदस् महिन्याला मिळतात. म्हणजे कमी मिळतात. त्याची भर ते वेगळ्या पद्धतीने काढतात. काहींकडे स्वत च्या थोड्या जमिनी आहेत. काही फळाचे उत्पन्न मिळवतात. एकूण २५० पेसोदस्च्या पातळी-वर क्युबातील प्रत्येक शेतकऱ्याला आज आणून ठेवले आहे. क्रांतीनतर क्युबाने केलेल्या प्रगतीचाच हा आलेख आहे.

क्युबातील एका अस्सल खेड्यात आम्ही जायला फार उत्सुक होतो व अगदी छोट्या शेतकऱ्याची सहकारी सोसायटी आम्हाला पाहावयाची होती. हवानापासून ६० किलोमीटर्सवर असलेल्या एका खेड्यात आम्हाला त्यानी नेले. मुख्य रस्त्यापासून आत शिरलो तर प्रथम चिखलाने बरबटलेल्या रस्त्याने आमचे स्वागत केले. शेतकऱ्याची घरे समोर दिसत होती. त्याना घरे म्हणणेही योग्य नव्हते. त्या चक्क आपल्यासारख्या झोपड्या होत्या व वृद्ध शेतकरी क्युबन गवती फेल्टस् घालून चिरूट तोंडात घालून बसले होते परराष्ट्रखात्याचा आमच्याबरोबर असलेला अधिकारी म्हणाला, "आपण जात आहोत ती सहकारी सोसायटी या खेड्यातील लोकांची नाही. या खेड्याजवळ आपण जात असलेल्या सोसायटीचे फक्त कार्यालय आहे." मग हे शेतकरी कोण हा प्रश्न होताच. या खेड्यातील तरुण शेतकरी व स्त्रिया यांची राहण्याची वसाहत व त्याची सोसायटी वेगळ्या जागी होती व ज्याना आपले जुने घर सोडवत नव्हते ते तिथे शिल्लक राहिले होते. शेतीच्या क्षेत्रातील आपल्याला घेता येण्याजोग्या परिवर्तनाचे चित्र मी तेथे पाहात होतो.

## शेतकऱ्यांचे स्थलांतर

आपला शेतकरीही कुठेतरी राहतो. मुख्य रस्त्यापासून त्याच्या वाड्या असतात. आपले वडिलोपार्जित घर सोडणार नाही व माझ्या घरापर्यंत रस्ता आला पाहिजे अशी त्याची मागणी असते. रत्नागिरी जिल्ह्यातील जोड-रस्त्याची चळवळ 'मुंबई सकाळ'ने केली. त्यानंतर एका दूरवरच्या गावी रस्ता झाला म्हणून मला गावकऱ्यांनी बोलाविले तेव्हा श्री. जयवंत दळवी हे बरोबर होते. तो रस्ता होऊनही मुख्य रस्त्यापासून आम्ही तिथे कसेबसे पोहोचलो. पाहतो तर समोर आठ-दहा घरेच होती. ती पाहताच श्री. दळवी म्हणाले, "हा लाखांनी खर्च करून कशाला रस्ता बांधायचा? या लोकांनाच उचलून मुख्य रस्त्यालगत नेले तर सर्व प्रश्न सुटला असता! आणि प्रत्येक रस्ता बांधत बसावा लागला नसता!"

दोन वर्षांपूर्वीचा हा संवाद आहे व श्री. जयवंत दळवींची सूचना कॅस्ट्रोने पूर्णपणे अमलात आणलेली मी पाहात होतो. त्यांनी वाड्या-वाड्यांवर राहणाऱ्या शेतकऱ्यासाठी मोठमोठ्या वसाहती बांधून चक्क स्थलांतर केले आहे व रस्त्यांचा खर्चही वाचविला आहे मग येथे राहिलेल त्यांचे काय, असे विचारले तेव्हा तो अधिकारी म्हणाला की ते वृद्ध आहेत. ते स्वर्गवासी होईपर्यंत तेथे राहतील. चांगल्या घरात राहणारी त्यांची मुले एक दिवसही येथे राहण्यास नंतर येणार नाहीत व माणसा-बरोबरच त्या झोपड्या पडतील. जुनाट खेडे मोकळे होईल. जमीन लागवडीखाली येईल.

हे खेडे ओलांडून आम्ही सहकारी सोसायटीच्या कार्यालयात गेलो, परंतु तिथे गेल्यावर लक्षात आले की ते तसे कार्यालय नव्हते. तो त्यांच्या दुपारच्या जेवणाचा हॉल होता. हे सर्व शेतकरी अजूनही नव्या सरकारी घरात राहण्यास गेलेले नव्हते. त्यामुळे ते आपल्या जुन्या घरातच राहात होते. सकाळी तिथून त्यांना सोसायटीच्या वाहनातून आणल्यावर त्यांना पुन्हा दुपारी जेवण्यास नेणे शक्य नव्हते. त्यामुळे कामाचा वेळही गेला असता. फक्त १५ कुटुंबातील ६० जणांची ही सहकारी शेती सोसायटी होती व हे ६० जण रोज दुपारी एकत्रितपणे या दालनात जेवत होते व सायंकाळी आपापल्या घरी जात होते.

त्या दालनात एका कोपऱ्यात ओसे मार्टी या त्यांच्या मुख्य क्रांति-कारकाचे चित्र होतेच. चे गुव्हेराचे अगदी तरुणपणीचे चित्र होते. लेनिन होताच. त्या छायाचित्राशेजारीच या सोसायटीने काढलेल्या उत्पन्नाचे फार चांगले तक्ते लावलेले होते. २८ डिसेंबर १९७० रोजी या सोसायटीची स्थापना झाली होती. ९९६ हेक्टर जमीन या ६० जणाच्या सोसायटीकडे होती. त्यांपैकी ६६९ हेक्टर्समध्ये ते ऊस लावत होते. या शेतकऱ्यात कृष्णवर्णीयाची संख्या अधिक होती. सगळेच बलवान होते. प्रत्येक हेक्टरमागे—म्हणजे अडीच एकरामागे ९० टन उसाचे उत्पादन निघते असे त्यांनी सांगितले. साखरेचे प्रमाण १२ टक्के. हिवाळ्यातही ते पीक घेतात तेव्हा साखरेचे प्रमाण १४ टक्के पडते. एक वर्ष जमीन पड ठेवणे वगैरे ते कधीच करीत नाहीत. या सोसायटीकडे कसलेही पाटाचे पाणी नव्हते. पूर्णपणे पावसावर याचा ऊस अवलंबून होता व वर्षभर आम्ही उसाचे उत्पादन घेत राहतो असे ते सांगत होते.

आम्ही सर्वजण जेवणाच्या टेबलाभोवतीच बसून बोलत होतो. सोसायटीचे चेअरमन, सेक्रेटरी आदींची रीतसर ओळख वगैरे करून देण्यात आली. त्यांनी स्वागत करतानाच भारतात भरणाऱ्या अलिप्ततावादी राष्ट्रांच्या परिषदेसाठी शुभेच्छा दिल्या. गतवर्षी जी परिषद हवानात झाली, तिचे अधिवेशन यंदा भारतात आहे, आपला नेता फिडेल तेथे जाणार आहे, याची पूर्ण माहिती बहुतेकाना होती. या १५ कुटुंबियांची खाजगी जमीन अजिबात नव्हती. खऱ्या अर्थाने ते छोटे शेतकरी होते. त्यानाही दर आठवड्याला चार पेसोदस् अॅडव्हान्स दिले जात होते. शेवटी तुम्हाला दर दिवसाला किती पेसोदस् उत्पन्न होते याचे उत्तर ७ ४९ पेसोदस् असे मिळाले. म्हणजे पुन्हा महिन्याला २५० पेसोदस्च्या आसपास तो शेतकरी पोहोचतो.

या सर्वांची खाजगी घरे होती, म्हणजे झोपड्या होत्या. झोपड्या-लगतही जमीन होती. ६६९ हेक्टर्समध्ये ऊस लावल्यावर उरलेल्या जमिनीचा उपयोग ते पशुखाद्याचे उत्पादन करण्यासाठी करीत होते. या सहकारी सोसायटीकडे ५९ गाई व ७१ डुकरे होती. सर्वत्र आम्हाला दोन आश्चर्ये पाहावयास मिळाली. येथील हवामान कोकणासारखेच आहे

नारळाची झाडे तशी सर्वत्र दिसतात. परंतु आम्ही नारळ मोठ्या प्रमाणावर लावतो अगर त्याचे उत्पन्न घेतो असे सांगणारा शेतकरी अगर बागाईतदार कुठेही भेटला नाही. तसेच कोंबड्यापालनाचे. कुठेही पोल्ट्री दिसली नाही. ती एका वेगळ्या भागात आहे असे आमचा मार्गदर्शक म्हणत होता. परंतु आता या ६० भागधारकांपैकी एकाकडेही कोंबड्या नव्हत्या. या सदस्यांचे एकूण जीवन समाधानाचे दिसले. त्याना दूध सोसायटी विनामूल्य दूध देत होती. तुम्ही कोंबड्या पाळल्या तर काय होईल ? एकजण ताबडतोब उत्तरला, " ठेवता येतील परंतु विकता येणार नाहीत ! " म्हणजे उत्पन्न व कोंबड्या कुणी व कशा वाटून घ्यायच्या याबद्दल त्याच्यात मतभेद होत असावेत.

सर्वांत समाधानाची गोष्ट म्हणजे या देलगादो सोसायटीचा प्रत्येक शेतकरी साक्षर होता. त्यात एक वृद्ध शेतकरी दिसला. पुन्हा तो गोरा होता, आणि कृष्णवर्णीय बोलत होते. म्हणून तो गप्प असावा असे वाटले. ते एक कारण होतेच, परंतु तो त्याच्यातील एक सधन शेतकरी होता त्याच्या स्वत च्या जमिनीचे त्याला वार्षिक १५०० पेसोदस् उत्पन्न येत होते. सर्वांसमोर मग ही माहिती त्यानी आम्हाला दिली. त्याच्या कुटुंबात सहाजण होते. त्याचा मुलगा इंजिनियर होता, दुसरा नत्रज्ञ होता. ते बाहेर नोकऱ्यात होते. कार्यक्रम संपल्यावर तो आपली खाजगी मालकीची गाडी घेऊन झटकन निघून गेला. इतराकडे स्वत च्या मोटारी नव्हत्या. परंतु बाहेर सामुदायिक मालकीचे ट्रॅक्टर्स उभे होते ज्या शेतकऱ्याना ट्रॅक्टर्स घेणे कधीच शक्य झाले नसते त्याच्या सेवेसाठी सरकारने उपलब्ध करून दिलेले २९ ट्रॅक्टर्स बाहेर उभे होते. १९७९ मध्ये फक्त दोन ट्रॅक्टर्स या सोसायटीकडे होते. क्रांतीनंतर विरोधकानी बऱ्याच अडचणी उपस्थित केल्याने व दोन वर्षे पाऊस न पडल्याने शेतकरी अडचणीत आले. १९८२ मध्ये या ६० जणाच्या सहकारी सोसायटीने १७,३९५ टन उसाचे उत्पन्न काढले. पाऊस कमी पडल्याने ते कमी आले. यंदा त्याची अपेक्षा एकदम ४५ हजार टनाची आहे. दक्षिण महाराष्ट्रातील ऊस बागायतदार यामधील गुणदोष चटकन समजू शकतील. जवळच्या साखर कारखान्यातच हा सर्व ऊस जातो. क्युबात एकूण साखर कारखाने लहान-

मोठे मिळून १५२. त्याचे १९८२ चे एकूण उत्पन्न ८० लाख टन. त्यामधील ८५ टक्के साखर निर्यात केली जाते. साखर, तंबाखू, कॉफी या तीन वस्तूंच्या निर्यातीभोवती क्युबाचे शेतीप्रधान अर्थकारण गुफलेले आहे. त्यात साखर महत्त्वाची. पुढील प्रकरणात साखरेच्या क्युबाचे, देशांतर्गत बाजारपेठेचे व रशियासह अनेक देशांशी चाललेल्या व्यापाराचे चित्र रेखाटण्याचा प्रयत्न मी केला आहे. तत्पूर्वी या शेतकऱ्याना वाड्यावाड्यांवरून उठवून नव्या घरात कसे आणून ठेवले आहे, त्यांचे स्थलांतर या नव्या घरात करताना कोणत्या अडचणी आल्या, त्याची माहिती आधी देतो.

## सुंदर वसाहत

हवानापासून १०० पेक्षा अधिक किलोमीटर्स अंतरावरील सिएन् फुएगास् या गावी आम्ही एक रात्री मुक्कामाला होतो. सुंदर समुद्रकिनारा या गावाला लाभला आहे. क्युबात तसा समुद्रकिनाऱ्याचा तुटवडाच नाही.तरीही काही ठिकाणी त्याचे रूपांतर त्यांनी पर्यटनकेंद्रात केले आहे. या किनाऱ्यावरचे हॉटेल गोव्यातील कळंगुट किनाऱ्यावरील हॉटेलसारखेच होते. या पर्यटन केंद्राजवळच्याच शेतकऱ्यांच्या एका नव्या वसाहतीला आम्ही भेट दिली. आपल्याकडे गृहनिर्माण मंडळे बांधतात तशीच घरे. लांबलचक. फरक फक्त बांधकामाच्या गुणवत्तेचा, आणि आतील सुविधांचा. ह्या इमारतीत राहणारे शेतकरी पूर्वी कसे राहात होते, याचा नमुना म्हणून त्याच जागेवर पूर्वी असलेली एक झोपडी तिथे लोकांना पाहण्यास ठेवली आहे. आपल्या कोकणातील कुणब्याच्या कोणत्याही झोपडीसारखीच ती होती.

ही घरे बांधून झाल्यावर समाजकार्यकर्ते शेतकऱ्याना येथे घेऊन आले. ज्या तरुणीने त्या वेळी या स्थित्यंतरात भाग घेतला, ती तिथे माहिती देण्यास हजर होती. शेतकरी आपली परंपरागत घरे सोडायला तयार नव्हते तेव्हा या कार्यकर्त्यांनी स्त्रियांना तेथे आणले व त्यांना घरे दाखविली. या घरात सरकारने प्रत्येकाला दूरदर्शन सेटपासून कपडे धुण्याच्या यंत्रापर्यंत सर्व दिले होते. स्त्रिया ते पाहून खूष झाल्या. त्या राहण्यास तयार झाल्या. घरातील तरुणतरुणी तयार झाल्या. ती कार्यकर्त्री आम्हाला म्हणाली की, या शेतकऱ्यांना संडास कसे वापरायचे तेही समजावून द्यावे लागले !

आपल्याकडे उद्या असे वाड्यांवरचे शेतकरी एखाद्या वसाहतीत आणले तर हे मार्गदर्शन त्यांनाही द्यावे लागेल, आणि त्यात कमीपणाचा भाग नाही. देश एक आहे, जमीन देशाची आहे, आपण एकत्र येऊन काम केले, एकत्र येऊन राहिलो तर विकास वेगाने होऊ शकतो हे तत्त्व स्वीकारण्याचा फक्त प्रश्न आहे. प्रत्येक रस्त्याला दोन लाख, प्रत्येक वाडीसाठी वीज व त्याचे खांब, याऐवजी सर्वजण रस्त्यालगत आले तर काय बिघडेल ?

आम्ही ज्या सहकारी शेती सोसायटीला भेट दिली तेही आता एका नव्या वसाहतीत राहावयास जायचे होते. त्याच्या मुलांना आजच सरकारी बस साखर कारखान्याजवळ असलेल्या शाळेला नेते व सायंकाळी परत आणते. या शेतकऱ्यांना बस रोज घेऊन जाणार व आणणार ! शाळा विनामूल्य, रुग्णालय विनामूल्य, घर बिनामूल्य. बदल्यात राहत्या घराची जागा घरासह सरकारला द्यायची. जमीन सोसायटीला द्यायची. अधिक असेल तर स्वत: कसायलाही हरकत नाही. आमचा कोकणचा शेतकरी चार वीत जमिनीसाठी अर्धी हयात कोर्टात घालवतो. एक तुकडा इकडे, दुसरा तिकडे कसत राहतो. आधुनिक यंत्रे त्याच्याजवळ नसतात. त्या वैतागातूनच भांडणे जन्माला येतात परंतु शेवटी फिडेल कॅस्ट्रो नावाचा नेता तेथे तयार व्हावा लागला की ज्यांनी सर्वांना कामाला लावले. आज क्युबाचा शेतकरी आधुनिक सुविधा उपलब्ध असलेल्या घरात राहतो आहे हे मी प्रत्यक्ष पाहिले. दरवर्षी १५ हजार घरे बांधण्याचा विक्रमी कार्यक्रम (देशाच्या आकाराच्या संदर्भात) त्यांनी घेतला आहे. सिमेंटचे चार मोठे कारखाने क्युबात आहेत. पुन्हा देणग्या मागणारी प्रतिष्ठाने नाहीत. जकात-चोरीचा पैसा गुंतविणारे बिल्डर्स नाहीत देश हे एकच प्रतिष्ठान व त्यात राहणाऱ्या सामान्य माणसाची समृद्धी हीच प्रतिष्ठा असे एकदा मानले की, लोक पिढ्यान्‌पिढ्यांची जुनी घरे सोडायला तयार होतात. परिवर्तन घडते आहे हे त्यांना दिसत असते. हा विश्वास फिडेल कॅस्ट्रोनी निर्माण केला. हे त्यांचे यश आणि म्हणून महाराष्ट्राइतकी साखर बनविणाऱ्या क्युबात साखर-सम्राट निर्माण झाले नाहीत भोगवादी संस्कृती ९० मैलावर असूनही ओसे मार्टी या देशभक्ताचा आदर्श त्यांना अधिक प्रिय झाला !

# ४

०००००००००००००००००००००००००००००००००००००

## साखरेचा देश क्युबा

पासष्ट कोटी लोकसंख्येच्या विशाल भारतात एकूण साखर कारखाने ३२० तर एक कोटी लोकसंख्येच्या क्युबात १५२ साखर कारखाने ! मॉरिशस्, होनेलुलु, क्युबा ही बेटे म्हणजे उसाचे मळे आहेत. ऊसमळ्यात काम करण्यासाठी गेलेल्या मजुरानी हे देश घडविले. फिडेल कॅस्ट्रो, चे गव्हेरासह जेव्हा ग्रॅन्डमा या बोटीने शेवटचा क्रांतिलढा करण्यासाठी क्युबाच्या किनाऱ्यावर उतरला व सिएरा मेस्त्राच्या जंगलात, डोंगररांगांत लपला तेव्हा या सर्वांचे मुख्य खाणे ऊसच होते. ऊस खाऊन त्याचा चोथा टाकीत जे बडखोर गेले त्यांना बातिस्टाच्या सैनिकांनी पकडले. ऊस हा क्युबन माणसाचा आधार आहे व आज साखरेच्या निर्यातीवर क्युबाने आपले अर्थकारण उभे केले आहे.

क्युबातील या १५२ साखर कारखान्यानी गतवर्षी ८० लाख टन साखर निर्माण केली तर सबंध भारताचे गतवर्षीचे उत्पादन तितकेच होते. याचा अर्थ इतकाच की, तामीळनाडूच्या आकाराचा क्युबा जितकी साखर निर्माण करतो, तितकीच साखर सबंध भारतात निर्माण होते. क्युबाने फक्त २० लाख टन साखर स्वदेशासाठी ठेवून बाकीची सर्व साखर त्रिखंडात पाठविली. त्यानी सर्व खाल्ली असती तर मधुमेह तर झाला असताच, परंतु आज रशियाकडून जी आर्थिक व तांत्रिक मदत ते मिळवीत आहेत तीही त्याना मिळाली नसती. पुन्हा क्युबा निर्यात करताना

कच्ची साखर निर्यात करतो. त्यामुळे वरचा प्रक्रियेचा खर्चही ते करीत नाहीत ज्या वेळी मी क्युबात गेलो, त्याच वेळी हवानात ऊसतंत्रज्ञांची १८ वी आतरराष्ट्रीय परिषद भरली व त्यानिमित्ताने जागतिक साखर-उत्पादनात क्युबा कसा अग्रेसर आहे हे पाहावयास मिळाले. दर तीन वर्षांनी ही परिषद भरते. १९८३ ची परिषद भारतात भरावी म्हणून प्रयत्न झाले. परंतु या परिषदेने मतदान घेतले तेव्हा क्युबाला एक मत अधिक मिळाले व क्युबाला तो मान मिळाला. १९८६ मध्येही भारतात ती भरणार नाही. या वेळी इंडोनेशियाने तेथे असा प्रचार केला की, भारताचे कुणी नावही घेतले नाही भारतातून २१ प्रतिनिधी तेथे आले होते. त्यात भारत सरकारचेही अधिकारी होते, परतु एकही मंत्री नव्हता. या अधिकाऱ्याना स्वत च्या प्रवासाची परवानगी मिळवितानाच इतके कष्ट पडलेले होते तर परिषद भरविण्याची परवानगी भारत सरकारकडून ते कुठून मिळविणार ? श्रीमती गाधींचा संबंध असलेल्याच आतरराष्ट्रीय परिषदाना भारतात स्थान आहे, तात्रिक परिषदाकडे कोण पाहतो, असेही उद्गार एका भारतीय प्रतिनिधीने तेथे काढले.

पुन्हा या हवानातील परिषदेचे उद्घाटन करण्यासही राष्ट्राध्यक्ष फिडेल कॅस्ट्रो आला नाही. त्याच्याऐवजी क्युबाचे साखरमंत्री रिओक्लेस् गोन्झालेस् यानी उद्घाटन केले. त्याच्याकडे साखरेकरिता खरोखरच वेगळा मंत्री आहे; आणि त्यानेही आपल्या उद्घाटनाच्या भाषणात एकदाही फिडेल कॅस्ट्रोचे नाव घेतले नाही. महाराष्ट्र साखरसघाचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब विखे पाटील, याच्यासह एकूण पाच प्रतिनिधी महाराष्ट्रातून तेथे आलेले होते. त्यात साखरसघाचे कार्यकारी संचालक श्री. मो. स मराठे हेही होते. या सर्वांशी झालेल्या चर्चेतून साखर व्यवहाराचे जे स्वरूप मला जाणवले ते येथे देत आहे. महाराष्ट्रात तर शुगर लॉबीच्या हाती राजकारण आहे. ते त्याच्या हाती राहू नये व जाऊ नये असे श्रीमती गाधींना वाटते. परतु जगाच्या एकूण साखर उलाढालीत आपली साखर कुठे आहे व क्युबाची कोणत्या स्तरावर आहे याचे आपले गणित तपासून पाहावयास हवे.

आज जगात सर्वांत चागली साखर ऑस्ट्रेलियात निर्माण होते दुसरा क्रमाक दक्षिण आफ्रिकेचा आहे, परतु उत्पादनात क्युबा आघाडीवर आहे.

साखरेची जागतिक बाजारपेठ क्युबा नियंत्रित करते व त्यांना समाजवादी देश उत्तम किंमत देतात. त्या मानाने भारत अतिशय स्वस्तात परदेशाना साखर विकतो आज भारताच्या शुभ्र दाणेदार साखरेला परदेशात किलोला सहा ते सात सेंट फक्त भाव मिळतो तर त्याच्या पाचपट दर समाजवादी देश क्युबाला देतात. रशिया क्युबाची कच्ची साखर किलोला ३५ सेंट या दराने घेतो. पाच कोटी पोती साखर निर्यात होते असे धरले तर पोत्यामागे ७०० रुपये या दराने ३५० कोटी डॉलर्सची साखर दरवर्षी निर्यात करणारा तामीळनाडूपेक्षा लहान असलेला क्युबा पाहिल्यावर आमच्या अकार्यक्षमतेचे कोणते समर्थन आम्ही करणार आहोत असा प्रश्न प्रत्येकाला पडेल असे वाटते. हवामानाचा प्रश्न कुणी काढू नये कारण भारत हा देश असा आहे की, जगातील सर्व तऱ्हेचे हवामान या देशात आहे. बिहार व उत्तर प्रदेश हे प्रांत क्युबापेक्षा कितीतरी मोठे. तेथे नद्यांचे भरपूर पाणी व पाऊसही चांगला आहे. परंतु १९८२ मध्ये जे ८० लाख टन साखरेचे उत्पादन भारतात झाले त्यात महाराष्ट्राचे ३० लाख टन, उत्तर प्रदेशाचे २२ लाख टन तर बिहारचे फक्त ६ लाख टन उत्पादन आहे. महाराष्ट्रातील एक नगर जिल्हा सरासरी आठ लाख टन साखरेचे उत्पादन करतो, जे बिहार राज्यापेक्षा अधिक आहे. यावरून क्युबापेक्षा मोठी अशी उत्तर प्रदेश व बिहार ही राज्ये साखरेच्या बाबतीत किती मागे आहेत ते कळून येते. आता-पर्यंत या उत्तरेतील प्रांतांचा साखरउताराही कमी होता. श्री. जगजीवनराम हे १९४७ पूर्वीपासून केंद्रीय मंत्रिमंडळात, शेती मंत्रीही झाले, परंतु त्यांनी बिहारच्या कमी उताऱ्याच्या उसाला जास्त दर देण्याचे फक्त काम केले. दिल्लीपासून ७० किलोमीटर्सवर दिल्ली क्लॉथ् मिल् उद्योगसमूहाने दौराला येथे एक साखर कारखाना काढला आहे. तो उत्तर प्रदेशात येतो व तेथील उसाचा उतारा ११.८० पर्यंत मिळाला आहे. एका खाजगी साखर कारखान्याने केलेली ही प्रगती आहे. भारतातील इतर राज्ये फक्त पाच ते सहा लाख टन साखर निर्माण करतात. यावरूनच आंतरराष्ट्रीय साखरक्षेत्रात आपला क्रमांक देशाच्या आकाराच्या मानाने खूप मागे आहे हे लक्षात यावे.

क्युबाच्या या परिषदेत युरोपातील राष्ट्रे नव्हती. कारण ती बीटपासून

साखर करतात व ही परिषद ऊस-तत्रज्ञाची होती. युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटी ही १९७० पर्यंत भारतापासून अनेकांकडून साखर आयात करीत होती. तेच १९८० मध्ये दुसऱ्या क्रमांकाचे निर्यातदार झाले. ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी ही सर्व राष्ट्रे आज बीटपासून साखर बनवितात व ती निर्यात करतात त्यामुळे जगात ऊस लॉबीला स्पर्धा करणारी ' बीट लॉबी निर्माण झाली व या बीट लॉबीने ऊस लॉबीला आज हरविले आहे. अरब व त्यांचे तेल यानी जगाच्या अनेक बाजारपेठाना हादरे दिले. अरब राष्ट्रे जोपर्यंत मोठ्या प्रमाणावर साखर खरेदी करीत नव्हती तोपर्यंत १० टक्केच शुभ्र दाणेदार साखर बाजारात येई व ९० टक्के कच्ची साखर निर्यात होई आता ते प्रमाण ३३ टक्के झाले व त्यात बीटची शुभ्र साखर अधिक खपते. त्यात फ्रुक्टोजचे उत्पादन सुरू झाले. अमेरिकेची साखरेची २० टक्के बाजारपेठ फ्रुक्टोजने गिळंकृत केली व आज जपान आणि कॅनडा साखरेऐवजी फ्रुक्टोजचा उपयोग करतात. आतरराष्ट्रीय साखर करारात एकीकडे युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटीतील राष्ट्रे नाहीत व दुसरीकडे अमेरिका, कॅनडा, जपान कमी साखर घेते. याचा आपोआप परिणाम क्युबा-रशिया मैत्री वृद्धिंगत होण्यात झाला तर दोष कुणाला द्यायचा? आज आपले पुण्यवान भारतवर्ष फक्त सहा ते सात लाख टन साखरेची निर्यात करते. त्यातही आपल्याला शुभ्र दाणेदार साखरेला जो दर मिळतो, त्याच्या पाचपट दर रशिया क्युबाला कच्च्या साखरेला देतो. काहींना वाटेल की हे आकडे कागदावरचे असतील. परंतु तसेही नाही. क्युबाचे जे यांत्रिक आधुनिकीकरण आज रशिया करतो आहे, त्यात हे साखरेचे पैसे वसूल होत आहेत. हवानात एकाच हॉटेलात महाराष्ट्राचे साखरतज्ज्ञ व मी राहात होतो तेथे ही चर्चा चाले. त्या वेळी एकजण म्हणाले, " गतवर्षी भारताने साखर आयात केली होती, याचेही लोकाना स्मरण करून द्या!"

क्युबा कम्युनिस्ट आहे यावर चर्चा करण्यापेक्षा क्युबा इतकी साखर कशी बनवतो व आम्ही का बनवत नाही याची चर्चा व्हावयास हवी. ती करायला कुणाला वेळ आहे? पुन्हा राजकीय हितसबंध बाजूला ठेवून निर्णय घ्यायला हवेत. ते भारतात घेतले जाणार नाहीत. लोकशाहीशी

त्याचा काही संबध नाही. संबंध मूठभराच्या सत्ताशाहीशीच आहे आर्थिक विचारसरणीशी आहे. क्युबात आम्ही हिंडत असताना जागोजाग साखर कारखाने दिसत होते त्यापैकी पेपितो तेय् शुगर मिल'ला आम्ही भेट दिली.

साखर कारखान्याच्या बाहेर आमची मोटर थांबली तेव्हा वास व वातावरण हे दोन्ही दक्षिण महाराष्ट्रातील कोणत्याही साखर कारखान्याला साजेसेच होते. आपल्याकडे ऊस घेऊन आलेल्या बैलगाड्या अधिक दिसतात तिथे ट्रक्स होते. आपल्याकडेही ट्रक्सचा वापर होतो १५ किलोमीटर्सवरून साधारण ऊस येतो. आतमध्ये फोटो काढता येणार नाहीत असे दरवाज्यावरच सांगितले. समोर बंदरात रशियन बोट उभीच होती रोजचे उत्पादन दोन ते तीन हजार टन या साखर कारखान्यात होते. ४५० कामगार या कारखान्यात काम करतात. कारखान्याची एकूण रचना आपल्या साखर कारखान्यासारखीच आहे. संबंध कारखाना हिंडून आम्ही पाहिला. परत आल्यापासून प्रत्येकजण मला एकच प्रश्न विचारत होता. "तेथील व आपल्याकडील साखर कारखान्यात तुम्हाला फरक कोणता दिसला ?" त्याचे एकच उत्तर मी देत आलो. तेथे मी साखर कारखाना पाहिला, परतु मला कुठेच साखर दिसली नाही. करण ती पाईप लाईनमधून सरळ बोटीवर जात होती. एका बाजूला यंत्रे, दुसऱ्या बाजूला बोट आणि आम्ही मध्ये उभे असे ते दृश्य होते. सर्व १५२ साखर कारखाने हे देशाच्या मालकीचे असल्यामुळे चार कारखान्यांचे उत्पादन देशाला व बाकीचे सर्व निर्यातीसाठी अशी सरळ विभागणी त्यांनी केलेली होती. ही सर्व साखर एकेकाळी अमेरिकेत जात होती, तेथे ती शुभ्र केली जात होती. त्याऐवजी ती आता रशियाला जाते. परतु दोनमध्ये मोठा फरक असा की, त्या साखरेचे पैसे साखर कारखान्याच्या अमेरिकन मालकाच्या खिशात जात होते, ऊस उत्पादकाना योग्य दर मिळत नव्हता. आज रशियातून येणारे पैसे तळातील ऊस शेतकऱ्याच्या खिशात जातात हा त्याना जाणवणारा फरक आहे.

१९६९ मध्ये ७९ लाख ७२ हजार टन निव्वळ ऊस पिकला. क्युबाच्या इतिहासातील तो उच्चांक होता. साखर कारखान्याचे आधुनिकी-

करण करण्याचा प्रयत्न सरकारने मोठ्या प्रमाणावर केला. अमेरिकन भाडवलदारानी या कारखान्याचे आधुनिकीकरण कधीच केले नाही. आपल्या हाती ते राहणार नाहीत अशी त्यांना खात्री असावी. कॅस्ट्रोच्या सरकारने १०० कोटी पेसोदस् त्यात ओतले. ४० साखर कारखान्याचे आधुनिकीकरण केले, उत्पादनक्षमता वाढविली, आठ नवे कारखाने प्रस्थापित केले, त्यांपैकी चार सुरू झाले. ऊस आणण्यासाठी रेल्वेमार्ग बाधले व चार नवे मोठ्या प्रमाणावर साखर निर्यात करणारे धक्के बदरात बाधले. ऊस लागवड सहकारी क्षेत्रात व साखर कारखाने सरकारी क्षेत्रात अशी वाटणी करून दोघाचा समन्वय साधण्याचा प्रयत्न शेतीखात्याने केला. ऊस लागवडीचे क्षेत्र वाढविले यात नवल नव्हते, परतु त्यानी १० नव्या उसाच्या जाती आणल्या व त्यामुळे उत्पादन वाढले.

शेती व शिक्षण या दोन्ही खात्याचे मंत्री एका टेबलावर बसून अभ्यासक्रम आखतात असे चित्र तुम्ही कधी पाहिले आहे काय ? आम्ही क्युबात मंत्र्याना पाहिले नाही, परंतु दोन्ही खात्यांच्या मुख्य सचिवाना एकत्र पाहिले व एकत्र भेटलो. १५२ साखर कारखान्याना जो कामगारवर्ग हवा, तत्रज्ञ हवेत त्याच्यासाठी अभ्यासक्रम कोणते असावेत ह्याचा विचार दोघांनी एकत्रितपणे केला होता. ४५ हजार विद्यार्थ्यांची सोय असलेली ७५ पॉलिटेक्निक्स त्यानी केवळ साखर धंद्यासाठी स्थापन केली होती. त्यापैकी २६ संस्था तर गेल्या पाच वर्षांत स्थापन झालेल्या होत्या. चार विद्यापीठांत साखर-तंत्रज्ञानांचे अभ्यासक्रम त्यांनी सुरू केले. त्याशिवाय एक देशव्यापी नॅशनल ट्रेनिंग सेंटर फॉर शुगर इंडस्ट्री त्यानी नव्याने बाधले.

या साखर कारखान्यातील कामगाराच्या वेतनश्रेणी सुधारणे आवश्यक होते. आपल्याकडे कुणी कारखाना पाहण्यास आले तरी काही ठरावीक माणसे उत्तर देण्यासाठी तयार ठेवलेली असतात. त्यांच्याकडे ती होती. तेथील एक कामगार म्हणाला की, क्रातीपूर्वी कामाचे तास ठरावीक नव्हते. २०-२० तास आम्हाला राबावे लागे, तरीही कमी पैसे मिळत. आठवड्याची सुटी नव्हती. क्रातीनतर आधी साप्ताहिक सुटी, १५ टक्के वेतनवाढ, रात्रपाळी करणाऱ्यास अधिक वेतन, उत्तम काम करणाऱ्यास

जादा वेतन हे सर्व सुरू झाले. आमच्या अंगावरचे फाटके कपडे गेले. गळित हंगामाच्या दिवसात सतत काम करणाऱ्यांना जास्त पैसे दिले जातात. शेवटी आपले हित अधिक काम करण्यात आहे, असा विश्वास त्याच्यात निर्माण केला व त्यामुळे उत्पादन सहजपणे वाढले. हंगाम चालू असताना १५० दिवस न थांबता काम चालेल अशी यंत्रणा त्यांनी उभी केली आहे. महाराष्ट्रातील साखर कारखान्यांना हे काही नवे नाही, परंतु आपल्याकडे साखर कारखान्याचेही राजकारण झाले, उत्पादनापेक्षा निवडणुका महत्त्वाच्या ठरल्या व त्यासाठी लाखो रुपये खर्च होऊ लागले. ते पैसे मग वसूल करण्यासाठी गैरव्यवहार सुरू झाले व त्यात शेवटी कारखाने कर्जात बुडाले. पुन्हा ते कर्ज जिरवावे लागते ते मुख्यत्वे ऊस उत्पादकाना.

१९८० मध्ये क्युबा कम्युनिस्ट पक्षाचे दुसरे देशव्यापी अधिवेशन हवानात भरले तेव्हा फिडेल कॅस्ट्रोने एकूण प्रगतीचा व दोन हजार साली क्युबाचे स्वरूप कसे असेल याचा आलेख लोकापुढे ठेवला. त्यात सर्व चर्चा शेती, बागायत, निर्यात व्यापार व सर्वसामान्याचे वेतन याचीच आहे. आकडेवारीचा पाऊस त्यात नाही व निश्चित धोरणे कॅस्ट्रो जाहीर करतो. आपल्या देशात काय करायच हेच ठरत नाही. उत्तर भारतातील साखर धंद्याला राजकीय कारणासाठी सरक्षण दिले जाते. मग त्यानी साखरेचे उत्पादन किती कमी केले याचाही विचार ते करीत नाहीत.

आपल्याकडे लोकसंख्येमुळे माणसे भरपूर उपलब्ध. क्युबाच्या एक कोटी लोकसंख्येतही पुरुषांचे प्रमाण कमी पडते. क्रान्तीत माणसे मारली गेली. सैन्यात मोठ्या प्रमाणावर पुरुष आहेत. त्यामुळे स्त्रियाना सर्वत्र बरोबरीचे स्थान तेथे आहे. महाराष्ट्रातून आलेले साखर कारखानदार क्युबातील दोन साखर कारखाने पाहण्यास गेले. तेथे त्यांना आधी कामगार कमी दिसले व जे दिसले त्यात स्त्रिया अधिक होत्या. महाराष्ट्रातील साखर कारखान्यात पॅनभर् पुरुष आहेत, तेथे स्त्रिया दिसल्या. तेथे मिलवरच फक्त पुरुष दिसले, असे श्री. विखे पाटील म्हणाले.

दि. ६ ऑगस्ट १९६० रोजी फिडेल कॅस्ट्रोच्या नव्या क्रान्तिकारी सरकारने साखर धंद्याचे राष्ट्रीयीकरण केले. साखर कारखाने सरकारच्या ताब्यात घेतले व ऊस उत्पादन सहकारी क्षेत्रात ठेवले. क्युबात आजही

३५ हजार छोटे बागाईतदार असे आहेत की जे आपल्या मालकीच्या खाजगी जमिनीत ऊस पिकवतात. २ लाख ५० हजार हेक्टर्स जमीन त्याच्याकडे असून दरवर्षी १० लाख ४० हजार टन साखर निर्माण होऊ शकेल इतका ऊस ते सरकारी कारखान्याला देतात क्युबाचे एकूण वार्षिक ऊस उत्पादन ७ कोटी टन आहे व ते १७ लक्ष हेक्टर्स जमिनीतून येते. आज क्युबन उसाचा उतारा १२ टक्के आहे. प्रत्येक हेक्टरमधून ५२ टन ऊस सरासरी पिकतो, काही ठिकाणी ते प्रमाण ७७ टनापर्यंत आहे. एक हेक्टर म्हणजे चार एकर या हिशेबाने, एकरी उसाचे उत्पन्न निदान १३ ते १५ टन येते. उसाची दोन पिके क्युबा वर्षात घेते. एक उन्हाळ्याचे व दुसरे थंडीचे. आता ४० सेंटिमीटर्स खोल पेरणी केली जाते. त्यासाठी अत्याधुनिक पद्धतीने नागरणी क्युबन शेतकरी करतो. आज या धंद्याचे क्युबाने पूर्ण आधुनिकीकरण केले आहे. यंत्रे आली तर माणसाचे काय होणार हे गणित मांडीत बसल्यानेच बिहारसारख्या राज्यात सहा लाख टन साखर निर्माण होते. साखर मंत्र्याच्या अखत्यारीत आज ऊस, साखर, सबधित उद्योग याच्या ४०० कंपन्या आहेत. ४ लाख ५० हजार कामगार, तंत्रज्ञ, इंजिनिअर्स यात गुंतलेले आहेत. त्यात ३५ हजार तंत्रज्ञ आहेत, १ लाख कुशल कामगार आहेत, ४ लाख ४२ हजार हेक्टर्स जमिनीला आज पाटबंधाऱ्याचे पाणी मिळते. १९८५ मध्ये ते ६ लाख हेक्टर्सना द्यायचे आहे. ही जबाबदारी या मंत्र्याचीच आहे. नॅशनल अॅसेंब्लीला दर सहा महिन्यांनी काय झाले, काय झाले नाही, का झाले नाही याचा खुलासा साखर मंत्र्याना करावा लागतो आज त्या देशात १७ लक्ष हेक्टर्स जमिनीत ऊस पिकतो, १९८५ पर्यंत ते क्षेत्र १८ लक्ष ५० हजारावर नेण्यात येईल तर १९९० मध्ये २० लक्ष १० हजार हेक्टर्स क्षेत्रात ऊस पिकेल.

क्युबाचा पुरा ऊसमळा झालेला असेल. ऑस्ट्रेलिया व दक्षिण आफ्रिकेशी स्पर्धा करण्याच्या पवित्र्यात क्युबा उभा आहे. आणि त्याच्या पाठीशी समाजवादी देश आहेत.

आळशाच्या अंगावरून येथे गंगा जाते आहे, आणि आमच्या पाठीशी खरोखरच कोण आहे?

# ५

# क्युबाची सहावी संवेदना

उसापासून साखर, बॅगॅसपासून कागद, अल्कोहोलपासून रम ही या क्षेत्रातील उद्योगांची विविध रूपे या दौऱ्यात आम्ही पाहिली. या हवानातील साखर परिषदेस उपस्थित राहून श्री. बाळासाहेब विखे पाटील यानी तर खूपच स्फूर्ती घेतली व भारतात परत आल्यावर त्यानी मराठवाड्यात सिकॉम्-तर्फे उभ्या होत असलेल्या २२५ कोटींच्या कागद कारखान्याच्या उभारणीत फार मोठा भाग घेतला आहे. एक लाख टन कागदाचे उत्पादन या कारखान्यात दर महिन्याला होईल व त्यामध्ये २० हजार टन न्यूजप्रिंटचे तर ५० हजार टन सफेद कागदाचे उत्पादन असेल. मराठवाड्यातील व नगर जिल्ह्यातील साखर कारखान्याचा बॅगॅस या कारखान्यात उपयोगात आणला जाईल. जयसिंगपूरचे श्री. अप्पासाहेब पाटीलही या साखर तज्ञाच्या परिषदेस आले होते. त्याच्या सहकारी साखर कारखान्यातर्फेही कागदनिर्मितीचा कारखाना त्यांनी क्युबाहून परत आल्यावर सुरू केला. शेवटी क्युबासारख्या छोट्या व कम्युनिस्ट राष्ट्राने जे आधी केले ते आपण आता करीत आहोत. क्युबात एकच न्यूजप्रिंट कारखाना आहे, परंतु पांढरा शुभ्र, न्यूजप्रिंट वृत्तकागद ते बनवितात. आपल्या नेपा कारखान्यात पिवळा कागद बनतो तसा ते बनवीत नाहीत.

मुख्य प्रश्न कॉस्टिक सोड्याचा. कॉस्टिक सोडा जास्त वापरल्याने प्रदूषण वाढते, त्यामुळे कागद कारखान्यांच्या वाढीस भारत सरकारने प्रोत्साहन दिले

नाही. लहान कारखान्यांना तर तो कॉस्टिक सोडा नतर पुन्हा काढूनही घेता येत नाही. क्युबाच्या न्यूजप्रिंट प्लँटने हे यश मिळविले व श्री. विखे पाटील तर म्हणाले की, मराठवाड्यातील प्लँट क्युबाच्या धर्तीवर निघावा अशी आमची खटपट आहे. भारतीय वृत्तपत्रांना आज परदेशातून कागद मोठ्या प्रमाणावर आयात करावा लागतो व त्यासाठी केंद्र सरकारच्या दारी तिष्ठत उभे राहावे लागते. ३५ वर्षांच्या स्वातंत्र्यकाळात वृत्तपत्राना चागला स्वदेशी कागदही या देशात उपलब्ध होऊ शकला नाही. आणि आम्ही परदेशी कागदावर देशाच्या स्वातंत्र्यावर व स्वयंपूर्णतेवर लिहायचे !

**'रम' च्या कारखान्यात**

बॅगॅसपासून जसा कागद तशी अल्कोहोलपासून जी रम क्युबात बनते तिला तोड नाही. आज 'हवाना क्लब रम' जगभर लोकप्रिय आहे. हवाना क्लब रमपासून आपण वंचित झालो हेच आज अमेरिकन लोकाचे दु:ख आहे. अमेरिकन लेखक अर्नेस्ट हेमिंग्वेचीही ही हवाना क्लब रम अतिशय प्रिय होती. पिकादुरा खोऱ्याच्या सहलीवर असताना सांतामारिया नावाच्या गावीच या क्युबातील हवाना क्लब रमच्या कारखान्याला भेट देण्याची सधी पत्रकारांना मिळाली. आता या कारखान्याची तांत्रिक माहिती देणे म्हणजे त्या सुरम्य रमचा उपमर्दच आहे. प्रत्येक मिनिटाला येथे १२० बाटल्या तयार होत होत्या. क्युबात ११ रमचे कारखाने आहेत. या कारखान्याला रोज १०० लाख लिटर्स अल्कोहोल लागतो. दरवर्षाला तीन कोटी लिटर्स रम या कारखान्यात होत होती व तिलाही पुन्हा मोठे गिऱ्हाईक साम्यवादी राष्ट्राचे. ते याबाबतीत भाग्यवानच म्हणावयास हवेत. या कारखान्यात आम्ही हिंडलो, तीन ते सात वर्षांपर्यंत परिपक्व करीत ठेवलेली रमची पिंपे पाहिली व मग एका चागल्या आरामगृहात आलो. रमवरची शुष्क चर्चा सपली आणि आम्ही 'रम'माण झालो.

तेथील अधिकाऱ्याने 'द बारमेन्स सिक्स्थ सेन्स' या नावाचे एक सुंदर पुस्तक आमच्या हाती दिले. समोर त्या 'रम'वर बनविलेल्या कॉकटेल्स टेबलावर येऊन स्वार झालेल्या आणि हातात ती 'कॉकटेल्स' कशी बनवायची याचे रंगीबेरंगी चित्रातील वर्णन. या पुस्तकात अर्नेस्ट हेमिंग्वेचे एक दुर्मिळ

छायाचित्र होते. त्यावर त्याने आपले नाव 'अर्नेस्टो' असे क्युबन (स्पॅनिश) पद्धतीने लिहिलेले आहे. 'मॅन ॲन्ड द सी' लिहिणाऱ्या हेमिंग्वेला क्युबाच्या निळ्या समुद्रानी, किनाऱ्यानी व रम-रमीनी भुलविले यात कशाचेच नवल नाही, कारण खरोखरच हे सारे आजही सुंदर आहे.

हेमिंग्वेच्या वडिलाची शेती क्युबातच होती. अर्नेस्टोच्या वडिलानेही आत्महत्या केली. त्यानंतर हा महान लेखक पित्याच्या शेतावर काही वर्षे काम करीत राहिला. तिथे त्याने दोनशे कबुतरे पाळली. हवानापासून नऊ मैलावर ही शेतीवाडी होती. तिथे त्याने केळ्यांची लागवड केली होती व चौथ्या बायकोबरोबरचा त्याचा संसार व लेखन एका मनोरेवजा बंगल्यात राहून तो करीत होता. हेमिंग्वेला नोबेल पारितोषिक मिळाले तेव्हा तो क्युबातच राहात होता.

परंतु एक दिवस त्याने क्युबा सोडले. हिंस्र श्वापदाच्या शिकारीचा नाद असलेल्या हेमिंग्वेच्या कुत्र्याला क्युबातील पोलिसाने एक दिवस गोळी मारली. ज्या देशात निरपराध कुत्र्याला क्रौर्याने मारणारे लोक आहेत तेथे मला राहायचे नाही असे सागून त्याने क्युबा सोडले ते कायमचे. त्यानंतर पॅरिसमध्ये जाऊन तो राहिला व शेवटी गोळी मारून घेऊन त्याने आपल्या जीवनाची अखेर केली. हवाना क्लब रमचा सिक्स्थ सेन्स– ती सहावी सवेदना हेमिंग्वेच्याच काय, परंतु साऱ्या क्युबाची मला प्रेरणा वाटली. जगायचे तर असे, नाहीतर नष्ट होऊ या जिदीने ते सारेच उभे आहेत.

हवाना क्लब रमचा उपयोग करून बनविलेली 'अन्येहो' ही कॉकटेल हेमिंग्वेच्या हकिकतीबरोबर आम्ही सपविली होती. ANEJO असे त्याचे इंग्रजी स्पेलिंग आहे. रम आणि जिंजरेलचे मिश्रण करून ही कॉकटेल होते. क्युबातील सर्व वास्तव्यात या 'अन्येहो'ने फार चांगली साथ दिली. दुसरी सुप्रसिद्ध कॉकटेल् म्हणजे मोहितो. इंग्रजी स्पेलिंग Mojito. मात्र हवाना क्लब रममध्ये लेमन् व पुदिनाचे थोडे मिश्रण केले जाते. या दोन कॉकटेलचा कटाळा आला तर 'ब्लडी मेरी' ही सुप्रसिद्ध कॉकटेल होतीच. हवाना क्लब रमशिवाय या कॉकटेल्स होऊ शकतात यावर माझा आता विश्वासच बसू शकत नाही. एका खाणावळीतील एकदा दारू

संपली. गिऱ्हाईक हसू लागले. जे शिल्लक होते ते एक 'मग्'मध्ये एकजण घोटाळत बसला. दुसऱ्याने विचारले, "काय करतोस् ?" तिसऱ्यानेच उत्तर दिले, "कॉक्स् टेल् !" त्याच्या हातात एक कोंबडा होता व त्याच्या शेपटीचे एक पीस तो ओढत होता. तेव्हापासून अशा मिश्रणाचे नाव 'कॉकटेल्' झाले अशी गोष्ट या पुस्तकात आहे. सहाव्या संवेदनेचीच ही कथा. स्टोरी ऑफ् सिक्स्थ सेन्स !

ती सध्याकाळ सपणारी नव्हती. परतु आम्ही संपविली. नारळाच्या दुधाचे मिश्रण केलेली 'कॉकटेल्'ही त्याने दिली. क्युबाच्या या 'रम'ने आमचीही सहावी सवेदना जागी केली होती. वाटेत पुन्हा गप्पा सुरू झाल्या. मर्सिडिज्नेही 'कॉकटेल्' घेतलेली असावी. परंतु चर्चा सुरू झाली व काही जमिनीवरचे विषय सुरू झाले. या प्रवासात क्युबाने आपला ग्राहक मालाचा प्रश्न कसा सोडविला याची काही चागली माहिती फर्नांदोनी दिली.

या कम्युनिस्ट देशात साखर आहे, उत्तम रम आहे, धुव्वाधार सिगार्स आहेत, परतु ग्राहक मात्र कमी आहेत. ती समस्या इतर साम्यवादी देशा-प्रमाणेच पर्यायी बाजारपेठा स्थापन करून क्युबाने सोडविली. सरकारी दुकान व दुसरे सरकारचेच परंतु पर्यायी दुकान अशी दुहेरी बाजारपेठ क्युबात आहे व सरकारी दुकानातील वस्तूंची किंमत कमी तर पर्यायी दुकानातील जास्त अशी ती व्यवस्था आहे. परंतु पर्यायी मार्केटमध्ये कोणतीही वस्तू मिळत नाही, असे होणार नाही व तेथे राग असत नाही. त्यामुळे ज्याला रांगेत उभे राहायचे नाही, ज्याची दोन पैसे जास्त देण्याची ऐपत आहे त्याने पर्यायी ( पॅरलल ) मार्केटमध्ये जावे व हवी ती वस्तू घ्यावी खुली साखर व नियंत्रित दराची साखर हा जसा व्यवहार आपल्याकडे आहे तोच व्यवहार तेथेही आहे. परतु मालक सरकार आहे. तो व्यवहार प्रत्येक वस्तूबाबत आहे. शेतकऱ्याना स्वत:च्या मालकीची १५० एकरपर्यंत जमीन क्युबात ठेवता येते याचा उल्लेख यापूर्वी अनेकदा केला आहे. असे जमीनमालक थोडे आहेत. परंतु ३५ एकर सरासरी जमीन असलेले मालक कमी नाहीत. ते सर्वजण या पर्यायी बाजारात जातात व वस्तू विकत घेतात. पर्यायी मार्केट लहानसहान असत नाही. येथील सरकारी व पर्यायी

दोन्ही दुकाने डिपार्टमेंटल स्टोअर्ससारखी खूप मोठी असतात. दोन्ही दुकानात आम्ही जाऊन आलो. पर्यायी मार्केटस्‌ची ऐट मोठी, गर्दी पुष्कळ. सुवर्णालंकारापासून वड्याळापर्यंत सर्व काही तेथे विक्रीस होते व घेणारेही होते.

खाद्यपदार्थांच्या वस्तूत किती फरक आहे हे जाणून घेण्यास मी जास्त उत्सुक होतो. त्यामुळे ते दर आधी विचारले. साम्यवादी देशातील ही दुहेरी अर्थव्यवस्था कशी काम करते याचा हा नमुना पाहा.

सरकारी दुकानात साखर २० सेंटस्‌ला किलो या दराने मिळते तर पर्यायी दुकानातील दर ४५ सेंटस् होता. तांदूळ सरकारी दुकानात ५५ सेंटस् किलोनी होता तर पर्यायी दुकानात १२० सेंटस्‌नी होता. दूध क्युबात मुबलक मिळते. तरी सरकारी दुकानाचा दर एका लिटरला २० सेंटस् तर पर्यायी दुकानात ८० सेंटस् होता. जास्त पैसे द्या व हवे तेव्हा व हवा तितका माल घ्या असे हे गणित आहे. बटाटे हे सरकारी दुकानात किलोला १२ सेंटस् दराने होते तर पर्यायी दुकानात किलोचा दर २० सेंटस् होता. हे पेसोद या क्युबन चलनाचे सेंटस्. ज्यांचे उत्पन्न मासिक ५०० पेसोदस्‌पेक्षा जास्त आहे तेच पर्यायी दुकानाचा आसरा घेऊ शकतात व २५० ते ३०० उत्पन्न असणारे सरकारी दुकानांकडे वळतात. अर्थात हे सरकारी दुकानात होणाऱ्या मालाच्या पुरवठ्यावर अवलंबून आहे. कारण सरकारी दुकानात माल उपलब्ध असेल तर ' श्रीमंत 'ही तेथे जातात, याचे मुख्य कारण असे की मालाच्या गुणवत्तेत फरक नसतो. कनिष्ठाला कचरा भरलेला गहू हे भारतीय तत्त्व तेथे नाही.

### परदेशी व्यापार

क्युबाचा अंतर्गत आर्थिक व्यवहार हा असा आहे; तर साखर, कॉफी, तंबाखू, कोको व निकेल यांच्या निर्यातीवर परदेशी व्यापार चालू आहे. या परदेश व्यापार विभागाच्या अधिकाऱ्यांशीही त्यांनी आमची भेट करून दिली. रशिया रोज हजारो डॉलर्स क्युबात खर्च करतो म्हणून हा देश चालला आहे, हा अमेरिकन प्रचार साफ खोटा आहे असे या अधिकाऱ्याने निक्षून सांगितले.

क्युबा-रशिया याच्यामध्ये जो आयात-निर्यात व्यापार आहे त्याचे हे आकडे पाहा. १९८० चे हे आकडे आहेत. रशियाचे पैसे हे कागदावर असतात असे नेहमी म्हटले जाते, परंतु कागदावर राहिले तरी त्या रकमेची प्रचंड यंत्रसामग्री शेती, साखर, सिमेंट व इतर सर्व उद्योगांच्या आधुनिकीकरणासाठी रशियाकडून क्युबात आली व त्याच्या बदल्यात क्युबाने साखर, रम, कॉफी व तंबाखू या वस्तूही दिल्या. त्यामुळे रशियाने क्युबात काही न घेता पैसे ओतले असे झालेले नाही.

१९८० मध्ये क्युबाने सोव्हिएट रशियाला २,२५३.४ मिलियन पेसोदस् किंमतीचा माल निर्यात केला तर २,८११ मिलियन पेसोदस्चा आयात केला. दरवर्षी ३००० मिलियन पेसोदस्चा माल रशिया क्युबाला पाठवतो तर निदान २,५०० मिलियन पेसोदस्चा माल क्युबा रशियाला देत असतो असा हा दोघांचा व्यवहार आहे. तीन हजार मिलियन म्हणजे ३० अब्ज होतात. क्युबाचा एक पेसोद त्यांनी अमेरिकन डॉलरचे ८० सेंटस् या हिशोबात ठेवला आहे. तसा दोघांचा संबंध नाही. एकूण २५ अब्ज डॉलर्सच्या घरात दोघांचा व्यवहार आहे. यातही सोव्हिएटचा आकार व क्युबाचा आकार आपण जमेस धरला तर इतक्या प्रचंड मोठ्या देशाशी बरोबरीने व्यापार करण्याचा प्रयत्न क्युबा करतो हे विचारात घ्यावे लागेल. त्यालाही उत्तर आहे. रशिया जास्त दर देतो म्हणून क्युबाच्या बाजूला इतके पैसे दिसतात असे म्हणता येईल व ते सत्य आहे. मग त्याला दुसरे उत्तर आहे. अमेरिकेने पिळवणूक न करता योग्य पैसे क्युबन साखरेचे दिले असते तरी क्युबा कम्युनिस्ट झाला नसता. आज युरोपातील देशांची सरकारे बीट-उत्पादकांना भरपूर सबसिडी देतात. तोटा खाऊन साखर विकतात. पुन्हा येथे दुसरी गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, खाजगी जमीन आपल्या मालकीची ठेवणाऱ्यावर कसलीच भिस्त कॅस्ट्रो सरकारने ठेवलेली नाही. आपल्याकडे सरकारी क्षेत्रातील कारखाने म्हणजे सर्व बुडित. मोठ्या अधिकाऱ्यासाठी, मंत्र्याच्या नातेवाइकासाठी उघडलेली कुरणे. तेथे सरकारी कारखाने हा देशाचा कणा आहे आणि आम्हाला कणाच नाही!

## चार सिमेंट कारखाने

क्युबात एकूण चार सिमेंट कारखाने आहेत. खताचे कारखाने त्यांनी आता प्रस्थापित केले आहेत. १९७० मध्ये फक्त १४ हजार टन खत ते निर्माण करू शकले. १९८१ चे उत्पन्न चार लाख टन आहे. १९७० मध्ये सिमेंटचे उत्पादन फक्त ७ लाख ४२ हजार टन होते ते १९८१ मध्ये ३२ लक्ष टनावर गेले. कॉफीचे उत्पन्न त्यांचे कमी झाले आहे. बाकी सर्व उत्पन्न दुप्पट झाले. कोकोचे उत्पन्नही एक हजार टनावरून दोन हजार टनावर गेले. तांबे व निकेल यावर त्यांनी सध्या लक्ष केंद्रित केले आहे. १९७० मध्ये फक्त ४८० टन तांबे त्यांनी काढले होते ते आता २९०० टनावर गेले, तर १९८१ चे निकेलचे उत्पादन ४१ हजार टन आहे. हे सर्व निर्यात होते. हवाना प्रांतात एक नवीन सूत गिरणी उभारण्याचे काम चालू होते. ७ गिरण्यांना ही गिरणी सूत पुरवणार आहे. ६५ सोव्हिएट तंत्रज्ञ तेथे काम करीत आहेत.

## तेल विहिरी

या सर्व आर्थिक विकासाला आज आवश्यक आहे ते तेल. हवानाहून एक दिवस आम्ही वारादेरो या समुद्रकिनाऱ्यावरील गावी गेलो. वारादेरो म्हणजे गोव्याचे कळंगुट. ते पूर्णपणे कॅनडियन व फ्रेंच पर्यटकांनी भरलेले होते. या वारादेरोला जाताना सर्वत्र एकच दृश्य दिसत होते. तेलाच्या विहिरी व रिग्ज लागलेल्या. त्या सर्व चालू होत्या. अंतराअंतरावर पोलिस उभा करावा तशी ही बोअरिंग्ज लागलेली होती परंतु कुठेही एक माणूस नव्हता. सर्व स्वयंचलित व आपले काम त्या करीत होत्या. देशप्रेमाने प्रेरित झालेली माणसे मी क्युबात पुष्कळ पाहिली, परंतु आता यंत्रे पाहात होतो. आमची शेतीवरील इंजिनेही दिवसातून चार वेळा बिघडतात. येथे यंत्रे बिघडत नसतीलच असे म्हणणे अतिशयोक्तीचे होईल. परंतु छोटासा देश जेव्हा एका विचारप्रणालीने प्रेरित होऊन उभा राहतो, तेव्हा तो स्वत:चे हित साधतो का एवढेच आपण पाहावयाचे आहे. बहुसंख्याकांचे हित हे उद्दिष्ट आपल्याही राज्यकर्त्यांपुढे आहे, परंतु नेमके उलटे घडते आहे. श्रीमंत अधिक श्रीमंत होतात व गरीब अधिक गरीब होतात असे सर्व

पक्षाचे नेते म्हणतात, परंतु त्यावर उपाय सुचवीत नाहीत. भारतातील ७० टक्के जनता स्वातंत्र्य मिळून ३५ वर्षे झाली तरी दारिद्र्य रेषेखाली राहते. चीनमध्ये मला भिकारी दिसला नाही. क्युबात दिसला नाही. तो श्रीमंत हाँगकाँगमध्ये दिसतो. वॉशिंग्टन-न्यूयॉर्कमध्ये दिसतो व भारतात तर जागोजागी तो तोंड वेंगाडून उभा आहे. आमच्याकडे भीक मागणे हा नोकरीपेक्षा अधिक किफायतशीर धंदा बनत चालला आहे. "भिकाऱ्याच्या देशात मी नुकताच जाऊन आलो," असे उद्‌गार एका परदेशी व्यक्तीने माझ्याकडे एकदा लंडनमध्ये भारतभेटीनंतर काढले होते. क्युबा पाहिल्यानंतर मी तसे म्हणू शकत नाही. हे त्यांचे मोठेपण तरी मान्य करायला काय हरकत आहे? क्युबामध्ये हवानापासून दूरवर पिकादुरा या नावाचे खोरे आहे. त्या खोऱ्यात आम्ही एक दिवस गेलो. तेथे दगड व कातळ यांचे एका हिरण्यागार पशुसंवर्धन केंद्रात रूपांतर केले आहे; आणि ते काम त्या जागेवर राहून प्रत्यक्ष केले ते कॅस्ट्रोच्या मोठ्या भावाने. रमॉन कॅस्ट्रोने. तो हवानात भावाभोवती घुटमळत राहिला नाही. तो या खडकावर झोपडे बांधून राहिला व त्याने एक आदर्श केंद्र उभे केले. त्या परिसरातील शेतकऱ्यांना नवे जीवन दिले. आजही तो तेथेच राहतो. त्या पिकादुरा खोऱ्याकडेच आम्ही निघालो होतो. तेथे पोहोचल्यावर एक शेतकरीही भेटला आणि एक कवीही मिळाला. 'हवाना रम' च्या कॉकटेल्सचा तजेला त्याच्या कवितेवर होता. तो थांबायला तयार नव्हता. एक बरे वाटले की जगातील सर्व कवी सारखेच आहेत! त्यांना 'सिक्थ सेन्स' —सहावी संवेदना— तीही थांबायची असतेच असे नाही!

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# ६

## पिकादुरा खोऱ्यातील एक सफर

क्युबामधील १४ दिवसाच्या वास्तव्यात २०० किलोमीटर्सच्या परिसरात आम्ही फिरलो. हवाना, जिबाकोआ, सिएन्फुएगोस्, मारिएल्, मातान्झाझ्, वारादेरो आणि सातामारिया अशा सात गावांना भेटी दिल्या. वाटेत लागलेली लहान लहान गावे यात समाविष्ट केली नाहीत. क्युबाची भाषा स्पॅनिश, गावाची व माणसांची नावे स्पॅनिश त्यामुळे त्या नावाच्या जंजाळात वाचकांना मी फारसे टाकले नाही. मातान्झाझ् हे क्युबाचे एक मोठे बंदर आहे, तर वारादेरो समुद्रकिनारा सर्वांत लोकप्रिय आहे. या सर्व दौऱ्यात पिकादुरा खोऱ्यातील सफर ही वेगळी ठरली. हवानापासून १२० किलोमीटर्सवर हे खोरे होते. टेकड्यांचे चढउतार होते, हिरवे, पिवळे, गडद हिरवे अशा तीन रंगी गवताच्या शेल्यांनी हे खोरे नटले होते. स्वच्छ सूर्यप्रकाशाने त्या दिवशी आम्हाला साथ दिली व सरकारी मर्सिडिज्मधून क्युबन संगीत ऐकत आमचा त्या दिवशी प्रवास झाला. आपल्या देशातही हे सारे आहे, त्यामुळे त्याचे वर्णन करणे हा या लेखाचा हेतू नाही. या खोऱ्याचा विकास सरकारी अधिकाऱ्यांनी केला नाही, मंत्र्यांनी केला नाही तर फिडेल कॅस्ट्रोचा मोठा भाऊ रमॉन कॅस्ट्रोने या खोऱ्यात स्वतः राहून केला. भावाच्या पाठीमागे हवानात तो घुटमळत राहिला नाही. पाऊस व थंडीत तो येथे येऊन स्वतः राबला व त्याने या खडकाळ खोऱ्याचे परिवर्तन घडवून आणले. आज क्युबामध्ये येणाऱ्या परदेशी

प्रवाशासाठी पिकादुरा खोरे प्रदर्शनीय झाले असेल, परतु हे घडविले कॅस्ट्रोच्या भावाने.

क्युबा हा लहान देश असल्यामुळे ते काही गोष्टी चटकन् करू शकतात हे खरे. परतु शेवटी घडविण्याची इच्छा लागते. फिडेल कॅस्ट्रोने सत्ता संपादन केल्यावर एक उद्योग केला. त्याने हेलिकॉप्टरमधून आपल्या देशाची पाहणी केली. भूमीवरून आधी केलीलीच होती. त्यामधून खडकाळ, ओसाड, गवतही नसलेले हे पिकादुराचे खोरे कॅस्ट्रोला दिसले येथे उत्तम गवत काढता येईल, पशुसवर्धनकेंद्र उभे करता येईल व त्यामधून फार मोठ्या प्रमाणावर दूधपुरवठा निर्माण करता येईल असा विचार त्याने केला आणि हे काम घडवून आणण्याची जबाबदारी त्याने आपल्या भावावरच टाकली. मग हा फिडेलचा मोठा भाऊ या खोऱ्यात येऊन एका शेडमध्ये राहिला. या प्रदेशात काही ठिकाणी कोळशाच्या खाणी होत्या. कुणी भाजी लावत होते, आणि फार मोठी जमीन पडीक होती. रमॉन कॅस्ट्रोने सर्व परिसर आधी पायी हिंडून पाहिला. मग जीप आणली. क्रांतीनतर ज्या शेतकऱ्याना नव्याने जमीन मिळाली होती, त्याना एकत्र आणले. त्याना ही डेअरीची योजना व गवत लागवडीची योजना समजावून सागितली. शेतकरी तयार झाले. काही जुने शेतकरी तयार झाले नाहीत. त्याना रमॉन कॅस्ट्रोने आग्रह केला नाही. जबरदस्ती तर नाहीच नाही. १९६९-७० मध्ये ही योजना सुरू झाली ती राबवून आता १०-१२ वर्षे झाली, तरी काही शेतकरी आपल्या झोपड्यात राहात आहेत व या योजनेत सामील झालेले नाहीत. त्यांपैकी एका झोपडीत आम्ही जाऊन आलो. ते महाराज पूर्वीच्या आठवणी काढून सिगारेट ओढत बसलेले होते. ‘ जुने जाउ द्या मरणालागुनि जाळुनी अथवा पुरुनी टाका, ’ असे केशवसुतांनी म्हटले तरी जुने ते सोने म्हणून कवटाळण्याची आपली प्रवृत्ती माणसाला कवचाबाहेर येऊ देत नाही. ज्याना जसे राहायचे होते त्याना तसेच ठेवून रमॉन कॅस्ट्रोने आपले काम सुरू केले. बुलडोझर्स आले. जमीन सारखी करण्यात आली, गवताच्या नव्या नव्या जातींची लागवड केली. गवत वाढू लागले तशी जनावरे आणली. अमेरिका - क्युबा वैर असले तरी कॅनडा - क्युबा मैत्री कशी आहे याचा उल्लेख यापूर्वी मी केलाच आहे. पिकादुरा

खोऱ्यात पहिल्या ८०० गाई आल्या त्या कॅनडाहून. मग संकरित गाईंचा प्रयोग सुरू झाला.

आज सबंध जगात जास्त दूध देणारी गाय क्युबात आहे. या पिकादुरा खोऱ्यात तिचा जन्म झाला. येथेच तिने विक्रम प्रस्थापित केला. रोज १०० लिटर्स दूध ही गाय देते. नॅशनल चॅम्पियन हा किताब तिला फिडेल कॅस्ट्रोनी दिली. तिला पाहण्यासाठी या क्षेत्रातील लोक येऊ लागले. म्हणून तिला आता 'आइल ऑफ यूथ' वर नेऊन ठेवले आहे.

आज १५ लिटर्सपासून ५० लिटर्सपर्यंत दूध देणाऱ्या गाई या पिकादुरा खोऱ्यातील पशुसंवर्धन प्रकल्पात आहेत. हा आदर्श रमॉन कॅस्ट्रोने सबंध देशासाठी उभा केला. इतर चागल्या जमिनी होत्या. आज ५० हजार हेक्टर्समध्ये गवत लावले जाते, त्याच्या ७० हजार सोसायट्या देशभर काम करतात व ज्या क्युबात फक्त १० लाख लिटर्स दूध १९७० मध्ये होते तेथे आज ७ कोटी लिटर्स दूध निर्माण होते. एक कोटी देशाची लोकसंख्या व सात कोटी लिटर्स दूध आज तेथे आहे. एका हवाना प्रातातून तीन कोटी लिटर्स दूध तयार होते. याचा अर्थ रोज एक प्रात १ लाख लिटर्स दूध पैदा करतो. पूर्वी ११ टक्के मुलाच्या वाट्याला दूध येत होते. आज ते सर्वांना मिळते व या पिकादुरा खोऱ्यात काम करणाऱ्या शेतकऱ्याला तर विनामूल्य मिळते. त्याच्या घरात आज भरपूर दूध आहे.

या खोऱ्याच्या परिवर्तनात भाग घेतलेल्या शेतकऱ्याच्या घरी आम्ही गेलो. क्युबात सर्वत्र वाड्यावाड्यातरच्या शेतकऱ्याना उचलून एका गृह-निर्माण सोसायटीत आणण्याचा प्रयोग येथेही केलेला होता. ज्या दिवशी सायगावमध्ये हो चि मिन्हचे सैन्य शिरले, त्या दिवशी या वसाहतीचे उद्घाटन झाले. म्हणून या नगरीला 'व्हिक्टरी ऑफ व्हिएतनाम' असेच नाव दिलेले आहे स्वातंत्र्यातील बंधुत्व आणि साम्यवादी लढ्यातील ऐक्य हे असे आहे. क्युबाची एक बोट सायगाव बंदरात अडकली होती, ती याच दिवशी मुक्त झाली.

ज्या शेतकऱ्याच्या घरी आम्ही गेलो त्याचे लोकप्रिय नाव कुको. पूर्ण

नाव ओसे मन्वेल अर्नदेझ. १८ वर्षापर्यंत हा शेतकरी पूर्ण निरक्षर होता. पुढे झोपडीतच राहिला व आज श्रीमंताचे घर वाटावे अशा घरात थाटात राहात होता. त्याची स्वत ची २६ हेक्टर्स जमीन होती. तो या योजनेत सामील झाला. रमॉन कॅस्ट्रो आज सर्व शेतकऱ्याच्या घरी जाऊन बसतो. या कुकोच्या घरात रमॉन कॅस्ट्रो गप्पा मारण्यास नेहमीच येतो. राज्यकर्ता व शेवटचा शेतकरी यांच्यातील ही जवळीकच ही क्रान्ती घडवून आणू शकली· आज ते नाते आपल्या देशात राहिलेले नाही. या शेतकऱ्याने आपली सर्व जमीन सहकारी शेती व दुग्ध सोसायटीला दिली त्याच्या बदल्यात त्याला मासिक पेन्शन, त्याशिवाय सर्व सोयींनी युक्त असे हे घर मिळाले. दूध व पाणी मुबलक व फुकट. वीज अगदी अल्प दरात. महिन्याला आठ पेसोदस् त्याला विजेचा खर्च येतो. त्याचे वय ६४ होते. पतिपत्नीला मिळून ३०० पेसोदस् पेन्शन होते. " त्यात आमचे सर्व भागते," तो म्हणाला. आरामखुर्च्यांवर बसून आमच्या गप्पा चालल्या होत्या. हवाना रमचा उपयोग करून तऱ्हेतऱ्हेची कॉकटेल्स बनविली जातात. त्याचे नमुने टेबलावर येत होते. इतक्यात एक आणखी वृद्ध शेतकरी आला. सारे आपल्या खेड्यात घडते तेच. प्रश्न इतकाच की, आयुष्यभर राबलेल्या त्यांच्या हातात दुधाचा भरलेला ग्लास होता. छान घर होते, बसायला उत्तम खुर्ची होती. हा वृद्ध कवी होता. " आता आपण आज काही परतत नाही," असे मी हिंदीत माझे सहकारी सपादक-मित्र श्री. रामचंद्रन् याना बोललो. तसे घडले नाही. परंतु मैफल लाबली. शेवटी पिकादुरा खोऱ्याचा तो मानकरी होता.

ह्या कवीने आपली जीवनकथा सांगितली. त्याचे वडील कूळ होते. '५० टक्के उत्पन्न जमीनदाराला जाई. सहा वेळा त्याच्या वडिलाना वेगवेगळ्या जमिनीवर जावे लागले. हा कवी मोठा झाल्यावर साखर कारखान्यात कामाला लागला. तेव्हा त्याला चार पेसोदस् रोज मिळे. परतु वर्षातून फक्त ६० दिवस ( दोन महिने ) काम असे. नतर बेकार. हे दोघेही शेतकरी असे की, त्यानी फिडेल कॅस्ट्रोने हेलिकॉप्टरने केलेली पाहणी पाहिली. नंतर फिडेल स्वत. येथे तीन दिवस राहिला ते पाहिले. तो भावाला घेऊन आला ते पाहिले. (ते रामों असा उच्चार करीत होते.) कुकोचे एक

वाक्य फार चांगले होते. भावाला घेऊन कॅस्ट्रो आला तेव्हा रमॉन त्याला म्हणाला, "तू मला खडक दिलेस!" फिडेलने त्याला उत्तर दिले, "दुसऱ्याला दिले असते तर तो रागावला असता. तू रागावणार नाहीस!"

आणि हा मोठा भाऊ धाकट्या भावाची आज्ञा प्रमाण मानून येथे राबला. रविवारची सुटी त्याने घेतली नाही. पिकादुरा खोऱ्यातील जमिनीपेक्षा अधिक जमीन एकेकाळी कॅस्ट्रो कुटुंबाच्या मालकीची होती. ती विसरून या स्वारीने येथे काम केले. सर्वांबरोबर राहून काम केले. तो या परिसरात एकटा फिरतो. एका परदेशी नागरिकाने त्याला विचारले, "तुला भीती वाटत नाही?" कारण कॅस्ट्रो बंधूंना ठार मारण्याचे प्रयत्न अमेरिकेच्या सी. आय. ए. चे सतत चालू आहेत अशी ठाम समजूत क्युबातील लोकांची आहे.

रमॉनने उत्तर दिले, "कोणतेही सरकार देऊ शकणार नाही, इतके रक्षक येथे माझ्याभोवती आहेत. शेतकरी व त्यांची मुले हे माझे रक्षक आहेत."

कवीने मग दोन कविता म्हणून दाखविल्या. दोन्ही कविता अमेरिकेला उद्देशून होत्या. 'पराभवासाठी यायचे असेल तर या,' असे एका कवितेत सांगितले होते तर दुसऱ्या कवितेत 'पाऊल ठेवाल तर परत जाणार नाही,' असा इशारा होता. कवी म्हणाला, "रमॉनला आम्ही किताबत दिली. तो आज आमचा नॅशनल हीरो ऑफ वर्क आहे!"

या शेतकऱ्याचा, कवीचा आणि कॉकटेल्सचा निरोप घेऊन आम्ही या खोऱ्यातील शाळा पाहण्यास गेलो. तिचा मुख्याध्यापक हा कृष्णवर्णीय होता. आमची दुभाषी नान्सी हिचे त्याने कानाखाली चुंबन घेऊन स्वागत केले. कारण तिचा तो विद्यार्थी होता. हवाना विद्यापीठात नान्सी इंग्रजी शिकवते. हा मुख्याध्यापक उत्साहाने बोलत होता. "४० दिवसात आम्ही ही शाळा बांधली. सरकारने सामान दिले व गावकऱ्यांनी ती बांधली."

तो म्हणाला, "हवानामधील शाळेच्या प्रयोगशाळेत जे सामान आहे ते सर्व येथे आहे. येथे काहीच कमी नाही."

इतक्यात एक ट्रक आला. त्यामधून विद्यार्थी उतरले. "हे कुठे गेले होते?" आम्ही विचारले.

" शेतावर. मीही तेथूनच आलो," मुख्याध्यापक उत्तरला. शाळेच्या अभ्यासक्रमातील दोन तास हे शेतावरील कामाचेच आहेत. मुख्याध्यापक व वर्गशिक्षक तेथे जातात, आणि वरच्या इयत्ताना अधिक तास. दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांस ऊस ते गवत याच्या लागवडीपासून गुरावरील औषधोपचारापर्यंत सर्व काही माहीत असते. आपल्या देशातील समस्याची उत्तरे कुठे मिळतात का हे हिंडताना मी नेहमी पाहात असतो. दोन मोठ्या समस्याची उत्तरे मला येथे मिळाली. वाड्यावाड्यावरच्या शेतकऱ्याना एकत्र आणताना त्रास होईल, परतु त्यांच्या दुसऱ्या पिढीचे पूर्ण भले होईल. त्यांना शिक्षण मिळेल व शेवटी ते मुंबईला येऊ नयेत असे वाटत असेल तर त्याची शेती जोडधंद्यानी व सहकारी प्रयत्नाने किफायतशीर करणे हा एकच त्यावर उपाय आहे. सोसायटी न करता ते करता येईल. आपला विकास मंत्र्याच्या किंवा परमेश्वराच्या हाती नसून तो आपल्या हाती आहे इतकाच विश्वास हवा.

## वारादेरोच्या किनाऱ्यावर

त्या रात्री वारादेरो समुद्रकिनाऱ्यावर आमचा मुक्काम होता. कम्युनिस्ट देशात पर्यटनाला कोण येणार असा प्रश्न मला आधी होता. परंतु तेथे पोहोचलो तर उतरायला जागा नव्हती. कॅनडियन पर्यटकानी वारादेरोचे पर्यटनकेंद्र व्यापलेले होते. फ्रेंच पर्यटकही काही होते. बहुतेक घरे बंगले-वजा होती आम्हालाही एक बंगला राहण्यास मिळाला. अगदी किनाऱ्यावर तो बंगला असल्याने समुद्र हातावर तर वाळू पायाशी होती. त्या बंगल्यात आम्ही जाऊन पोहोचलो आणि पाऊस सुरू झाला. त्यामुळे वारादेरोच्या या सफरीवर थोडे पाणी पडले. खोलीत दूरदर्शन होते व हवाना क्लब रमने आमची मैत्री सोडलेली नव्हती. पावसाच्या गाण्याला समुद्राची साथ होती, आणि आम्ही कॉकटेलच्या साथीने दूरदर्शन पाहात बसलो होतो. फिडेल कॅस्ट्रोसह तेथील राजकारणी एकदाही या क्युबातील वास्तव्यात आम्हाला दूरदर्शनवर दिसले नाहीत. एक सरळ चित्रपट चालू होता. कंटाळा येई-पर्यंत तो पाहिला व सारे झोपी गेलो.

सकाळी पाऊस थांबला होता. मी उतरून समुद्रावर गेलो. माणसाना

ज्याप्रमाणे राष्ट्रीयत्व असते, तसे किनाऱ्यालाही असते. गेल्या दहा वर्षांत मी किती तरी किनारे पाहिले. गोव्यातील मिरामारचा समुद्रकिनारा हा माहेरचा. रसिकाचा. गोव्याचे एकेकाळचे सासर लिस्बन. पोर्तुगालच्या लिस्बनचा किनारा १९८२ मध्ये मी पाहिला. तो किनारा नावाड्याचा. जग धुंडण्यासाठी निघणाऱ्या वॅस्को-द-गामाचा. थोडे उग्र वाटणारे किनारे पाहिले ते आयर्लंडचे. पुन्हा कोणत्या हवामानात तुम्ही समुद्रावर जाता यावर किनाऱ्याचे आणि समुद्राचे रूप अवलंबून असते. अटलांटिक महासागरात आयर्लंड उभे तर कॅरिबियन समुद्रात क्युबा. जपानचे किनारेही मी पाहिले. इंग्लंडचे पाहिले. हिटलर एक दिवस रणगाडे उतरवील म्हणून काँक्रीटचे ब्लॉक्स बांधलेले इंग्लंडचे पूर्व किनारे कसे एकाकी वाटले. प्रत्येक ठिकाणी समुद्राचा रंग वेगळा दिसतो. या वारादेरोचा समुद्र तर हिरवा होता. एक पोपटी छटा समुद्रावर होती. सूर्याने आपले दर्शन दिले व समुद्राचे रंग पालटत गेले.

या पर्यटनकेंद्रातील मुख्य इमारतीत दुकाने, क्लब्ज सारे काही होते. तेथील नाईट क्लबमध्ये रात्री जंगी कार्यक्रम होता. त्याची तिकिटे मिळविण्यासाठी तेथे झुंबड उडाली होती. हवानातील 'ट्रॉपिकाना' नाईट क्लबपुढे तो विशेष नाही, असे सांगण्यात आहे. ट्रॉपिकाना नाईट क्लबमधील कार्यक्रमाचे वर्णन करणे म्हणजे स्वर्गातील इंद्राच्या दरबारातील अप्सरांच्या नृत्याचे कल्पनेने वर्णन करण्यासारखेच आहे. वासनांचा खेळ जेथे चालतो तेथील नाईट क्लब्ज हे बंदिस्त थिएटर्समध्ये असतात. परंतु ट्रॉपिकाना नाईट क्लबचा सर्व कार्यक्रम हा खुल्या रंगमंचावर चालतो. एका रंगमंचापेक्षा अनेक रंगमंचावर चालतो व पाहणाऱ्याचे डोळे अगदी दिपून जातात.

नारळाच्या झावळ्या वाऱ्यावर डोलत असताना व तुमची सहावी संवेदना जागी करणारी हवाना क्लब रमचे पहिले घुटके घेत असताना तुमच्या अगदी जवळच असलेल्या रंगमंचावर प्रकाशझोतात नृत्यांगना प्रवेश करतात. पोषाख व प्रकाश यांचे मोहमय नाते उलगडण्यापूर्वीच तो रंगमंच हळूहळू वर जातो आणि एका वेळी शंभरच्यावर ललना नृत्य करू लागतात. जवळजवळ तीन तास चाललेल्या या कार्यक्रमात प्रेक्षक बुडून जातात.

कारण एकाच वेळी चोहोबाजूला हजाराच्यावर स्त्रियांचे नृत्य चालू होते व मध्ये बसलेले प्रेक्षक आधीच धुंद झालेले त्या दृश्यातच बुडून जातात. हिंदी चित्रपटात नृत्याची जी दृश्ये हल्ली दाखविली जातात, ती सर्व या परदेशस्थ नृत्यांगनानीच सादर केलेली. परंतु पडद्यावरचे ते ' एक्स्ट्रा 'जचे नृत्य व हे अनेकरंगी, अनेक तऱ्हेच्या, पोषाखातील चारही बाजूंना चालणारे नृत्य खरोखरच बहारदार होते. किल्ल्याची तटबंदी असावी असे रंगमंचाचे भाग चोहोबाजूंना होते. त्यावरून पायऱ्या उतरत, नृत्य करीत या स्त्रिया येत. एका बाजूला निळा प्रकाशझोत असेल तर दुसरी अगदी वेगळी. सप्तरंग उधळत येणाऱ्या या स्त्रिया सुंदर तर होत्याच, परंतु त्यातही गोऱ्या-काळ्यांचे मिश्रण होते. पुरुषी सौंदर्य व कोमलता याची नजाकत होती. केवळ स्त्रियाच नृत्य करीत होत्या असेही नव्हे. पुरुषही होते. बॅलेचा आविष्कार काही नृत्यात होता तर काहींत नखरेल शरीराचाही होता. समोर टेबलावर कॉकटेल्स् आणि रंगमंचावर चोहोबाजूंनी नृत्याची कॉकटेल्स् !

क्युबातील वास्तव्यातील ती रात्र अर्थात सर्वांत बेहोषीची. फिडेल कॅस्ट्रोने साम्यवाद आणला, परंतु जीवनातील बेहोषी तशी बाळविली नाही. दुसऱ्या दिवशी आमच्या क्युबन मित्राबरोबर ट्रॉपिकानाबद्दल जास्त बोलो. तो म्हणाला, " अमेरिकन येथे होते तेव्हापासूनचा हा क्लब आहे. फिडेलने तो बंद केला नाही. परंतु पूर्वी नुसता हैदोस होता. त्याचे स्वरूप अधिक कलात्मक केले. त्या कार्यक्रमात भाग घेणाऱ्या स्त्रियाचे जीवन स्थिर केले."

अमेरिकन जिथे जातात तिथे त्या राष्ट्राचे वेश्यागृह करतात. बँकाकचे, थायलंडचे त्यांनी तेच केले. सायगावचे, व्हिएतनामचे त्यांनी तेच केले होते. हवानाचे तेच केले होते माओप्रमाणे, हो चि मिन्हप्रमाणे फिडेलने सर्व वेश्याना त्यांच्या व्यवसायातून मुक्त केले. सर्वांना रोजगार मिळवून दिला.

फर्नांदो म्हणाला, " सुरुवातीला दहा वर्षे कठीण गेली. कारण काही लोक या स्त्रियाना ओळखणारे होते. आता त्या स्त्रिया समाजात मिसळून गेल्या आहेत. दुसरी पिढी त्या व्यवसायात गेली नाही."

" ट्रॉपिकानातील नृत्यांगनांना महिन्याचे वेतन मिळते. त्यांचे जीवन स्थिर आहे, इतर कलावंतानाही स्थैर्य आहे."

त्यामुळेच ते बेफाम नृत्य करू शकत असावेत. ट्रॉपिकानाच्या विविध रंगी, सप्तरंगी, बहुरंगी, एकरंगी, प्रकाशझोतात लांबलचक पायाच्या त्या ललना तेथे आजही नाचत असतील. तो आसमंत आजही प्रकाश-झोतात उजळून निघाला असेल. पोषाखाचे पंख उडवीत त्या चारही बाजूंनी उतरत असतील. असे सर्व अखंड चालू राहते आणि आपण नंतर तिथे नसतो यातच सारी गंमत आहे. प्रकाश फेकला जात असतो, पण तो दुसऱ्या तरी कुणावर !

# ७

# एक पायोनियर्स कॅम्प

स्थानिक पातळीवर कार्यकर्ते नाहीत, अशी तक्रार सर्वजण करीत असतात, परंतु ते निर्माण करण्याचा प्रयत्न कुणीही करीत नाही. स्वयंसेवक संघटनाही या दृष्टीने यशस्वी झालेल्या दिसत नाहीत. पुन्हा आपल्याकडे खरी लोकशाही नांदतच नाही. एखादा चांगला कार्यकर्ता ग्रामीण भागात काम करीत असेल व त्याने निवडणुकीस मदत केली नाही तर त्याला उखडून काढण्याचा प्रयत्न सरकार पक्ष करतो. सरकारला निःपक्षपातीपणे व आपल्या बाजूने लिहिणारे पत्रकार जसे हवे असतात, त्याचप्रमाणे ग्रामीण भागात कार्यकर्तेही हवे असतात आणि ते पूर्णपणे होयबा असावे लागतात. सरकारी पाहुण्यांची ऊठबस करण्यातच त्यांचा बराचसा वेळ जातो. या सर्व परिस्थितीमुळे स्थानिक पातळीवर काम करण्यासाठी तरुण पुढे येत नाहीत, आले तर टिकत नाहीत आणि चर्चेचा घोळ पुन्हा चालू राहतो.

## अग्रेसरांचे शिबिर

यावर कम्युनिस्ट देशानी उपाय शोधून काढला. रशियामध्ये हे पायोनियर्स कॅम्पस् प्रथम सुरू झाले. त्याचा प्रसार इतर कम्युनिस्ट देशात झाला. क्युबामधील असे विद्यार्थ्यांचे शिबिर या ताज्या दौऱ्यात मी पाहिले. एकपक्षीय लोकशाहीमुळे त्यांच्याकडे पक्षपातळीवरचे राजकीय संघर्ष निर्माण

होत नाहीत. कम्युनिस्ट पक्षासाठीच उत्तम कार्यकर्ते तयार करण्याचे कार्य या पायोनियर्स कॅम्पमध्ये होते, असे काही म्हणू शकतील, परंतु ते पूर्णपणे खरे नाही. राजकीय विचारसरणीचा प्रभाव त्याच्यावर पडत असला तरी शेवटी शेती व इतर विकासाच्या कार्यासाठी गावाला संघटित करण्याचे कार्य तो पुढे करीत असतो. विद्यार्थिदशेपासून त्याच्यामध्ये देशभक्तीची व त्यापेक्षाही विकासकार्यासाठी लोकाना प्रेरणा देण्याची प्रवृत्ती कशी वाढेल, असा प्रयत्न या शिबिरात होतो. पायोनियर याचा अर्थ 'अग्रेसर' असा आहे. पुढारी अगर निव्वळ कार्यकर्ता नव्हे. तो अग्रभागी राहतो, नेतृत्व करतो, परंतु शेवटी तो तेथे जे निर्माण करतो ते त्या प्रदेशात प्रथमच होणारे असते. आपल्याकडे वृक्षारोपणाची चळवळ विद्यार्थिवर्गात पसरविण्यासाठी आठवड्याची शिबिरे घेणारे काही कार्यकर्ते आहेत. त्यापेक्षा महाराष्ट्र राज्यात असा एक पायोनियर्स कॅम्प कायम उभा केला तर काय होईल ? लोकशाही व समाजवाद याचे संस्कार करण्यास प्रत्यवाय नसेल तर घाबरण्याचे काय कारण ?

**विहंगम दृश्य**

सिएन्फुएगोस या हवानापासून १०० किलोमीटर्सवरील एका समुद्रकिनाऱ्यावरील गावात आमचा मुक्काम असतानाच एका पायोनियर्स कॅम्पला आम्ही भेट दिली. क्युबा हे बेट असल्यामुळे समुद्रकिनाऱ्याची वाण येथे कुठेच नाही. या छावणीत आम्ही शिरलो, मुख्य कार्यालयात आलो व तेथील प्रमुख भेटताच त्यानी आम्हाला पुन्हा बाहेर नेले व एका उच्च टेकडीवर नेऊन उभे केले. तेथून या शिबिराचे सुंदर, विहंगम असे दृश्य दिसत होते. डावीकडे अगदी कोकणातल्यासारखी कौलारू घरे होती. अर्थात ती लाबलचक होती, कारण विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय यात केलेली होती. मध्ये एक मोठी इमारत दिसत होती, बाकीची सर्व क्रीडांगणे आणि पलीकडे अटलांटिक महासागराचा सुंदर किनारा. त्या सर्व इमारती रिकाम्या दिसत होत्या, क्रीडांगणे रिकामी होती याचे कारण समुद्रात डुंबण्याचा मनसोक्त कार्यक्रम सुरू झालेला होता. शेकडो मुले समोर समुद्रात नाचताना, बागडताना दिसत होती.

ज्या वेळी आम्ही या शिबिराला भेट दिली तेव्हा एक हजार विद्यार्थी तेथे होते. परंतु या जागेत २,३०० विद्यार्थ्यांची सोय केलेली आहे. १५ व ४५ दिवसांची अशी ही शिबिरे असतात. सध्या १५ दिवसाचे शिबिर चालू होते. १५ अगर ४५ दिवसाच्या शिबिरातही विद्यार्थ्यांच्या शालेय अभ्यासाचे मुळीच नुकसान होऊ दिले जात नाही. येथील सर्व रचनाच अशी आहे की, त्या १५ अगर ४५ दिवसात आवश्यक तितका अभ्यासही चालू राहतो व त्यांचे वर्गही भरतात. सकाळी सहा वाजता दैनंदिन कार्यक्रम सुरू झाल्यावर दोन तास अभ्यास चालतो. एकूण शाळेपासून खेळण्यापर्यंत राजकीय अभ्यासवर्गापासून ते आवडीचे छंद जोपासण्यापर्यंत सारे काही येथे जोपासले जाते. मुलेमुली दोघेही या शिबिरात असतात. मस्तीही करतात. विद्यार्थ्यांची नाटके व भांडणेही होतात. तुफान खेळही चालतो. सारे मनसोक्तपणे करण्याची संधी देऊन त्यांना कौटुंबिक, परंपरागत दडपणातून बाहेर आणले जाते. आमचा उद्देश शेवटी हाच आहे, असे या शिबिराचे संचालक सांगत होते.

या शिबिराच्या जागेचे एकूण क्षेत्रफळ दहा एकराचे होते. त्याचे समुद्र-किनारा विभाग, क्रीडा विभाग, सांस्कृतिक विभाग, निवास विभाग, अभ्यास विभाग असे भाग पाडलेले होते. तीन सुपरवायझर्स व २८० इतर सर्व थराचे कर्मचारी यांच्या मदतीने हे शिबिर चालविले जाते. क्रीडाक्षेत्र विभागात बेसबॉल, बास्केटबॉलपासून ॲथलेटिक्सपर्यंत सर्वांसाठी वेगवेगळी मैदाने तयार केलेली होती. सांस्कृतिक विभागात या मुलांना पपेट्स्पासून संगीतापर्यंत सर्वांचे शिक्षण आवडीप्रमाणे दिले जाते. त्या शिबिरात अनेक मुले-मुली सायकलीवरून धडपडत जाताना दिसत होत्या, तर काही लहान घोड्यांवर स्वार झाले होते व काहींची तट्टे रुसून अड-खळलेली होती. या शिबिरात आपल्या स्वतःच्या देशाचा प्रथम परिचय करून दिला जातो. या गोष्टीची सर्वांत गरज आज भारतात आहे. या विद्यार्थ्यांबरोबर त्यांचे काही शिक्षकही शिबिरात सामील होतात. त्यामुळे अभ्यास खंडित होत नाही व विद्यार्थ्यांनाही परकेपणा वाटत नाही. या मुला-मुलींना आणण्यासाठी २५ बसेसचा ताफा आहे. बसस्थानक टेकडीवरून दिसत होते. कॅम्पस्मध्ये एक पॉलिक्लिनिक, दोन डॉक्टर्स व

चार परिचारिका कायम आहेत. या शिबिरात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना कसलाही खर्च नसतो. त्यांची निवडमात्र शाळाशाळांकडून केली जाते. क्युबा हा आपल्या विदर्भापेक्षा छोटा देश. त्यात चौदा प्रांत. त्यांपैकी तीन प्रांतातील विद्यार्थ्यांसाठी हा पायोनिअर्स कॅम्प होता. हे तीन प्रांतच या शिबिराचा सर्व खर्च करतात. आणि तो तसा कमी नाही. परंतु त्यांनी आपले जीवनमान व गरजा या दोन्हींची पातळी संभाळली आहे. खुद्द हवानाजवळ एक मोठा पायोनियर्स कॅम्प आहे. एक शिबिर त्यांनी आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी ठेवले आहे. पूर्वेकडील प्रांतासाठी एक व पश्चिमेकडे आणखी एक मिळून क्युबात एकूण चार संस्करण शिबिरे आहेत, ज्यांमधून उद्याचे नेते निर्माण केले जातात. थंडीत ही शिबिरे घेतली जात नाहीत ऑक्टोबर व मे या महिन्यांच्या काळात ४५ दिवसांची शिबिरे आयोजित केली जातात व हे विद्यार्थी अनेक नव्या विचारांचे व ग्रामीण भागाला उपयोगी पडणाऱ्या प्रयोगांचे लेणं घेऊन घरी जातात. वर्गातील हजेरी, अभ्यास, नेतृत्वाचे गुण पाहून विद्यार्थी निवडले जातात. राष्ट्राचा भार उद्या कुणी वाहायचा हे शिबिरात घडविले जाते. साम्यवादी विचार त्यांच्यात येथेच पक्का रुजवला जातो. लेनिनचे भव्य चित्र मुख्य इमारतीच्या प्रवेश-द्वारावर होते. 'कॅच देम यंग' हा आदेश पूर्णपणे येथे पाळला जातो. यातून आपल्याला नको ते वगळता येईल. परंतु दरवेळी राहण्यासाठी जागा शोधणे, तेथे पाण्याची सोय नसणे, डास, मच्छर यांनी विद्यार्थ्यांना पीडणे यापेक्षा एक कायम स्वरूपाचे असे कॅम्प्स एखाद्या चांगल्या ठिकाणी अगर डोंगराच्या पायथ्याशी बांधून ठेवले तर आपल्यालाही असे संस्कार करता येतील. आजच्या तरुणांपुढे आदर्श नाहीत, असे रोज कुणी तरी बोलत असतो. ज्यांना काही करायचे नसते ते अधिक बोलतात. दुसरीकडे वासनांनी बरबटलेले चित्रपट व राजकीय पुढाऱ्यांचा भ्रष्टाचार यामधून वैफल्य व विकृती यांचे अमाप पीक युवकांच्या रिकाम्या मनात पिकते आहे. सेनापती बापट कोण असा प्रश्न महाराष्ट्राच्या एक मंत्र्याला पडला. परंतु सद्य.परिस्थिती अशीच चालू राहिली तर सेनापती बापट कोण होते हे माहीत असलेला एकहीजण सभागृहात असणार नाही व त्या वेळी सेनापती बापटांचे नाव माहीत असणे हीच हास्यास्पद घटना ठरेल.

२३ मार्च रोजी, ५२ वर्षांपूर्वी भगतसिंग, राजगुरू व सुखदेव या देशभक्ताना ब्रिटिश साम्राज्यशाहीने फाशी दिले. या वर्षीच्या २३ तारखेस त्या निमित्ताने बोलणे निघाले, तेव्हा राजगुरू हा महाराष्ट्राचा होता हे माहीत नसलेले दोन समव्यवसायी पत्रकार निघाले. आज महाराष्ट्रात व देशात अज्ञानात अग्रेसर असलेल्यांची संख्या वाढते आहे. निदान हे खुळेपणाचे पीक वाढणार नाही, यासाठी तरी असे शिबिर उपयोगी पडावे.

जगातील प्रत्येक देशात आज नवे प्रयोग चालू आहेत. सर्व आपल्याला मान्य होणारे नाहीत. प्रयोगाचे सर्व स्वरूप कदाचित उपकारक असणार नाही. परतु प्रत्येकात काहीतरी चागले असते व त्यामुळेच ते टिकते व वाढते. क्रान्ती एकदाच होते व संपते असे नाही. ती एक सततची प्रक्रिया आहे. माओने सुरुवातीस कुटुब-नियोजनास विरोध केला होता. आज चीनमध्ये जास्त मुले होणाऱ्यास शिक्षा होते. नोकऱ्या जातात. बढती थाबते. आळशी लोकानाही पोसावे लागते, म्हणून चीनने काही कम्युन्स मोडली. क्युबातील या शिबिरात तात्रिक विभाग दिसला नाही. मुले लहान असतानाच आधुनिक विचार व आधुनिक यंत्रे याचा परिचय करून द्यावयास हवा. सर्व शेती, अवजारे वापरण्याची सवय बालपणीच लावावयास हवी. " ते आमका किते जाय् ? " हा कोकणी माणसाचा प्रश्न लहानपणीच मनातून उपटून टाकावयास हवा. असे एक आदर्श अग्रेसर संस्करण शिविर सिंहगडच्या परिसरात कुणीतरी उभे करावयास हवे. अलिबागच्या समुद्रकिनाऱ्याजवळही ते उभे राहू शकेल.

क्युबातील या पायोनियर्स कॅम्पला ताराचे मोठे व उंच कुंपण होते. हे कुंपण कशासाठी असा प्रश्न मी त्या प्रमुखाना विचारला. तो म्हणाला, " हे विद्यार्थ्यांसाठी नाही. ते बाहेर पळून जातील यासाठी हे कुंपण नाही. परतु कुपण घातले नाही तर कुणीही लोक आत शिरतील. विद्यार्थ्यांच्या पूर्ण संरक्षणासाठी ते आहे आणि असेलही " आपल्याकडेही ते घालावेच लागेल. मुलानी समुद्रात आत फार जाऊ नये म्हणून शिक्षक हाकारे देत होते. मुले सर्वत्र सारखीच. त्याच्या भोवती कुपणे आपण बाधतो. ती किती बाधायची, बाधायची नाहीत याचे भान ठेवले म्हणजे झाले !

# ८

## नॅशनल ॲसेंब्ली व वृत्तपत्रे

हवानातील ज्या आधुनिक सभागृहात साखर तंत्रज्ञांची जागतिक परिषद भरली होती, त्याच ठिकाणी क्युबाचे पार्लमेंट भरते. तिला ते नॅशनल ॲसेंब्ली म्हणतात. १९७८ मध्ये हवानात अलिप्त राष्ट्रांची जी शिखर परिषद भरली तिच्यासाठी हे प्रचंड व आधुनिक सभागृह बांधण्यात आले. हवानात आम्ही दाखल झाल्यावर पहिल्या दिवशी हे क्युबाचे 'विज्ञान भवन' पाहणे हाच पहिला कार्यक्रम होता. फारच चांगले, सर्व सोयींनी युक्त अशी ही इमारत आहे. कमी उपस्थितांची चर्चासत्रे चालण्यासाठी अगर कमिटी बैठकांसाठी विविध आकाराची दालने त्यांनी बांधली आहेत. सर्व जपानची यंत्रणा येथे वापरलेली दिसली. लाकूड मात्र सर्व क्युबाचे. व्हिडीयोचे तंत्र आता परदेशात इतके सामान्य झाले आहे की, त्याचा येथेही सहजपणे वापर केलेला दिसला.

अशा या सभागृहात नंतर साखर परिषद झाली व क्युबाची नॅशनल ॲसेंब्लीही तेथे भरते. परंतु त्याचे कार्यालय हवाना शहरात स्वतंत्र इमारतीत आहे. त्यांनी दिलेल्या माहितीतील सर्वांत चांगली गोष्ट म्हणजे काम न करणाऱ्या लोकप्रतिनिधीला परत बोलावण्याची तरतूद त्यांच्या नॅशनल ॲसेंब्लीच्या कार्यपद्धतीत आहे. 'राइट टू रिकॉल'चा आग्रह जयप्रकाश नारायण यांनी धरला होता. त्याची गरज आपल्या देशात अतिशय आहे. येथे काही खासदार-आमदार काही काम न करता पाच वर्षे मौज करतात व

पुन्हा पेन्शन कसे मिळेल हे पाहतात अशांना परत बोलाविण्याची तरतूद क्युबात आहे.

नॅशनल ॲसेंब्लीची माहिती देणारी अधिकारीही स्त्री होती क्युबात स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने सर्वत्र आहेत, यात विशेष नाही. परंतु कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यात त्या अधिक आघाडीवर आहेत. आमच्याबरोबर क्युबाच्या परराष्ट्रखात्याचा जो अधिकारी होता, तो पक्षसदस्य नव्हता, परंतु दुभाषी नान्सी ती मात्र सदस्य होती.

क्युबाचे पार्लमेंट हे तसे तरुण आहे. १९७५ मध्ये क्युबा कम्युनिस्ट पक्षाची कॉंग्रेस भरली व तिने नवी घटना मजूर केली. या घटनेने लोकाकडे राजकीय सत्ता दिली. प्रथम एका प्रातातच ॲसेंब्ली स्थापन करण्यात आली. १९७६ च्या फेब्रुवारीत लोकमत घेण्यात आले. घटना मजूर झाली. १४ प्रात बनले व प्रथम ज्या शहरात नगरपालिका होत्या त्याच्या निवडणुका घेण्यात आल्या लोकनियुक्त नगरपालिका स्थापन झाल्या.

## निवडणूक कशी होते ?

नगरपालिकेच्या निवडणुकीतही एका वॉर्डमध्ये जास्तीत जास्त आठ उमेदवार उभे राहू शकतात. कमीत कमी दोन. रविवारी मतदान होते. सर्व उमेदवारांचे फोटो व त्याची माहिती सरकारच्या वतीने लावली जाते. प्रचार सभा होत नाहीत. ज्याना ५० टक्क्यापेक्षा अधिक मते मिळतील त्याचाच विचार होतो. कुणालाच मिळाली नाहीत तर रविवारी पुन्हा मतदान होते यामधून जे निवडून येतील ते नगरपालिकेचा कारभार पाहतात व त्यामधून प्रातिक विधानसभेवर प्रतिनिधी जातात. प्रत्येक दहा हजार लोकसख्येला एक प्रतिनिधी अशी निवड केली जाते. तळागाळातील लोक या प्रातीय असेंब्लीत यावेत यासाठी नगरपालिका व ग्राममंडळे यामधील प्रतिनिधी घेतले जातात. या दोन्ही स्थानिक स्वराज्य सस्थातन प्रातीय असेंब्लीत व त्यामधून नॅशनल ॲसेंब्लीत अशी साखळी त्यानी ठेवली असल्याने तिघाची एकमेकाशी वैचारिक देवघेव आहे. बाकीचे सदस्य लोक निवडतात. नॅशनल ॲसेंब्लीत प्रत्येक वीस हजार लोकामधून एक प्रतिनिधी येतो.

क्युबाच्या घटनेतच नॅशनल असेंब्लीतील ५२ टक्के लोक हे तळा-

गाळातील आमजनतेतील असावयास हवेत अशी तरतूद आहे.

या नॅशनल ॲसेंब्लीचे ४९९ सदस्य आहेत. त्यात २२ टक्के स्त्रिया आहेत. वर्षातून दोनदा हे पार्लमेंट भरते. जुलै व डिसेंबर ह्या महिन्यात ही अधिवेशने होतात. या सदस्यांच्या १६ समित्या आहेत. त्या समित्यांच्या बैठका व कामे चालू असतात. या समित्यांना केलेल्या कामाचे अहवाल द्यावे लागतात, त्यावर चर्चा होते. आश्चर्य असे की, या नॅशनल असेंब्लीच्या सदस्यांना कसलेही वेतन नाही. ते इतरत्र नोकऱ्या अगर शेतीत कामही करीत असतात असेंब्लीच्या कामापुरती त्यांना रजा दिली जाते आणि दोन्हीकडे वेतन व भत्ते ते घेऊ शकत नाहीत. मंत्र्याला ४५० पेसोदस् मासिक वेतन मिळते.

या पार्लमेंटमध्येही खूप बोलणारे लोक आहेत. ती स्त्री म्हणाली की, म्हणूनच एकदा फिडेल म्हणाला, "आपले पार्लमेंटही बूर्झ्वा पार्लमेंट झाले आहे!" एका नगरपालिकेने काम न करणाऱ्या आपल्या डेप्युटीला ॲसेंब्लीतून परत बोलाविण्याची घटना गतवर्षीच घडली. या प्रतिनिधींना वेतन नाही, पेन्शन मिळण्याची सोय नाही व पैसे खाण्याचीही संधी नाही, कारण शेवटी सारे 'स्टेट'च्या मालकीचे आहे.

आपल्याकडे उद्या असे झाले तर लोकप्रतिनिधी बनण्यास आजच्यापैकी किती लोक तयार होतील?

या नॅशनल ॲसेंब्लीचा अध्यक्ष वेगळा असतो. फिडेल कॅस्ट्रो या ॲसेंब्लीत येऊन बसत नाही. या संसदेची मुदतही आपल्या लोकसभे-सारखी पाच वर्षांची आहे. दर वर्षी एका प्रमुख विषयासाठी समिती नेमावयाची व तिने कार्यक्रम आखावयाचा असे चालते. संसद-सदस्यच पर्यायाने नियोजनाचे काम करतात. सुरुवातीला साखर व्यवसायासाठी कमिशन नेमण्यात आले, नंतर घरबांधणीच्या प्रश्नासाठी, तर पुढील वर्षी ऊर्जा समस्येसाठी नेमले जाईल असे या चर्चेच्या वेळी त्या स्त्रीने सांगितले. तिच्या शेजारी बसलेल्या नॅशनल ॲसेंब्लीच्या दुसऱ्या अधिकारी स्त्रीला इंग्रजी उत्तम येत होते. परंतु तिला काही या मुख्य स्त्रीने जास्त बोलू दिले नाही. त्यामुळे भाषांतर करण्याचा उपद्व्याप चालू होता. या नॅशनल ॲसेंब्लीत खडाजंगी चर्चा होते काय, असे विचारता ती म्हणाली, " भरपूर

होते " लघुउद्योगाचे काम पाहणाऱ्याची जोरदार हजेरी सदस्यांनी घेतली. क्युबाचे स्वातंत्र्य आंदोलन चालू असताना फिडेल कॅस्ट्रोचे तेथील कम्युनिस्ट पक्षाशी मुळीच सूत नव्हते. किंबहुना विरोध होता. हवानात प्रवेश केल्यावर क्युबन कम्युनिस्ट पक्षाने नाइलाजाने कॅस्ट्रोला पाठिंबा दिला. त्या सर्वांचा परिणाम अजूनही क्युबावर इतका आहे की, या नॅशनल ॲसेंब्लीचा प्रत्येक सदस्य कम्युनिस्ट पक्षाचा सदस्य असायलाच हवा असे मुळीच नाही. कामगार व शेतकरी वर्गातील लोकानाच पक्षाचे सदस्यत्व दिले जाते व त्यामुळे त्यामधून नॅशनल ॲसेंब्लीवर येणारे बरेचसे प्रतिनिधी हे पक्षाचे सदस्य असतात, परतु इतर नसतात. या दोघात एक वैचारिक दरी जरूर राहते, हे नतर केलेल्या चौकशीवरून लक्षात आले

## मंत्रिमंडळाचे कार्य

शेवटी क्युबाचे मत्रिमंडळ कसे बनते हे समजून घेण्याचे औत्सुक्य होते 'सुप्रीम ट्रायब्यून' म्हणजे त्याचे मंत्रिमंडळ. त्यात राष्ट्राध्यक्ष कॅस्ट्रो, एक उपाध्यक्ष व १५ विविध व्यावसायिक क्षेत्रातील व्यक्ती असतात. भारतामध्ये राष्ट्राध्यक्ष पद्धती आणण्याचे विचार या नमुन्यातूनच आलेले आहेत. तेथे कॅस्ट्रो नॅशनल ॲसेंब्लीत जात नाही. तसे येथे आताच घडविण्याचा प्रयत्न चालू आहे. श्रीमती गाधी लोकसभा टाळतात राष्ट्राध्यक्ष पद्धतीत व्यवसायतज्ज्ञ मत्रिमंडळात घेता येतील हाही विचार त्यांच्या मनात आहे. परतु शेवटी काय करायचे हे तेथे राष्ट्राध्यक्ष ठरवितात व त्यानी घेतलेला निर्णय रोखण्याचे काम क्युबाची नॅशनल ॲसेंब्ली करू शकणार नाही. आपली लोकसभा ती करू शकते, याचे मुख्य कारण लोकसभेत केलेला अगर झालेला विरोध लोकापर्यंत पोहोचविण्याचे काम स्वतत्र वृत्तपत्रे करीत असतात त्यामुळे जनमत बनत असते व या जनमताचा विचार राज्यकर्त्यांना करावा लागतो. तेथे राष्ट्राध्यक्ष बोलतो ते जनतेचे मत बनते, बनविले जाते तसेच आहे असे गृहीत धरले जाते व पोपटासारखे सर्वजण ती मते पाठ केल्यासारखीच माडू लागतात.

## ग्रान्मा' ला भेट

'ग्रान्मा हे क्युबाचे प्रमुख दैनिक. हवानातून निघते. साडे

म्हा लाख प्रती छापल्या जातात. रशियाचे ' प्रावदा ', ' पीकिंगचे ' रेनबो रिबॉन ' ( पीपल्स डेली ) तसे क्युबाचे ' ग्रान्मा '. हे नाव त्या बोटीचे. ज्या बोटीतून फिडेल कॅस्ट्रो क्युबाच्या बेलिक किनाऱ्यावर २ डिसेंबर १९५६ रोजी उतरला, त्या बोटीचे नाव वृत्तपत्राने घेतले. स्वातंत्र्याचा सूर घेऊन ही बोट क्युबात आली, परंतु तो सूर लावण्याचा पूर्ण हक्क ' ग्रान्मा ' च्या संपादकाना कुठे आहे ? अर्थात हे सर्व आपल्या विचारानुसार आहे. कम्युनिस्ट देशात जनतेचे हित पक्ष व सरकार पाहात असते व त्यासाठी त्या पक्षाचा व सरकारचा पुरस्कार करणे इतके काम पक्षाने नेमलेल्या संपादकाचे व त्याच्या सहकाऱ्याचे असते. आणि या कामाशी समरस झालेले लोक असू शकतात ' पीपल्स डेली'च्या संपादकापेक्षा ' ग्रान्मा ' ची सहसंपादिका या कार्यात रंगून गेलेली दिसली. ती कृष्णवर्णीय होती. कॅस्ट्रो तिचा नेता होता व अमेरिकन आक्रमणाचा प्रतिकार करणे हे तिचे ध्येय होते.

सध्या या दैनिकाच्या दोन आवृत्त्या निघतात. या आधीच्या एका प्रकरणात उल्लेख केल्याप्रमाणे खुद्द संपादक कम्युनिस्ट पक्षाच्या एक बैठकीसाठी गेलेले होते त्यामुळे ' ग्रान्मा ' च्या ' ग्रॅन्डमा ' शी (आजीशी) आमचे बोलणे चालले होते. ५७ पत्रकार या दैनिकात काम करतात ती सख्या ऐकून बरे वाटले. त्यात नऊ शहरासाठी बातमीदार तर चौदा वेगवेगळ्या प्रांतासाठी. क्रीडा-विभागासाठी सहा तर इंग्रजी व फ्रेंच या भाषामधून येणाऱ्या बातम्याची भाषांतरे सहाजण करतात. ५०० कामगार या वृत्तपत्रात आहेत यावरून पसाऱ्याची कल्पना यावी परंतु अशा या दैनिकात रोज संपादकीय नसते. त्याची गरज नाही असे मानणारे आपल्याकडेही लोक आहेत, पत्रकार आहेत व ते कम्युनिस्ट नाहीत कम्युनिस्ट देशात रोज अग्रलेख लिहिणे कठीण आहे. ते अग्रलेख पक्षप्रमुखाकडून मंजूर करून घ्यावे लागतात. ते कामाच्या दृष्टीनेही कठीण आहे. ताजी बातमी हा जसा वृत्तपत्राचा प्राण आहे, त्याचबरोबर ताज्या विषयावरचा अग्रलेख यालाही वृत्तपत्रसृष्टीत महत्त्वाचे स्थान आहे. फिडेल कॅस्ट्रोकडे क्युबाची सत्ता येण्यापूर्वी ' फ्री प्रेस ' या नावाचे दैनिक तेथे होते ' रेव्होल्युशन ' व ' टुडे ' या नावाची दैनिके होती. त्या सर्वांचे एकत्रीकरण ' ग्रान्मा ' त करण्यात आले. साम्यवादी देशाना

अनेक वृत्तपत्रांची गरज वाटत नाही एक वृत्तसंस्था व एक प्रमुख वृत्तपत्र ही त्यांची पद्धती. परतु त्यामुळें एकसुरीपणा येतो, स्वतंत्र विचार संपतो. १९६५ मध्ये हे एकत्रीकरण झाले व त्यामुळे कर्मचाऱ्यांची संख्याही वाढली

या सहसपादिकेने 'ग्रान्मा ' चे अनेक अक आमच्या पुढ्यात टाकले. त्यात २५ मे १९८० चा एक अक होता. त्या अकात हवानात निघालेल्या २० लाख लोकाच्या मोर्चाचे एक प्रचंड, मोठ्या पानाच्या आकाराचे छाया-चित्र होते. तो अक मी येताना बरोबर आणला, परतु हा प्रसग कशातून निर्माण झाला त्याची जी हकीगत या सहसंपादिकेकडून ऐकली, त्यावरून क्युबा-अमेरिका राजकारणाचे एक ताजे प्रकरण ज्ञात झाले तिनेच ही सर्व हकीगत सांगितली. 'बे ऑफ पिग्ज 'नतर गाजलेले हे दुसरे प्रकरण. १९७९-८० मधले. केवळ तीन वर्षांपूर्वीचे. ज्या वेळी कॅस्ट्रोने क्युबाचे दरवाजे सताड उघडले. ज्याना या देशात राहावयाचे नाही, त्याना जाण्यासाठी. १ लाख २० हजार क्युबन्स स्वदेश सोडून परदेशी गेले.

तिने एक टाळी वाजविली, ( हे सागण्यासाठी तिने अशीच टाळी प्रत्येक वेळी वाजविली असावी ) व म्हटले, " फिडेल इतका हुषार की त्याने तुरुगाची दारे उघडली व सर्व कैद्याना सागितले, 'जा, तो स्वतंत्र देश तुमची वाट पाहतो आहे !' " आणि या चोरदरोडेखोराना सर्वांना मियामीला पाठवून दिले. त्यानी अमेरिका बिघडवली अशा तक्रारी आता मियामी, फ्लोरिडाच्या वृत्तपत्रात येत आहेत.

अमेरिकेने या लोकाना नेण्यासाठी बोटी पाठविल्या. परतु प्रत्येकाची तपासणी होत होती. क्युबन सरकारचे काही गुपित ज्याच्याजवळ आहे, त्यास कॅस्ट्रोने परवानगी दिली नाही. लोक जाऊन किनाऱ्यावर बसले. तेथे राहण्याची किंवा प्रातर्विधीची सोय नव्हती अतिशय गलिच्छ स्थितीत ते राहिले. याचे वर्णन ती आपल्या पद्धतीने करीत होती. शेवटी त्याचा अर्थ एकच की, क्युबन सरकारने त्याना तुच्छतेने वागविले. जमेची बाजू अशी की, पूर्व बर्लिन अगर पूर्व जर्मनीप्रमाणे पलीकडे जाऊच द्यायचे नाही असे त्यानी केले नाही. " तुम्ही गेल्याने देश ओस पडणार नाही ", हा आत्म-विश्वास त्यात होता. परतु एक रुग्णालय पाहण्यास आम्ही गेलो तेव्हा

रुग्णालय अगदी आधुनिक होते, परंतु डॉक्टर्स कच्चे वाटले. या १ लाख २० हजारात अनेक नत्रज्ञ व डॉक्टर्स गेले व त्यामुळे क्युबाचे नुकसान झालेच असेल या रुग्णालयात सामान्य माणसासाठी उपलब्ध असलेले डायलेसिस्‌चे मशीनही होते. मुंबईतही काही रुग्णालयात ते आहे. परंतु ग्रामीण भागाचे काय ? तेथे ही सर्व यंत्रणा ग्रामीण भागातील रुग्णालयात होती.

या ' एक्सोडस् ' मुळे अमेरिकन वृत्तपत्रांनी फार मोठा फिडेलविरोधी प्रचार केला. त्याला उत्तर देण्यासाठी दि. १ मे १९८० रोजी कामगार दिनाच्या दिवशी हा २० लाखाचा मोर्चा निघाला. खरोखरच मानवतेचा सागर उचंबळावा तसा अलोट जनसमुदाय जमला व तो सर्व पाहण्यासाठी अमेरिकन व इतर पाश्चात्य पत्रकारांना कॅस्ट्रोंनी बोलाविले. ओसे मार्टी क्रान्तिचौकात मग फिडेलचे तसेच प्रचंड भाषण झाले. ते सबंध भाषण छापलेला दि. ११ मेचा ' ग्रान्मा 'चा अंक सहसंपादिकेने आमच्यापुढे टाकला. " शांत राहा ", असे कॅस्ट्रोंने म्हणताच २० लाखाचा जनसमुदाय शांत झाला मग टाळ्या, घोषणा याच्या पार्श्वभूमीवर ते जोरदार भाषण तुफान रंगले. वृत्तपत्र जेव्हा त्या देशाच्या नेत्याशी एकरूप झालेले असते तेव्हा जे घडते ते स्फूर्तिदायकच असते. स्वातंत्र्य चळवळीच्या वेळी हीच स्थिती आपण पाहिली नाही काय ? परंतु स्वातंत्र्यानंतर ती राहिली नाही, कारण सेवेची जागा सत्तेच्या उपभोगाने घेतली.

आता हे जे क्युबन्स मियामीला गेले त्याच्याबद्दल विविध तऱ्हेचा मजकूर ' ग्रान्मा'त येतो व अमेरिकन वृत्तपत्रातही येतो. या लोकांची भाषा स्पॅनिश मेक्सिकोची भाषा स्पॅनिश व त्यामुळे अमेरिकेच्या या भागातून इंग्रजी नाहीशी होते आहे, अशा तक्रारी चालू आहेत. या भागातील एका घरावर, " आम्ही इंग्रजी बोलतो ", अशी पाटी लावलेली पाहिल्याचे मी एकाकडून ऐकले मियामी भागात चोऱ्या व गुंडगिरी फार वाढली हे अमेरिकन्सही मान्य करतात. परंतु गेले ते काही सर्वच गुंड नव्हते. हजारो स्वातंत्र्यप्रिय, कम्युनिझम नको असलेले लोक गेले व त्यांनी या परिसरात चांगले कामही उभे केले आहे.

लंडन ' टाइम्स 'चा प्रतिनिधी इन्व्हॉर डेव्हिस हा मियामीला गेला व

त्याने तेथे वसलेल्या नव्या हवानाची पाहणी केली. मियामीच्या मोठमोठ्या इमारतींच्या मागे हे ' लिटल् हवाना ' वसलेले आहे. प्रत्येक गोष्ट दुसऱ्या बाजूने पाहिली तर वेगळी दिसते. ' ग्रान्मा 'च्या सहसंपादिकेने आमचा देश अमेरिकनवाजिंग्या व चोरदरोडेखोराच्या तावडीतून कसा मुक्त केला ते सांगितले. या इन्व्हॅर डेव्हिसने त्याच क्युबन्सने या मियामीची कशी भरभराट केली ते लिहिले आहे.

तो लिहितो, " मियामीचा किनारा म्हणजे भांडवलशाहीच्या प्रदर्शनाचे पुरेपूर प्रतीक आहे. समोर हिल्टनचे प्रचंड हॉटेल आहे. त्यांनी नुकतेच अडीच कोटी डॉलर्स केवळ पोहोण्याचा तलाव व किनाऱ्याच्या सजावटीवर खर्च केले. जगातील श्रीमंताची म्हणून ती मक्का झाली आहे." ( क्युबा-पासून ही श्रीमंतांची मक्का केवळ ९० मैलावर आहे.)

तो पुढे लिहितो, " मियामीच्या या विस्ताराबद्दल एका माणसाचे लोकांनी आभार मानावयास हवेत. तो म्हणजे फिडेल कॅस्ट्रो. त्यांनी १० लाख लोकाना येथे पाठविले व त्यानी आमची मियामी उभी केली. २० वर्षांपूर्वी येथे आलेल्या क्युबन कुटुंबाचे सरासरी उत्पन्न महिन्याला २,२२९ डॉलर्सवरून २२ हजार डॉलर्सवर गेले आहे. (क्युबन झाडूवाल्यास साधारण ५०० डॉलर्स वेतन मिळते. दोन आर्थिक पद्धतीतील हा फरक आहे. येथे तो सर्व विकत घेतो. तेथे त्याला सरकार पुरविते. आज मियामीत साडेसात लाख क्युबन्स राहतात व त्याचे १९८१ मधील एकूण उत्पन्न १ अब्ज २० कोटी डॉलर्स होते तर त्याच वर्षातील क्युबातील सर्व लोकांचे मिळून उत्पन्न १ अब्ज ४० कोटी डॉलर्स इतकेच होते " क्युबाच्या मानाने हे मियामीचे क्युबन्स फारच श्रीमंत आहेत हे खरे असणारच. कुणाची पिळवणूक करून ते इतके श्रीमंत झाले हाच शेवटी चर्चेचा विषय राहील. १९७७ मध्ये मियामीत परदेशी बँका नव्हत्या आज अनेक बँका व २५० बहुदेशीय महामंडळे येथे आहेत व त्याचे प्रमुख हे नवे क्युबन-अमेरिकन्स आहेत. त्यांनीच साडेतीन मैल क्षेत्रफळाचे नवे हवाना समोर वसविले आहे. तेथे स्पॅनिश मासिके निघतात. क्युबन उत्सव साजरे होतात. त्यात भाग घेण्यासाठी अंगोला आदी आफ्रिकन वसाहतींमधून बाहेर आलेले लोक येतात. कॅस्ट्रोनी सोडून

दिलेल्या कैद्यानी या छोट्या हवानात भरपूर मारामाऱ्या केल्या, परतु त्यापैकी काही आता अमेरिकेच्या तुरुंगात आहेत तर काहींचा इतरानी बळी घेतला आहे असे हा पत्रकार लिहितो.

तो पुढे लिहितो, " आपला देश एक दिवस कॅस्ट्रोच्या तावडीतून मुक्त होईल व आपण आपल्या देशाला परत जाऊ अशी स्वप्ने शेवटी ते रगवितातच." याउलट आपल्या या भाईबदांनी अमेरिकेचे हस्तक बनू नये अशी याची इच्छा. या संघर्षाच्या प्रतिक्रिया 'ग्रान्मा'त प्रकट होतात व कधीकधी नॅशनल ॲसेंब्लीतही चर्चा होते. अमेरिकेच्या मागील दारी कम्युनिस्ट देश निर्माण झाला ही त्याची खंत, आपला देश कम्युनिस्ट झाला याची मियामीच्या क्युबन्सची खंत तर खऱ्या अर्थाने सामान्य जनतेचा नेता सत्तेवर आला, तो आर्थिक विषमता कमी करून सर्वांना अन्न, वस्त्र, निवारा देतो व आयुष्यात उत्कर्षाची समान संधी उपलब्ध करतो आहे म्हणून अभिमान अशी ही रूपे आहेत. 'ग्रान्मा'च्या सहसंपादिकेची भेट पुन्हा एकदा आमच्या हॉटेलात झाली. काही पाहुण्यांबरोबर ती आली होती. अमाप उत्साहाने ती बोलत होती एक बरे वाटले, तिचे आपल्या दैनिका-वर प्रेम होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
इ. नं.
दा. क्र. २७७२०९
ग्रंथ शाखा (स्थळ)

१

○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○

# क्रान्तीचा बुलंद नेता कॅस्ट्रो

क्रान्तीनंतरचा क्युबा समजून घ्यायचा असेल तर त्या क्रान्तीच्या बुलंद नेत्याचा परिचय करून घ्यावयास हवा व आजचे सामर्थ्य त्याना ज्य क्रान्तीने दिले, तिचीही थोडी ओळख हवी. १३ ऑगस्ट १९२६ रोजी क्युबातच, ओरियेन्ते प्रांतातील बिरान या गावी फिडेल अँजेल कॅस्ट्रोचा जन्म झाला. वडील आधी स्पेनमध्ये शेतमजूर होते. १८९८ मध्ये स्पॅनिश सैन्याबरोबर ते क्युबात आले. मग परत गेले नाहीत. क्युबातील एका अमेरिकन कंपनीत नोकरीस लागले, सुपरवायझर झाले. जमीनमालक बनले, पैसेवाल्या जमीनदारात त्यांची गणना होऊ लागली.

त्यांची पत्नी ही त्यांची मूळ स्वयंपाकीण. ती स्पॅनिश. तिला एकूण सात अपत्ये झाली चार मुली आणि तीन मुलगे. फिडेल हा अपत्यात चौथा व मुलांत दुसरा फिडेलचा जन्म झाल्यावर पित्याने कायदेशीर लग्न लावले. १९३१ मध्ये फिडेल पाच वर्षांचा होता तेव्हा क्युबातील मचाडोची सत्ता संपली व तो पळून गेला. बाटिस्टा या साध्या सार्जंटने सत्ता हाती घेतली. पुढे तोही पळाला, परंतु १९५२ मध्ये परत आला. कॅस्ट्रो आता २६ वर्षांचा झाला होता. त्या मधल्या काळात ऑर्थोडोक्सी पार्टीचा एडुओर्डो छिबास हा नेता म्हणून पुढे आला. लोकांचे खरे हित साधावे या आकांक्षेने कामास लागला, परंतु तो इतका भावनाप्रधान की दूरदर्शन-वर भाषण करीत असतानाच त्याने स्वतःच पिस्तल झाडून आत्महत्या

केली. लोकानी ती पाहिली.

आजच्या क्युबाचा स्फूर्तिदाता म्हणजे ओसे मार्टी. क्युबाचे ते महात्मा गांधी असे मी यापूर्वी म्हटले आहे. परंतु मार्टी याच्या स्वातंत्र्यलढ्याचा मार्ग अहिंसेचा नव्हता. त्याचे मनोधैर्य व पराक्रम आणि त्यातच समरांगणी ठेवलेला देह याचा विचार करता ओसे मार्टीची अधिक तुलना नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याशीच होऊ शकते. मी फेब्रुवारी १९८३ मध्ये क्युबात गेलो. त्याआधी ३० जानेवारी रोजी या क्युबाच्या भाग्यविधात्याची १३० वी जन्मतिथी तेथे मोठ्या थाटात साजरी झाली होती. २८ जानेवारी १८५३ चा ओसे मार्टीचा जन्म व त्याची सर्वांत मोठी कामगिरी म्हणजे स्पेनच्या सत्तेला त्यानी लावलेला सुरुंग. ओसे मार्टीमुळेच साम्राज्यवादी स्पेन शेवटी क्युबा सोडून गेले. फिडेल कॅस्ट्रोच्या उपस्थितीत हा जन्मदिन साजरा झाला. पायोनियर्स कॅम्पमधील मुलाना त्या दिवशी प्राधान्य होते. त्यानी १३० पुष्पकरंड्या मार्टीच्या स्मारकाला वाहिल्या फिडेल कॅस्ट्रो त्या दिवशी भाषणात म्हणाला, "आम्ही त्याचे आज येथे स्मरण करतो आहोत. रोज आम्ही त्याचे वर्गात स्मरण करतोच. कारण आमच्या शाळांचे वर्ग हे आमचे लढण्याचे किल्ले आहेत. पेन्सिली आणि वह्या ही आमची शस्त्रे आहेत. देशात उज्ज्वलतेकडे नेणारी लढाई या शस्त्रांनी आम्ही लढतो आहोत!"

जुन्या हवानात एका साध्या घरात ओसे मार्टी पेरेझ याचा जन्म झाला. मार्टी क्रान्तिकारक बनला, तेव्हा क्युबा मुक्त करणे इतकेच त्याचे ध्येय नव्हते. सबंध अमेरिकेत बदल व्हावयास हवा, लॅटिन अमेरिका तर भांडवलशाहीच्या जोखडाखालून मुक्त व्हायलाच हवी, या विशाल दृष्टीतून ते लढत होते. त्यामुळे आज क्युबा लॅटिन अमेरिकन देशाचे नेतृत्व करतो तो वारसा ओसे मार्टी व चे गव्हेरा याचा आहे. मार्टी हा त्या खंडातील सर्व साम्राज्यवादविरोधी राष्ट्राचा नेता. जानेवारी ९ ते ३० पर्यंत मार्टीचा हा १३० वा वाढदिवस क्युबात साजरा झाला तेव्हा १३० तरुणानी मार्टीच्या लाग मार्चची अनुभूती, ते सर्व ३७५ किलोमीटर्सचे अंतर स्वत चालून, घेतली. ज्या प्रांतात ग्रान्मा बोट घेऊन फिडेल उतरला, त्याच भागात मार्टीचे सैन्य होते. त्या प्रांताचे नावही वृत्तपत्राप्रमाणे आता ग्रान्मा झाले

आहे. या प्रांतातूनच १३० तरुणांनी हा लाँग मार्च काढला. ११ एप्रिल १८९५ रोजी ओसे मार्टी क्युबात उतरला व स्पॅनिश साम्राज्यशहांची सत्ता उलथून पाडण्यासाठी चालत निघाला " हे आवश्यक युद्ध आहे," हे त्या वेळचे त्याचे शब्द. १९ मे १८९५ रोजी स्पॅनिश सैन्याने त्याच्या सैनिकांना घेरले व शेवटी मार्टीला गोळी लागली ११ एप्रिल ते १९ मे असे ३० दिवस हे तरुणही चालले. ज्या ठिकाणी मार्टीचे निधन झाले तेथे तरुणाच्या मोठा मेळावा भरला व 'ग्रान्मा' दैनिकाचे संपादक जॉर्ज एनरिक् मेंडोझा यांचे भाषण झाले. सान्शियागो गावात मार्टीची समाधी आहे. राजघाट जवळ असल्याने बडे पाहुणे तेथे जातात तसे या समाधीचे नाही. परंतु क्युबाच्या सर्वश्रेष्ठ राष्ट्रीय नेत्याचे स्मारक म्हणून ते कॅस्ट्रोने जपले आहे. १८६८ पासून हा क्युबाच्या स्वातंत्र्याचा संग्राम चालला होता ८० हजार स्पॅनिश सैनिक आणि ४ लाख क्युबन्स या लढ्यात मृत्युमुखी पडले. अनेक स्वातंत्र्यवीरांना तुरुंगात उपाशी ठेवून मारले. आज समाजवादी क्युबन्सचा अमेरिकेविरुद्धचा राग अशासाठी आहे की, जेव्हा क्युबाचे हे वीर स्पेनविरुद्ध लढत होते तेव्हा अमेरिका त्यांच्या मदतीला कधीच आली नाही. एक साम्राज्यवादी राष्ट्र दुसऱ्या साम्राज्यवादी राष्ट्राविरुद्ध कधीच शस्त्र उचलत नाही. आणि जेव्हा स्पेन पराभूत होण्याची वेळ आली तेव्हा ते आयतोबासारखे पुढे आले. " अमेरिकन साम्राज्यवादाचा इतिहासच तसा आहे. स्पॅनियार्ड जेव्हा अगदी पराभवाच्या कड्यावर आले तेव्हा कुठे हे अमेरिकन्स गळून पडलेले आंबे झेलायला पुढे आले ", असे केले जाणारे वर्णन अगदी यथार्थ आहे. पुढे स्पेन व क्युबात करार होण्याऐवजी तो स्पेन व अमेरिका यांच्यात पॅरिसला झाला. त्यामुळे ओसे मार्टीच्या स्वातंत्र्य कल्पनांनी भारलेला क्युबन तरुण कसा दबा धरून बसला होता. ओसे मार्टीचे लेखन व भाष्य इतके ओजस्वी होते की, आजही त्याच्या उक्तींचा उल्लेख सर्वांच्या भाषणात होत असतो ओसे मार्टीच्या लेखनाचा, भव्योदात्त विचाराचा अभ्यास करण्यासाठी या स्मारकासमोरच एक अतिशय मोठे संशोधनकेंद्र प्रस्थापित केलेले आहे. भारताचा स्वातंत्र्यलढा जसा १८५७ पासून सुरू होतो तसा क्युबाचा स्वातंत्र्यलढा १८६८ पासून सुरू होतो. ओसे मार्टी हा त्यामधील पहिला

मोठा नायक आहे. दुसरे स्थान चे गव्हेराला आहे व तिसरे फिडेल कॅस्ट्रोला आहे. चे तर मूळ अर्जेंटिनाचा. लॅटिन अमेरिकन जग व मध्य अमेरिका मुक्त करणे हे त्याचे स्वप्न ओसे मार्टीच्या बलिदानातून स्फुरलेले. क्युबाचे सुदैव की फिडेल व चे एकत्र आले व एकत्र आले म्हणूनच आजचा स्वतंत्र क्युबा उभा आहे.

ओसे मार्टीचे नाव घेऊन २६ जुलै १९५३ च्या पहाटे २६ वाहनाचा ताफा घेऊन २७ वर्षांचा कॅस्ट्रो मोंकाडा बराकींवर हल्ला करण्यासाठी निघाला १७५ तरुण त्याच्याबरोबर होते व त्यात परिचारिकाच्या वेषातील दोन तरुणीही होत्या. तीस वयाचे पदवीधर तरुण त्यात होते. बयामो ही दुसरी लष्करी बराक ताब्यात घेण्यासाठी २७ जणांची तुकडी त्याने पाठवून दिली होती. भाऊ राऊल कॅस्ट्रो याच्यावर पॅलेस ऑफ जस्टिस् घेण्याची जबाबदारी टाकली होती. अशी चौफेर योजना आखून फिडेलने मोंकाडा बराकीवर हल्ला केला. पहाटे सव्वापाचला फिडेलच्या सब-मशीनगनमधून पहिली गोळी सुटली, परंतु दुर्दैवाने बंडखोराची एक मोटार रस्त्यावरून घसरली व सर्व योजनाच फसली. एक सशस्त्र पथकच गार्डरूममधून बाहेर आले. त्यात दुसरी तुकडी मदतीला वेळेवर आली नाही. पळापळ झाली. रुग्णालय बंडखोर सैनिकांनी ताब्यात घेतले व रुग्ण होऊन फिडेलचे काही सैनिक झोपले. परंतु शेवटी जिवंत राहिले ते सारे पकडले गेले. फिडेलसह तिकडे राऊल कॅस्ट्रोने पॅलेस ऑफ जस्टिस् घेतले, परंतु येथे तिघे ठार झाले, ५० पळाले, ६८ जण तुरुंगात गेले. त्यापैकी ३२ तुरुंगात हालाने मेले. परंतु या त्यागाच्या ठिणगीने सारे राष्ट्र जागे झाले. फिडेल कॅस्ट्रो या नावाचा नवा नेता उदयाला आला. भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांच्या फाशीने जसे राष्ट्रात चैतन्य संचारले तसे या पहिल्या पराभवाने झाले. क्युबाचा हुकूमशहा फुल्जेन्शो बातिस्टाचा विजय झाला होता. कॅस्ट्रो पकडला गेलेला होता व त्याच्यावर रीतसर देशद्रोहाचा खटला भरण्यात आला. या पहिल्या खटल्याच्या वेळेसही कॅस्ट्रोने पाच तास भाषण केले. तासन्तास भाषणे करण्याचा शौक त्याला पहिल्यापासून असावा. या भाषणापासून कॅस्ट्रोने क्युबावरच नव्हे तर जगावर भाषणांचा पाऊस पाडण्याचे जे काम सुरू केले ते आजतागायत चालू आहे. कोर्टातील या

भाषणात कॅस्ट्रोने एक वाक्य उच्चारले ते बीजयंत्रासारखे देशभर गेले "कंडेम् मी ! इट डज् नॉट मॅटर. हिस्टरी विल् ॲब्सॉल्व्ह मी !" "मला खुशाल शिक्षा करा. त्यामुळे काही होणार नाही. इतिहास मला न्याय देईल." परंतु कोर्टाने इतिहासाचा विचार न करता कॅस्ट्रोला पंधरा वर्षांची शिक्षा ठोठावली आणि पाइन द्वीपावरील तुरुंगात नेऊन ठेवले. २६ जुलै हा दिवस इतिहासात नोंदला गेला, परंतु कॅस्ट्रो तुरुंगात गेला. दोन वर्षे तशीच गेली क्युबात राजकीय शांतता झाली राजबद्यांची सुटका करा अशी मागणी लोकांनी सुरू केली. १२ मे १९५५ रोजी खुद्द क्युबाच्या पार्लमेंटमध्ये तशी मागणी झाली बाटिस्टाला कॅस्ट्रो कळला नव्हता. त्याने त्याच्यासकट सर्वांची सुटका केली. त्या तुरुंगात फिडेलने काय केले याचीही नीट माहिती बाटिस्टाने घेतली नसावी त्या सातामारियाच्या तुरुंगाला 'आबेल सातामारिया अकादमी' असे नाव कॅस्ट्रोने दिले. कोऱ्या कागदावर लिंबाच्या रसाने त्याने आपले कोर्टातील भाषण लिहून काढले व ते बाहेर पाठविले. 'इतिहास मला मुक्त करील' हे वाक्य संदेशासारखे क्रान्तिकारकांनी उचलले. येथे सातामारिया अकादमीत बौद्धिके चालू होती. अनुयायांची गाढ श्रद्धा कॅस्ट्रोवर होती व तो जिवंत आहे म्हणजे क्रान्ती जिवंत आहे असे ते मानत होते. आणि कॅस्ट्रोची सुटका झाली, तो हवानात आला. सहकाऱ्यांशी त्याने विचारविनिमय केला व शेवटी मेक्सिकोला जाण्याचे ठरले. शस्त्रास्त्रे व सहकारी दोन्ही मिळविणे आवश्यक होते. १९५५ च्या जुलै महिन्यात कॅस्ट्रोने मेक्सिकोला प्रयाण केले. अतिशय दु:खाने. परंतु जाताना एका बोहेमियन मासिकात कॅस्ट्रोने लिहिले, "आम्ही परत येऊ ! स्वातंत्र्य आणि समता यांची ज्योत जेव्हा आम्ही आणू तेव्हाच आम्ही परत. भ्रष्टाचार आणि भूक यांना हद्दपार करण्यासाठी नागरी शांततामय लढ्याचे सर्व दरवाजे आता लोकांना बंद झाले आहेत. आता एकच उपाय आहे, बंदूक—" माओचा सिद्धान्त घेऊनच कॅस्ट्रो मेक्सिकोच्या भूमीत उभा राहिला. त्याचा भाऊ राऊल तेथेच आधी पोहोचलेला होता. मेक्सिकोच्या या मुक्कामातील सर्वांत महत्त्वाची घटना म्हणजे राऊलने चे गव्हेराची करून दिलेली ओळख. मेक्सिकोतील एका छोट्या घरात, कडक थंडीच्या रात्री या दोन महान क्रांतिकारकांची भेट

झाली. या वेळी क्युबात जाताना मी दोन दिवस मेक्सिकोत होतो. फिडेल-चे भेट ही काही मोठी इतिहासकाळातील भेट नव्हे. २८ वर्षांपूर्वी याच शहरात फिडेल क्युबाहून बोटीतून येतो, अर्नेस्टो चे गव्हेराला भेटतो, आणि हे दोघे इतिहास घडवितात इतिहास घडविणारे काही वेगळेच असतात, असे मेक्सिकोत फिरताना वाटले. फिडेल व चे रात्रभर बोलत बसले. लॅटिन अमेरिकेच्या राजकारणापासून क्युबाच्या स्वातंत्र्यापर्यंत सर्व वेल त्यांनी आखले. या भेटीने फिडेलला एक नवा जोडीदार मिळाला. त्याच्यापेक्षाही तेजस्वी. कोणत्याही त्यागाला तयार असलेला महा धाडसी. आज जगात चे गव्हेराभोवती रोमहर्षकतेचे जे वलय आहे ते कुणाभोवतीच नाही. कारण त्याने केवळ क्युबाचा विचार केला नाही तर सबंध लॅटिन अमेरिकेत पददलितांची क्रांती घडविण्याचे त्याचे ध्येय होते म्हणूनच क्युबात फिडेल सत्तेवर आल्यानंतर तो तेथे थांबला नाही. सत्तेची फुले चाखत तो बसला नाही. तो पुन्हा बंदूक घेऊन निघाला आमचा क्युबाचा मार्गदर्शक मित्र पुन्हा पुन्हा आम्हाला सांगत होता, "चे इतका मोठा होता की, क्युबावर इतर राष्ट्राचा रोप होऊ नये, म्हणून त्याने जाताना क्युबाचे नागरिकत्व सोडले !" मी त्याला म्हटले, "काही जगत्-नेते असतात, तसा तो जगाचा क्रांतिकारक होता ! सारे जगच त्याला मुक्त करावयाचे होते." आश्चर्य असे की, या तरुण व देखण्या क्रांतिकारकाला दम्याचा विकार होता. आणि तो विकार असतानाही फिडेलबरोबर तो एक दिवस निघाला. क्युबा मुक्त करण्यासाठी. सर्व हालअपेष्टा सहन करण्यासाठी.

मेक्सिकोत असताना पैसे जमा करण्यासाठी फिडेल कॅस्ट्रो अमेरिकेत गेला. पुन्हा गुप्तपणे गेला नाही. एकेरी भाडे उसने घेऊन तो गेला व न्यूयॉर्क, फिलाडेल्फिया व आज गाजत असलेले मियामी येथे जाहीर भाषणे देऊन त्याने हजारो डॉलर्स गोळा केले व नंतर मेक्सिकोहून क्युबाकडे त्याने कूच केले. जुलै १९५५ ते नोव्हेंबर १९५६ इतका काळ फिडेल मेक्सिकोत व अमेरिकेत मिळून होता. बाटिस्टाचा सुखाचा काळ तो एवढाच असावा दि. २५ नोव्हेंबर १९५६ चे गव्हेराला घेऊन फिडेल क्युबाकडे बोटीने निघाला. त्याच बोटीचे नाव ग्रान्मा. प्राताला व वृत्तपत्राला आपले नाव देणारी ही बोट फक्त १२ उतारूंची होती तिच्यात ८२

जण बसले मोंकाडा बराकीवरील हल्ल्याचा २६ जुलै हा दिवस क्युबन स्वातंत्र्यलढ्याचा मानबिंदू बनला होता व त्यामुळे २६ जुलै चळवळ हेच नाव या स्वातंत्र्यलढ्याला दिले गेले होते मेक्सिकोच्या आखातात २५ नोव्हेंबर १९५६ रोजी ही कॅस्ट्रोची ग्रान्मा उतरली व २ डिसेंबर रोजी क्युबाच्या बेलिक नावाच्या किनाऱ्याला लागली. या सात दिवसाच्या प्रवासात सर्व तऱ्हेचा त्रास या ८२ जणाना झाला. बोटीला भोक पडले, अन्न संपले, सर्वांना ओकाऱ्या झाल्या व शेवटी या स्वाऱ्या येत आहेत याची बातमी बाटिस्टाला कळल्यामुळे त्याच्या स्वागतासाठी त्याने किनाऱ्यावर सैनिक आणले. हा किनारा पुन्हा दलदलीचा. त्यामुळे चिखलातून भुकेलेले हे स्वातंत्र्य सैनिक क्युबा मुक्त करण्यासाठी चालत निघाले तेव्हा त्याच्यावर विमानातून व किनाऱ्यावरूनही गोळीबार झाला. केवळ दलदलीतील झाडी-मुळे कॅस्ट्रोचे, व त्याचे साथीदार वाचले. सिएरा मेस्त्राचा डोंगरी प्रदेश जवळच होता. तेथे पळून जाणे व जीव वाचविणे एवढेच बाकी राहिले होते.

कॅस्ट्रो, राऊल, चे आणि शस्त्रास्त्रेही गमावून बसलेले क्रांतिकारक वाधा टाकीत शेवटी सिएरा मेस्त्राच्या जंगलात पोहोचले व क्युबाच्या स्वातन्त्र्यलढ्याचे दुसरे पर्व निराशेच्या खाईत सुरू झाले. " आपण इथपर्यंत पोचलो म्हणजे क्रांती यशस्वी झाली म्हणून समजा," असे आत्मविश्वास-पूर्ण उद्गार कॅस्ट्रोने काढले ते स्वत ला व सर्वांना धीर देण्यासाठी. परंतु समोर काही विजयाचे ताट वाढून ठेवलेले नव्हते. भुकेलेल्या क्रांतिकार-कानी मळ्यातील ऊस खाल्ला व वाटेत चोथा टाकला. ज्या शेतकऱ्यानी या सिएरा मेस्त्राची वाट दाखविली त्यांनीच बाटिस्टाच्या सैनिकाना बंडखोराचे आश्रयस्थान दाखविले. मग काय ? या ८२ जणाना ठार मारण्यासाठी उसाचे मळेच पेटवून दिले व विमानातून या जंगल प्रदेशावर गोळीबार केला. सर्वांना जवळजवळ वेढलेच. चे गव्हेरा हा व्यवसायाने डॉक्टर. त्याचे उपचारही तोकडे पडले. दोन दिवस कुणी कुणाचा राहिला नव्हता. सर्वजण मरण पावले असा निष्कर्ष काढून सैनिक परतले. पुन्हा जे जिवंत होते ते एकमेकाना धुंडत एकत्र आले कॅस्ट्रो व चे दोघेही भेटले सैनिक भेटले. ८२ किनाऱ्यावर उतरले होते, त्यांपैकी फक्त बारा जण शिल्लक राहिले होते.

क्युबाची क्रांती या बारा जणांवर अवलंबून होती. मोंकाडा बराकीच्या हल्ल्या-नंतरचा हा दुसरा पराभव.

आज कॅस्ट्रो इतक्या कडव्या भाषेत का बोलतो हे समजण्यासाठी या पराभवाच्या कथा मुद्दाम दिल्या. अपार हालअपेष्टा त्यांनी त्या वेळी व नंतर सोसल्या आहेत. या १२ जणांनी नंतर आपले पाय रोवले, आधी सिएरा मेस्त्राचा हा डोंगरी प्रदेश पूर्ण मुक्त केला व मग आगेकूच करीत ते हवानापर्यंत गेले. गनिमी युद्धाचे सारे नवे शास्त्र चे व फिडेल यांनी येथे निर्माण केले. चेने नंतर त्यावर पुस्तकच लिहिले व आज सिएरा मेस्त्रातील गनिमी युद्धावरचे ' चे 'चे पुस्तक म्हणजे लॅटिन अमेरिकेतील क्रांतिकारकांचे बायबल झाले आहे; आणि कॅस्ट्रोची दाढी हे बंडखोरीचे प्रतीक झाले. हे दाढी प्रकरण पुढे इतके वाढले की, बातिस्टाचा एक सैनिक रजेवरून परतला तो दाढी वाढवून ! त्याला बंडखोर समजून लष्कराने ठार मारले. क्रांती यशस्वी झाल्यानंतर हवानाच्या गल्लोगल्लीत दाढीदीक्षित दिसू लागले तेव्हा सिएरा मेस्त्राच्या चळवळीत ज्यांनी भाग घेतलेला नाही, त्यांच्यावर दाढी वाढविण्यास बंदी घातली ! क्युबात फिरत असताना कॅस्ट्रो जसा कधीच दिसला नाही तसा दुसरा दाढीवालाही कुणी भेटला नाही ! त्याचे कारण नंतर समजले

हे सर्व चालू असताना एक अमेरिकन वार्ताहर गुपचुप सिएरा मेस्त्रात आला त्याने कॅस्ट्रोची मुलाखत घेतली व ती ' न्यूयॉर्क टाइम्स ' मध्ये प्रसिद्ध केली. कॅस्ट्रो जिवंत आहे व तो आता खुद्द क्युबात क्रांतीचा झेंडा घेऊन आहे हे साऱ्या जगाला कळले व खुद्द क्युबातील इतर क्रांतिकारकांना त्यामुळे चेव आला क्युबातील कम्युनिस्ट पक्ष स्वतंत्रपणे चळवळ करीत होता त्यांचे कॅस्ट्रोशी मुळीच सूत नव्हते, किंबहुना कॅस्ट्रोवर ते टीका करीत. हवानात कॅस्ट्रोने प्रवेश केला तेव्हा तेथील कम्युनिस्ट पक्षाला त्याला पाठिंबा देण्यापलीकडे पर्यायच उरला नाही. दोन मोठ्या पराभवानंतर पहिला विजय कॅस्ट्रोने मिळविला तो २८ मे १९५७ रोजी. ओरियेन्ते प्रांतातील एल् उव्हेरो हा लष्करी तळ फिडेल व चे यांनी रातोरात १६ किलोमीटर्स चाल करून घेतला. या विजयाने वातावरण बदलले. मोंकाडाच्या हल्ल्याची ' मूर्ख धाडस ' म्हणून हेटाळणी करणाऱ्या कम्यु-

निस्टाचा एक जुना नेता राफेल रॉड्रिग्ज स्वत कॅस्ट्रोच्या गनिमी सैन्याला येऊन मिळाला व प्रथमच कम्युनिस्ट-कॅस्ट्रो एक झाले. पुढे बाटिस्टाच्या लष्करातही क्रांतीचे लोण पोहोचले. त्यानी ५ सप्टेंबर रोजी सर्वत्र बंड करण्याचे ठरविले. पुढे त्यानी तो बेत बदलला. परतु शेनफुगो या नाविक तळावर निरोप पोहोचला नाही व तेथे बड झालेच. या बडाशी कॅस्ट्रो-चेचा सबध नव्हता. परतु त्या क्रांतिकारकानी तळच नव्हे तर शहरही तात्पुरते ताब्यात घेतले. परतु नतर बाटिस्टाचे सैन्य आले व शहर ताब्यात घेणाऱ्या क्रांतिकारकाची त्यानी अमानुष कत्तल केली. परतु या कत्तलीने सारा क्युबा क्रातिसन्मुख झाला शेवटची लढाई २४ मे १९५८ रोजी सुरू झाली. हा सारा इतिहास आपल्या निदान तीन पिढ्याच्या समोर घडलेला आहे. परतु तो आपल्याला माहीत नसण्याचीच शक्यता अधिक बाटिस्टाने सारे सैन्य, विमाने, रणगाडे, रॉकेटस् सारे कॅस्ट्रोवर व त्याच्या मूठभर बड-खोरावर सोडले जून आणि जुलै असे दोन महिने घनघोर लढाईचे गेले. बाटिस्टाच्या सैन्याच्या हालचालींची खडानूखडा माहिती देणारे लोक आता तयार झाले होते व अचानक हल्ले करून कॅस्ट्रोचे सैनिक त्याचा पराभव करीत होते. वैमानिक बॉब टाकीत होते, परतु त्याचा काही उपयोग होत नव्हता. शेवटी २९ जूनला फिडेलने प्रतिहल्ला सुरू केला व विजयाच्या दिशेने खरी वाटचाल सुरू केली. सिएरा मेस्त्राला वेढा घालून बसलेले बाटिस्टाचे सैनिक पळून गेले. ४५० सैनिक कॅस्ट्रोच्या सैनिकानी पकडले. दुसरीकडे ३० ऑगस्ट १९५८ रोजी चे गव्हेरा ८० क्रांतिकारकाच्या दोन तुकड्या घेऊन पायी लास विलास या दुसऱ्या प्रांताकडे चालत निघाला. कारण त्याचे पेट्रोलच सरकारी सैन्याने वाटेत अडविले बादळे आणि पाऊस, नद्या आणि नाले ओलाडत आलेला चे गव्हेराचा हा लाँग मार्च म्हणजे आजच्या क्युबन तरुणाचा सजीवनी मत्र आहे. कारण पुढे त्याने रस्ता बदलला व कॅस्ट्रो सात्यागोला पोहोचण्यापूर्वीच साताक्लारा येथे चेच्या या मूठभर बडखोरानी बाटिस्टाच्या सैन्याचा सरळ पराभव केला. ३० डिसेंबर १९५८ रोजी साताक्लाराचे रेडियो स्टेशनही बंडखोरानी मिळविले आणि चे गव्हेराने सबंध क्युबाला क्रातीचा सदेश दिला दुसरीकडे सात्यागोला फिडेलचा वेढा पडलेला. सात्यागोही पडणार हे लक्षात येताच बाटिस्टाने

तहाची बोलणी करण्यासाठी कॅस्ट्रोकडे जासूद पाठविला. सातावारा घेतल्या-नंतर चे ला हवानावर चाल करून जाण्याचा आदेश कॅस्ट्रोने दिला चे निघणार इतक्यात बातमी आली. नव्या वर्षाचे ते नवे शुभवर्तमान. दि. १ जानेवारी १९५९ च्या पहाटेस बातिस्टा आपल्या सर्व परिवारासह, नोटांनी भरलेल्या ट्रंकासह, सोने व जवाहिर यांच्यासह पळून गेला होता. डोमिनिक रिपब्लिकच्या दिशेने त्याचे विमान उडाले व हवानाचच नव्हे तर सबंध क्युबा मुक्त झाले.

जी मोकाडा बरॅक घेताना कॅस्ट्रोला पहिली अटक झाली त्याच बराकीवर उभे राहून दि २ जानेवारी १९५९ रोजी फिडेल कॅस्ट्रोने स्वातंत्र्याचा पुकारा केला. क्रांतिकारकांची राजवट सुरू झाल्याचे घोषित केले व तो हवानाकडे निघाला. एक हजाराची फक्त फौज त्याच्याकडे होती. सान्तियागो-हवाना हे अंतर फार दूरचे. हा विजयाचा लाँग मार्च होता फिडेलचे सैन्य पुढे चालले आहे प्रतिकाराचे सोडाच, परंतु लोक स्वागतासाठी उभे आहेत, हजारो लोक मागे चालत आहेत, फिडेल जोरदार भाषणे देत आहे, असे ते दृश्य होते नव्या युगाचा मानकरी, लोकनेता फिडेल कॅस्ट्रो राजधानीच्या दिशेने विजयी पावले टाकीत पोहोचला तेव्हा त्याचे हवानात जे स्वागत झाले ते अपूर्व होते. हवानात फिरताना त्या स्वागताची वर्णने ऐकली. गावातील सारे श्रीमंत आपले काय होणार या भीतीने दारे बंद करून बसले होते व खिडक्यांच्या काचातून पाहात होते. हवानात आमच्या रोज फेऱ्या होत. तेव्हा ते प्रासादतुल्य बंगले आम्ही पाहात होतो. या घरात राहतात ते लोक पूर्वी राहणारे नाहीत हे सहज कळत होते. क्रांती यशस्वी करणारा हा महान नेता जेव्हा हवानात शिरला तेव्हा त्याची वाट पाहात एक अगदी कोवळा मुलगा उभा होता. कॅस्ट्रोचा मुलगा फिडेलिटो. विद्यापीठात शिकत असतानाच १२ ऑक्टोबर १९४८ रोजी फिडेलने एक विद्यार्थिनी मिर्थी डायस बलार्ट हिच्याशी विवाह केला. तिचा बाप आणि भाऊ हे बातिस्टाचे मोठे अधिकारी त्यामुळे आधीच घरून विरोध होता. पुढे फिडेल मोकाडा हल्ल्यानंतर तुरुंगात गेला तेव्हा पत्नी भावाकडून पैसे घेऊ लागली. फिडेलच्या पत्नीला सरकारकडून पैसे मिळतात असे एका मंत्र्याने जाहीर केले. दोघात वितुष्ट आले. मिर्थीने घटस्फोट घेतला. मुलगा

झाला होता तो क्रांतीची वाट पाहात हवानात बसला होता. त्याला घेऊन कॅस्ट्रो हवानाच्या अध्यक्षीय राजवाड्यात गेला व तेथून त्यांनी पहिले भाषण केले. परंतु बातिस्टाचे वास्तव्य असलेली जागा म्हणजे कॅम्प कोलंबिया. तेथे तर प्रचंड जनसागर लोटला होता. कबुतरे उडत होती. एक कॅस्ट्रोच्या खांद्यावर जाऊन बसले. क्रांतिपर्व संपले होते, शांतिपर्व सुरू झाले होते. कॅम्प कोलंबियाचे फिडेल कॅस्ट्रोचे भाषण म्हणजे परमेश्वराने गायलेले स्वातंत्र्य स्तोत्र असे लोकांना वाटले. कारण 'हॅव्हज्' चे– असलेल्यांचे राज्य संपले होते, 'हॅव्ह नॉटस्' चे– काहीही नसलेल्यांचे राज्य सुरू झाले होते !

## १०

०००००००००००००००००००००००००००००००००

# स्वातंत्र्याकडून तटस्थतेकडे

१ जानेवारी १९५९ मध्ये फिडेल कॅस्ट्रो यानी क्युबाची सूत्रे हाती घेतली. अमेरिकेच्या दृष्टीने एक नवी समस्या निर्माण झाली कॅस्ट्रोची पहिली दोन वर्षे आपले पक्षातर्गत प्रश्न मिटविण्यातच गेली कॅस्ट्रो व क्युबन कम्युनिस्ट पक्ष वेगळा होता दोघांना आपले वर्चस्व प्रस्थापित करावयाचे होते कॅस्ट्रोला आपले स्वतंत्र अस्तित्व गमवावयाचे नव्हते व मॉस्को कॅस्ट्रोला पाठवावयाचे निरोप स्थानिक कम्युनिस्ट पक्षामार्फत पाठवीत असल्याने कॅस्ट्रो मॉस्कोवर नाराज होता. भारतीय कम्युनिस्ट पक्षाबाबत जे झाले तेच लॅटिन अमेरिकन देशातील कम्युनिस्ट पक्षाचे मॉस्कोने केले. मॉस्कोने धोरण फिरविले की रात्रीत लोकयुद्ध नाहीतर शत्रुयुद्ध असे वडल्याने हे पक्षही बदनाम झाले होते. अमेरिकेने जरा घाई केली नसती व ' बे ऑफ पिग्ज ' चे प्रकरण निर्माण केले नसते तर मॉस्कोची मदत घेणे कॅस्ट्रोने टाळले असते व आजची परिस्थिती निर्माण झाली नसती. परंतु शेवटी कोणत्या तरी गटात सामील करून घेण्याची घाई सुटलेल्या अमेरिकेला व रशियाला कोण काय सागणार ? खरीखुरी तटस्थता उभयताना मानवत नाही, या समस्येला शेवटी फिडेल कॅस्ट्रोला तोंड द्यावे लागले व मॉस्कोची मदत घ्यावी लागली ती ' बे ऑफ पिग्ज ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या घटनेने.

केनेडी सत्तेवर येऊन चारच महिने झाले होते व सी. आय्. ए. आणि अमेरिकेच्या संरक्षण खात्याने क्युबा घेण्याचीच योजना त्यांच्यापुढे ठेवली.

अमेरिकेतील क्युबन्सना अमेरिकेने एकत्र केले होते, त्यांना सैनिकी शिक्षण दिले होते, व क्युबाच्या किनाऱ्यावर त्यांना उतरविण्याची योजना तयार केली होती क्युबाचेच लोक आपला देश मुक्त करण्यास जातात, तेथे पाय रोवून सरकार स्थापन करतात व अमेरिकेची मदत मागतात असा तो बेत होता. केनेडींनी अनुमती दिली व हे "क्रांतिकारक" क्युबन्स बोटीतून निघाले. केनेडींनी एकच अट घातली होती की, कोणत्याही परिस्थितीत त्यांनी सरकार स्थापून मदत मागितल्याशिवाय अमेरिकन लष्कराने त्यात पडायचे नाही. सर्व गुप्त पोलिस खाती आपल्या राज्यकर्त्यांना नेहमीच हवे तेच अहवाल देत असतात तसेच येथे घडले. क्युबातील बहुसंख्य लोक कॅस्ट्रोच्या विरुद्ध आहेत, तेथे हे सैन्य उतरताच ते मदतीला येतील असा अहवाल सी. आय्. ए. चा होता. परंतु तसे घडले नाही. उलट कॅस्ट्रोच्या ग्रामीण सैन्याने त्यांना इतका कडवा प्रतिकार केला की त्यांना पळता भुई थोडी झाली. १६ अमेरिकन विमाने त्यांना साहाय्य करीत होती, परंतु जवळच येऊन उभी राहिलेली प्रचंड मोठी लढाऊ नौका त्यांना मदत करीना. 'आम्हाला तसे आदेश नाहीत,' असे सांगून ते मोकळे झाले १९ एप्रिल १९६२ रोजी ही लढाई संपली तेव्हा १,११३ हे तथाकथित क्युबन सैनिक कॅस्ट्रोच्या सैन्याने पकडले. त्यांना आता सोडवून कसे आणावयाचे हाच प्रश्न केनेडीपुढे उभा राहिला. नव्याने अध्यक्षपदावर आलेल्या केनेडींची नाचक्की झाली व शेवटी बऱ्याच वाटाघाटीनंतर प्रत्येक सैनिकामागे १७ हजार पौंड्स म्हणजे तीन लाख रुपये इतका दंड देऊन केनेडींनी त्यांची सुटका करून घेतली.

परंतु या प्रसंगाने क्युबा रशियाच्या जवळ गेला तो कायमचा. आणि त्यामधून जगाला अणुयुद्धाच्या दिशेने नेणारा तो केनेडी-क्रुश्चेव संग्राम निर्माण झाला. दि. २ जुलै १९६२ रोजी राउल कॅस्ट्रो, क्युबाचा संरक्षण-मंत्री या नात्याने मॉस्कोत उतरला व या भेटीत क्युबामध्ये अण्वस्त्रधारी अग्निबाणाचे तळ उभारण्याचे ठरले. अमेरिकेपासून कायमचे संरक्षण मिळविण्याचा विचार कॅस्ट्रोने केला तर अमेरिकेच्या तोंडावरच अण्वस्त्रे बसविण्याचा बेत क्रुश्चेवने आखला. देशान्तर्गत राजकारणापासून आंतरराष्ट्रीय नटेबखेडे कसे निर्माण होतात, याचे हे एक उदाहरण आहे. क्रुश्चेवला

मर्यादित अर्थाने खरे आहे. १९६३ च्या मार्च महिन्यात कॅस्ट्रो मॉस्कोला गेला. क्युबा-रशिया सहकार्याचे युग सुरू झाले. ते २० वर्षे चालू आहे त्यामधून जे निर्माण झाले त्याचेच मुख्यत्वे वर्णन या पुस्तकात आले आहे.

१९६२ च्या या अण्वस्त्रे प्रकरणानंतर अमेरिकेचा संबंध आला अशी महत्त्वाची ठरलेली घटना म्हणजे यापूर्वी दिलेली क्युबन नागरिकांच्या स्थलांतराची. १९७९-८० च्या कालखंडात १ लाख २० हजार क्युबन नागरिक पलीकडे मियामीला गेले, त्यानंतर मे दिनी मोर्चा निघाला, त्या दिवशी अमेरिकेच्या वकिलातीनेही आपला गाशा गुंडाळला. आज हवानात अमेरिकेची वकिलातही नाही, याचे मुख्य कारण वॉशिंग्टनने हवाना राजवटीला मान्यता दिलेली नाही. १९५९ मध्ये कॅस्ट्रो सत्तेवर आल्यानंतर रशियानेही त्यास दीड वर्षांनी मान्यता दिली, यावरून राजनैतिक वातावरण कसे होते याची कल्पना येते आता क्युबा हा रशियाचा मध्य अमेरिकेतील सर्वात विश्वासू मित्र आहे व लॅटिन अमेरिकेतील अनेक राष्ट्राच्या 'मुक्ति'-संग्रामाचे क्युबा हे केंद्र आहे.

तरी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे चे गव्हेरा नाही. आज तो हयात असता तर लॅटिन अमेरिकेतील राष्ट्रात काही वेगळेच घडले असते. ज्या तुकडीने हवानात प्रवेश केला व बातिस्टाच्या सैन्याचा पराभव केला, तिचे नेतृत्व चे गव्हेराकडे होते. फिडेलने चेला हवानाचा कमांडर नेमले. राष्ट्रीय बँकेचा अध्यक्ष केले, पुढे मंत्रिमंडळात उद्योगमंत्री केले, परंतु त्याचे लक्ष काही त्यात नव्हते. सत्ता संपादन करणे व प्रश्न सोडविणे यामधील तफावत चेला शेतीप्रश्नाबाबत फार जाणवली. म्हणून शेवटी १९६५ मध्ये या तरुण क्रांतिकारकाने आपले मंत्रिपद वगैरे सर्व सोडले. बायका-मुलांना मागे ठेवले व खांद्यावर बंदूक टाकून तो निघाला. फिडेलसाठी त्याने एक पत्र लिहून ठेवले. ज्याच्याबरोबर जंगलात व चिखलात स्वातंत्र्यासाठी तो राबला, तो सहजपणे निघून गेला व शेवटी १९६७ मध्ये बोलिव्हियात त्याला सरकारी सैन्याने ठार केले. "तुमच्या या चळवळ्या आणि बंडखोर मुलाचा प्रणाम", या शब्दात त्याने आपल्या आई-वडिलांनाही एक पत्र पाठवून निरोप घेतला होता.

क्युबातील मुक्कामात एक पाहिले की चे गव्हेराची चित्रे सर्वत्र होती.

शाळांपासून शेतकऱ्यांच्या संस्थापर्यंत चे होता. परंतु चेची पत्नी व मुले हवानात राहतात, ते काय करतात या प्रश्नाचे उत्तर नव्हते. चारचौघां-सारखे तेही काम करतात. त्यांना भेटण्याची इच्छा मी प्रदर्शित केली, परंतु यजमानाचा प्रतिसाद मिळाला नाही. एकदा असे वाटले की, एका म्यानात दोन तलवारी नको म्हणूनही चे गव्हेरा वेळीच क्युबातून गेला असावा कारण आज त्यालाही तेव्हढेच स्थान द्यावे लागले असते. दुसरी गोष्ट अशीही होती की, चे हा सत्ता भोगण्यासाठी जन्माला आलेलाच नव्हता त्याच्यासमोर जग होते. तो क्युबाहून निघाला तो प्रथम आफ्रिकेत गेला. कॉंगो व टान्झानियाच्या क्रांतिकारकांना त्याने मदत केली. आज क्युबा आफ्रिकेतील स्वातंत्र्योत्सुक राष्ट्रांना मदत करतो, सैन्य पाठवतो म्हणून चर्चा होते, तो वारसा चे गव्हेराचा आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर तिसऱ्या जगाचे संकलन, अलिप्ततावादी राष्ट्रांची परिषद, त्याचे राजकारण हे सर्व आपण समजून घेतले पाहिजे. जी अमेरिका कॅस्ट्रोला इतकी पाण्यात पाहते, त्या अमेरिकेत ऑक्टोबर १९७९ मध्ये कॅस्ट्रो गेले व १२ ऑक्टोबर रोजी युनोच्या ३४ व्या अधिवेशनात त्यांनी भाषण केले. ही भाषण करण्याची संधी त्याआधी तटस्थ राष्ट्रांची शिखर परिषद त्यांनी भरविली नसती तर मिळाली नसती. फेब्रुवारी १९७९ मध्ये ही सहावी शिखर परिषद हवानात भरली तेव्हा श्री. चरणसिंग यांचे औटघटकेचे मंत्रिमंडळ सत्तेवर होते व श्री. श्यामनंदन मिश्रा हे परराष्ट्रमंत्री होते. जिथे मंत्रिमंडळालाच स्थैर्य नव्हते तेथे श्री. चरणसिंग हवानाला कुठून जाणार ? त्यामुळे १९७९ च्या या सहाव्या शिखर परिषदेस भारताच्या वतीने श्री. श्यामनंदन मिश्रा गेले. त्यामुळे भारताचा मुळीच प्रभाव या परिषदेत पडला नाही. कॅस्ट्रोने बाजी मारली. हवानात ही परिषद होऊ नये म्हणून अमेरिकेने कसे जग जंग पछाडले त्याच्या हकीगती हवानात ऐकल्या. श्री. मोरारजी देसाई हे पंतप्रधानपदी असतानापासून हवाना परिषदेची तयारी चालू होती व त्या वेळी अमेरिकेत श्री. देसाईंच्या मदतीनेही काही दबाव तटस्थ राष्ट्रांवर आणला असे वर्णन हवानातील परिषदेच्या वेळी प्रसिद्ध झालेल्या एका ग्रंथात वाचावयास मिळाले. फिडेल कॅस्ट्रोने जे युनोत भाषण केले ते अमेरिकेने दूरदर्शनवर दाखविले, ते जगभर गेले. अमेरिकन

लोकांनीही ते ऐकले.

चौदा दिवसांच्या वास्तव्यानंतर त्या क्युबन मित्राचा निरोप घेण्याचा दिवस उगवला. हवाना विमानतळावर मिस्टर फर्नांदो निरोप देण्यास आले होते. आपल्या वकिलातीचे मुख्य सेक्रेटरीही डुलतडुलत आले. क्युबन एअरवेजच्या विमानाने मी आधी किंग्जस्टनला – वेस्ट इंडिजमध्ये जाणार होतो व तेथून न्यूयार्क श्री. फर्नांदो यांचा निरोप घेताना म्हटले, "क्युबात पुष्कळ पाहिले, पण तुमचे राष्ट्राध्यक्ष फिडेल दूरदर्शनवरही दिसले नाहीत त्यांचे भाऊही कुठे दिसले नाहीत."

त्यावर त्याने दिलेले उत्तरही चांगले आहे. "तुमच्या लोकशाहीत नेत्यांना आपण सतत लोकांना दिसले पाहिजे असे वाटत असते. कारण लोक आपल्याला विसरतील अशी त्यांना भीती वाटते. आमच्या नेत्यांना तसे वाटत नाही."

विमान तसे वेळेवर उडाले. क्युबा या एका नव्या देशाचे दर्शन घडले होते. आकाशात ढग व मनात विचार दाटून आले होते. उद्या आमचे सर्व भारतीय पुढारी खरोखरच प्रत्यक्ष कामाला लागले व लोकांना दिसेनासे झाले तर लोक त्यांचे चेहरे विसरतील, परंतु त्यांनी केलेले काम विसरणार नाहीत वेगवान वादळ पाठीवर घेऊन क्युबन एअरवेजचे छोटे विमान किंग्ज-स्टनाला अखेर कसेतरी उतरले. निळ्या डोंगराचे किंग्जस्टन व भारतीय क्रिकेट संघाचा कसोटी सामना पाहून मी दुसऱ्या दिवशी न्यूयॉर्क गाठले. तीन-चार दिवसांनी वॉशिंग्टनला गेलो. अमेरिकेच्या परराष्ट्रखात्यात गेलो. माझ्याकडे येऊन गेलेल्यांना भेटलो. मी क्युबाहून आल्यामुळे तेही चर्चा करण्यास उत्सुक होते.

एका वरिष्ठ अधिकाऱ्यास म्हटले, "क्युबाला राजनैतिक मान्यता देऊन हा प्रश्न तुम्ही सपवत का नाही?"

"इतका सोपा असा हा विषय नाही. अमेरिकेतही या मताचे पुष्कळ लोक आहेत. परंतु क्युबाचे रशियावर अवलंबून राहणे कमी झाल्याशिवाय अमेरिका क्युबाकडे मित्र म्हणून पाहू शकणार नाही." त्याने शांतपणे उत्तर दिले.

"तुम्ही क्युबाची साखर रशिया घेतो त्या दराने घ्या. मग त्यात फरक

आपोआपच पडेल. क्युबाला आज ती दूरवर पाठवावी लागते. अमेरिका जवळ आहे. वाहतूकखर्चही वाचेल." मी म्हटले.

"आम्हीहून ते करणार नाही." उत्तर मिळाले

"तुम्ही एकेकाळी चीनला युनोत प्रवेश देण्यास विरोध करीत होतात, आज तुम्ही व चीन मित्र झाला आहात'" मी म्हटले.

"कदाचित तो काळ येईलही. परंतु कम्युनिस्ट राष्ट्राशी अमेरिकेची मैत्री कायम स्वरूपाची असू शकत नाही." दुसरा एक अधिकारी म्हणाला.

"पण प्रश्न सहजीवनाचा आहे, मैत्रीशिवाय जगा व जगू द्या ही तत्त्वे अमलात आणता येतील," मी त्यांना म्हटले. सध्या ते क्युबापासून वैचारिक दृष्ट्या अंतरावर आहेत. त्यात क्युबा व अमेरिका असा दोन राष्ट्रापुरता हा प्रश्न नाही. अमेरिकेतील ९८ टक्के नागरिकांना परराष्ट्र राजकारणात काडीचा रस नसतो. तेथे अनेक देशाच्या लॉबीज् आहेत इस्रायलची लॉबी मोठी व समर्थ. क्युबातून जे लोक मियामी—फ्लोरिडात गेले त्याची एक लॉबी निर्माण झाली असून ते कॅस्ट्रो व वॉशिंग्टन याची राजनैतिक मैत्रीही होऊन देणार नाहीत क्युबा, अमेरिका खंडाच्या मध्यभागी कॅरिबियन समुद्रात आहे. उत्तरेला जवळ अमेरिका तर पश्चिमेला मेक्सिको आहे. मेक्सिको आज पूर्णपणे अमेरिकेच्या प्रभावाखाली आहे, परंतु दीर्घकाळ तीच स्थिती राहणार नाही इतके मेक्सिको कर्जात बुडाले आहे. मेक्सिकोच्या दक्षिणेला व दक्षिण अमेरिकेचा प्रदेश सुरू होण्यापूर्वी जी चिंचोळी पट्टी येते त्यात ग्वाटेमाला, साल्व्हादार, होन्डुरास, नायकरगुआ, कॉस्टारिका व पनामा हे छोटे देश येतात व ते आज मध्य अमेरिकेतील देश म्हणून ओळखले जातात. क्युबा आज या सर्व छोट्या राष्ट्रांतील बंडखोराशी संधान बांधून आहे व त्याचाच अमेरिकेला राग आहे. एल्. सॉल्व्हदरमध्ये तर रस्त्यात चकमकी चालू आहेत व याच राष्ट्राला मी अमेरिकेत असतानाच पोपनी भेट दिली. त्याची मोठी वर्णने अमेरिकन वृत्तपत्रात येत होती. पोप हा कम्युनिस्ट विरोधी म्हणून मानला जातो. परंतु त्याच्या भाषणात बंडखोराबद्दल सहानुभूती होती. शेवटी तो पोलिश पोप रशियाचे जोखड उतरू पाहणाऱ्या वालेसाचा मित्र हे नाते कुठेतरी आहेच. नायकरगुआच्या १९७९ मध्ये संपलेल्या लढ्यात धर्मगुरूंनी उघड

भाग घेतला होता. परंतु या सर्व देशात ज्या सत्ता उद्या अधिकारावर येतील त्या अमेरिकेशी मैत्री करणार नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

ही मध्य अमेरिकाच नव्हे तर दक्षिण अमेरिका, तथाकथित लॅटिन अमेरिकाही उत्तर अमेरिकेच्या विरुद्ध जाणार आहे. व्हेनिनझुला हे दक्षिण अमेरिकेतील पहिले राष्ट्र. त्यांच्याकडे भरपूर तेल आहे. लॅटिन अमेरिकेतील तो सर्वांत श्रीमंत देश मानला जातो. येथे अमेरिकेचे पोलाद कारखाने होते व्हेनिनझुला सरकारने त्याचे राष्ट्रीयीकरण केले. मेक्सिको व व्हेनिनझुला येथील तेल स्वस्तात अमेरिका घेते अशी लोकांची भावना आहे व हे सर्व देश अमेरिकेकडे साम्राज्यवादी देश म्हणूनच पाहतात. या सर्वांचे नेतृत्व फिडेल कॅस्ट्रो करील अशी भीती वॉशिंग्टनच्या मनात सतत आहे. लॅटिन अमेरिकन देशात जी हिंसा चालू आहे त्यामागे क्युबा आहे असा अहवाल अमेरिकन सिनेटच्या उपसमितीने १९८१ मध्येच दिलेला आहे. रशिया क्युबाला रोज ८० लाख डॉलर्स देते व यापैकी बरेचसे पैसे हे या लॅटिन अमेरिकन देशांतील चळवळींना मदत करण्यासाठी क्युबामार्फत खर्च होतात असे अमेरिकेचे म्हणणे आहे. नायकरगुआ, एल् साल्व्हादोर, कॉस्टारिका व कोलंबिया इतक्या देशात क्युबन सैन्य गनिमांना मदत करीत आहे, असे या सिनेट अहवालात म्हटले आहे.

वेस्ट इंडिजची बेटे पूर्वी ब्रिटिशाकडे होती. आता ती स्वतंत्र आहेत. तेथे १९८० मध्ये निवडणुका झाल्या. क्युबाशी मैत्री राखू इच्छिणारा डावा पक्ष तेथे सत्तेवर होता. या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला व अमेरिकेचा मित्र सत्तेवर आला. आपल्या बाजूचा पक्ष निवडून यावा म्हणून किंग्जस्टनच्या क्युबन वकिलातीत शस्त्राचा साठा करण्यात आला होता असा आरोप अमेरिकेने केला. मी किंग्जस्टनमध्ये हॉटेलच्या बारमध्ये गप्पा मारताना त्या बारटेंडरकडून ऐकले. शेवटी अमेरिकेला एकटे पाडण्याची खटपट रशिया क्युबामार्फत करतो आहे. आयसेन हॉवर व केनेडी या दोन अमेरिकन अध्यक्षांनी तर कॅस्ट्रोला संपविण्याचा प्रयत्न केला जॉन्सन व निक्सन यांनी क्युबाची आर्थिक नाकेबंदी करून कॅस्ट्रोला जेरीस आणण्याचा प्रयत्न केला. या सर्वांना पुरून कॅस्ट्रो तेथे आहे. आज परिस्थिती अशी आहे की, दक्षिण आफ्रिकेविरुद्ध लढण्यासाठी ३६ हजार सैन्य क्युबाने

वॉशिंग्टनच्या रागाची पर्वा न करता अंगोलात पाठविले. अमेरिका काही करू शकली नाही 'कॅरिबियनचा टिटो' असे कॅस्ट्रोचे वर्णन एका अमेरिकन प्राध्यापकानेच केले आहे. त्यामुळे हा टिटो जिवंत असेपर्यंत अमेरिका काही करू शकणार नाही. अमेरिकेला क्युबा काट्यासारखा सलतो. परंतु हे सर्व शेवटी का घडते ? दक्षिण आफ्रिकेला मदत करताना अमेरिकेला काही वाटत नाही. मग क्युबन सैन्य अंगोलातील स्वातंत्र्यवीरांच्या मदतीला गेले तर राग का येतो ? दुसऱ्याने काही करता कामा नये, आम्ही हवे ते करू हे अमेरिकेचे धोरण जग स्वीकारावयास तयार नाही. त्याविरुद्ध लढणाऱ्यांना मदत करण्यास रशिया तयार आहे. मग शक्तिमान गटाचे राजकारण सुरू होते व हिंसा वाढते. कारण दोघेही जण शस्त्रे पुरवीत असतात. किंबहुना खपवत असतात. या पार्श्वभूमीवर अलिप्त राष्ट्र परिषदेला अर्थ आहे. आज ती दुबळी आहेत व खऱ्या अर्थाने अलिप्त नाहीत हा त्याचा दोष आहे. परंतु तो दोष घालविणे हा त्यावरचा उपाय आहे. दोन्ही बड्या राष्ट्रांच्या शस्त्रांचे खरेदीदार होण्यापेक्षा शांततेचे सहजीवन आम्ही जगू इच्छितो हा विचार दृढ करावयास हवा. या दृष्टीने कॅस्ट्रोच्या क्युबाने अमेरिकेला तिच्या खंडात मोठा शह दिला, ती ताकद व कर्तृत्व सामान्य नाही. अमेरिकेतील १९८८ च्या राष्ट्राध्यक्ष निवडणुकीत टेड केनेडी उतरेल व डेमोक्रॅटिक पक्षाकडे सत्ता येईल अशी शक्यता आहे. तसे घडले तरच त्या खंडाचे व पर्यायाने जगाचे राजकारण बदलेल. तोपर्यंत हे तणाव चालू राहतील. मध्य व दक्षिण अमेरिकेतील राष्ट्रे वॉशिंग्टनविरोधी बनतील. युनोत अमेरिका एकटी पडेल व आमच्या खर्चाने आमची निंदा नको म्हणून युनोतून बाहेरही पडेल. तोपर्यंत कम्युनिस्ट राष्ट्रात व्यक्तिस्वातंत्र्याची बूज राखण्याची ईर्षा वाढत गेली तर नवे चित्र निर्माण होऊ शकेल. परंतु आंद्रापोव्ह याच्या कारकीर्दीत तसे काही घडण्याची शक्यता दिसत नाही. उलट भारतात आज असलेले व्यक्ती व वृत्तपत्र स्वातंत्र्य कमी होत गेले तर ही खुली चर्चाही होणार नाही. जगात जे घडते आहे ते आपल्या देशातही घडेल याची जाण ठेवून या सर्व राजकीय स्थित्यंतराचा विचार करावयास हवा. व्यक्तिस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य हवे असे म्हणणाऱ्या सर्वांनाच गरिबांचे हित व्हावे असे वाटत नाही, असे मानणे चुकीचे आहे.

भाकरी की स्वातंत्र्य हे सवाल फजूल आहेत. भाकरी आधी हवीच, परंतु भाकरी मिळाल्यावर स्वातंत्र्य नसेल तर ती भाकरी खाणारे 'पाळीव प्राणी' होतात. श्रीमती मालतीबाई बेडेकरांनी मुंबईतील साहित्य संमेलनात वापरलेले हे शब्द. आणि त्या पुढे म्हणाल्या की आपण पाळीव प्राणी कधी होऊन जातो ते कळतही नाही.

## ११

०००००००००००००००००००००००००००००००००००००

# तटस्थ राष्ट्रांची दिल्ली परिषद

ह्या सर्व विचार घोळवत मी नवी दिल्लीस उतरलो तो सातव्या तटस्थ राष्ट्राच्या शिखर परिषदेच्या मंडपात जाण्यासाठी. इराक-इराण युद्धामुळे बगदाद येथे ठरलेली ही सातवी शिखर परिषद तेथे होऊ शकली नाही. श्रीमती गांधींकडे दोन गोष्टी आहेत. एक राजकारणात लागणारे नशिब व दुसरी कार्यक्षमता. त्यांनी तावडतोब ही परिषद दिल्लीस आणली. आणि थोड्या अवधीत ती उभी केली. फिडेल कॅस्ट्रो नवी दिल्लीत आले व दि. २ मार्च १९८३ रोजी या तटस्थ राष्ट्र शिखर परिषदेची अधिकारसूत्रे नव्या अध्यक्षा श्रीमती गांधींना दिली. त्यानंतर एक आलिंगन दिले. श्रीमती गांधी त्या भव्य शरीराच्या दाढीदीक्षिताकडे पाहून क्षणभर लाजल्या. परतु क्रांतिकारक कॅस्ट्रो असा माघार घेणारा नव्हता त्याने आलिंगन दिलेच व हा सन्मानाचा – नेतेपदाचा मान त्यांना दिला.

या अलिप्त राष्ट्र परिषदेमुळेच क्युबाची यात्रा आम्हाला घडली होती. क्युबात फिरताना प्रत्येकजण या परिषदेसाठी आम्हाला शुभेच्छा देत होता. त्या शुभेच्छा खऱ्या झाल्या हे मान्य करावयास हवे, कारण त्यांनी त्या मनापासून दिलेल्या होत्या. हवानाच्या तटस्थ राष्ट्र परिषदेस उपस्थित राहिलेले पत्रकार दिल्लीत भेटले. दोन्हींच्या तुलनेचा विषय काढताच ते म्हणाले, " दोन्हींची तुलनाच होऊ शकत नाही." हवाना परिषदेपेक्षा दिल्ली परिषदेचे स्वरूप, उपस्थिती, आयोजन व प्रभाव सर्वच अतिशय

मोठे आहे याबद्दल एकमत दिसले. जगातील असमर्थ राष्ट्राची दिल्लीतील ही समर्थ परिषद यशस्वी रीत्या पार पडली. अशा परिषदांमध्ये वरकरणी बोलणे व डोलणे असतेच, त्याचबरोबर परखड विचारही प्रकट होतातच मलेशियाचे पतप्रधान डॉ. महातीर महमद दि. ८ मार्च रोजी केलेल्या रोखठोक भाषणात सरळ म्हणाले, " उत्तर-दक्षिण सुसवाद साधेल अशा खोट्या भ्रमात विकसनशील राष्ट्रानी राहू नये. दगडापासून रक्त काढता येत नाही जागतिक अर्थकारणाचे आपण स्वामी आहोत ही भूमिकाही उत्तरेतील राष्ट्रे कधीच सोडणार नाहीत. जोपर्यंत गरीब राष्ट्रांचे अर्थकारण त्याना प्रत्युत्तर करण्याच्या स्थितीस पोहोचत नाही, तोपर्यंत सवलतीचा एक अशाही आपल्या पदरात पडणार नाही."

दुर्बल राष्ट्राच्या या बलवान परिषदेने आपली ताकदही अशी प्रकट केली, त्याचबरोबर या १०० अलिप्त राष्ट्रातही जे मतभेद आहेत, त्यामुळे त्याच्या सामर्थ्याला पडलेल्या मर्यादाही सहजपणे स्पष्ट झाल्या. क्युबाचे लघुपण व भारतासारख्या खंडप्राय देशाचे दुबळेपण तेथे हातात हात घालून वावरले व सर्व वादग्रस्त विषयावर या १०७ सदस्यानी मते दिल्याने ते खरोखरच अलिप्त किती, आणि कोण कुणाच्या छायेत किती हेही कळले. अफगाणिस्तान व काम्पुचिया हे दोन वादाचे प्रमुख विषय श्रीमती गांधींनी आपल्या पहिल्या भाषणात अफगाणिस्तानबद्दल फक्त अर्धे वाक्य उच्चारले. त्यापेक्षा क्युबाचे बलदंड नेते फिडेल कॅस्ट्रो याचे वाक्य अधिक अर्थपूर्ण होते " आमच्यात ज्यामुळे क्षोभ निर्माण झाला आहे अशी अफगाणिस्तानची समस्या ", असा उल्लेख त्यानी केला. व्हिएतनामचे पंतप्रधान व्हॅन् डॅंग यानी अफगाणिस्तानातील रशियन सेनेचे व काम्पुचियातील व्हिएतनाम सेनेचे सरळ समर्थन केले. पाकिस्तानने दोन्हीला विरोध केला. क्युबा हे तर रशिया-अंकित राष्ट्र असताना ते तटस्थ कसे या प्रश्नाचे उत्तर म्हणून काहीजण पाकिस्तानकडे बोट दाखवीत होते. ते अमेरिका-अंकित राष्ट्र जर तटस्थ असू शकते तर क्युबाही तटस्थच आहे.

इराण-इराक युद्ध व पॅलेस्टाइनचा प्रश्न हे या सातव्या अलिप्त राष्ट्र शिखर परिषदेतील तप्त विषय. ही सर्व परिषद लष्करी बंदोबस्तात झाली

व आमच्यावर लष्करी अधिकाऱ्यांच्या नजरा सतत रोखलेल्या होत्या याचे कारण म्हणजे हे वडे नेते. क्युबाचे फिडेल कॅस्ट्रो, पॅलेस्टाइन गनिमाचे नेते अराफत, लेबनॉनचे अध्यक्ष अमिन गेमाचल, तसेच इराण व इराकचे प्रतिनिधी यांच्यावर खुनी हल्ले होण्याची भीती सतत होती व त्यांच्या सुरक्षिततेसाठीच या परिषदेत सर्व बंदोबस्त होता. क्युबात प्रत्यक्ष जाऊन व दिल्लीतील परिषदेस हजर राहूनही त्या फिडेल कॅस्ट्रोचे नखही प्रत्यक्षात पाहावयास मिळाले नाही. दिल्लीतील परिषदेच्या पहिल्या दिवशी फक्त कॅस्ट्रो विज्ञानभवनात आले, दोन तास भाषण केले, परतु त्या दिवशी पत्रकाराना त्या सभागृहात प्रवेश दिलाच नाही. दुसऱ्या दिवशी, पूर्ण झडती व तपासणीनतर आत सोडले तर त्या विज्ञानभवनात कॅस्ट्रो आलेच नाहीत. हवानात कॅस्ट्रो कुठे राहतात या प्रश्नाला जसे उत्तर नाही, दिल्ली-तही तीच स्थिती फिडेल कॅस्ट्रो दिल्लीत कुठे राहात होते हे या परिषदेतील सर्वात मोठे गुपित. त्यांच्या राजदूताच्या घरी ते राहिले असे काहींचे म्हणणे. परतु एकूण खोट्या बातम्या पसरविण्याची कात्रज घाट पद्धतीच यात अधिक होती. जी व्यक्ती आपल्या देशात मोकळेपणाने वावरत नाही, ती दिल्लीतील अशोक हॉटेलमध्ये राहील हे सभवत नव्हते. कॅस्ट्रो तेथे राहण्यास येणार नाहीत असा टेलिफोन रात्री त्यांच्या वतीने कुणीतरी अशोक हॉटेलमध्ये केला ही अशीच सोडून दिलेली बातमी. परदेशी पाहुण्यांच्या स्वागतासाठी राष्ट्रपती, उपराष्ट्रपती व पंतप्रधान श्रीमती गांधी हे पालम विमानतळावरच मुक्कामाला होते. परंतु तरीही कॅस्ट्रो कधी येणार याबद्दल तीन वेळापत्रके झळकली. हे सर्व योजनापूर्वक चालले होते दोन विमाने आली, परतु त्यापैकी कोणत्या विमानात कॅस्ट्रो आहेत हे फक्त त्यानाच माहीत असावे. क्युबातून भारतात या परिषदेस येण्यासाठी एकूण पाचशे जणानी व्हिसा घेतले होते. परतु या पाचशेतून प्रत्यक्षात कोण जाणार हे फक्त दोन जणाना माहीत होते. एक कॅस्ट्रो व दुसरे त्यांचे बधू. अमेरिकेची सी. आय्. ए. आपला खून करण्याची एकही सधी दवडणार नाही अशी ठाम समजूत त्यांची आहे. या परिषदेस जाण्यासाठी ते कधी निघणार हे सांगण्यासही हवानात कुणी तयार नव्हते. ते मॉस्को-मार्गे जातील हा एक अदाज भारतातील मुक्कामात त्यांचा बळी घेण्याचा

प्रयत्न केला जाणार असे गृहीत धरूनच त्याच्या भोवती संरक्षणाचे जाळे होते.

विजय चौकात समूह बँडवादनाचा जो कार्यक्रम झाला तेथेही कॅस्ट्रो व अराफत आले नाहीत इराण-इराकचे प्रतिनिधी तर पडद्याआडच होते. कॅस्ट्रोंना मारण्याचा बेत अमेरिकेचा होता या आरोपाचा वॉशिंग्टनने इन्कार केला इराणचे 'कमांडोज' आल्याच्या बातमीचा इराणने इन्कार केला. इस्रायलचे हस्तक अराफतना केव्हाही मारण्याचा प्रयत्न करतील असे गृहीत धरले गेले होते. त्यामुळे विज्ञानभवनात जेथे प्रत्यक्ष परिषद चालली होती तेथे पत्रकारांना तसा कायम मज्जाव होता. निवडक छायाचित्रकारांना पहिल्या दिवशी आत सोडले, परंतु त्यांना सोडण्यापूर्वी परदेशातून खास आणलेल्या यंत्रणेतून कॅमेऱ्याची तपासणी करण्यात आली विमानतळावर होते त्याप्रमाणे प्रत्येकाची सुरक्षा तपासणी होतीच. बुधवारी सकाळी पत्रकारांना पंधराच्या गटाने विज्ञानभवनात प्रवेश मिळाला. त्या वेळी मीही आत गेलो. जाताना सर्व तपासणी झालीच. पुन्हा पुढे—मागे मार्गदर्शक होता विज्ञानभवनाच्या पहिल्या मजल्यावरच्या पहिल्याच खोलीवर पाटी होती. ती संरक्षण मंत्रालयाच्या राज्यमंत्र्याची ते तेथेच मुक्कामाला होते. सर्व परिषदच भारतीय लष्कराच्या ताब्यात होती विज्ञानभवनाच्या पुढील व मागील कोपऱ्यावर चक्क बंकर्स उभारलेले होते व मशीनगन्स कायम लावून भारतीय सैनिक उभे होते. इराणी कमांडोज चालून आले, इस्रायली कमांडोज चालून आले तर समोरासमोर त्यांच्याशी सामना करण्याची तयारी होती. "जगात शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी निर्माण झालेली इतिहासातील सर्वांत मोठी चळवळ," असे वर्णन ज्या परिषदेचे श्रीमती गांधींनी आपल्या भाषणात केले, ती चळवळ मशीनगन्सच्या पहाऱ्यात चालली शांततेसाठी शस्त्रे असे अमेरिका—रशिया सर्वत्र म्हणतात व शस्त्रे निर्माण करीत राहतात. ती वाढत जातात व मग ती आवरण्यासाठी चळवळ होते, असा हा एकापरीने वेड्याचा बाजार आहे. बडी राष्ट्रे तो शहाणपणाने करतात व छोट्या राष्ट्रांना वेडे बनवितात. कॅस्ट्रोंनी एकूण ११० मिनिटे धडाडधूम भाषण केले व त्यात अमेरिकेचे वर्णन 'अन्स्क्रुपलस् कॅक्टर्स' असे केले. आपल्याला मारल्याने चळवळ मरणार नाही, कारण

ती व्यक्तींवर अवलंबून नसते, विचारावर अवलंबून असते व विचार कधीच मरत नाहीत, असे ते अमेरिकेला उद्देशून म्हणाले.

या निमित्ताने परिषदेस आलेले राष्ट्राध्यक्ष, राजे, अमीर, लष्करी हुकुमशहा, पंतप्रधान, प्रतिनिधी, सरकारी अधिकारी व पत्रकार या १०० राष्ट्रांच्या इतिहासाशी, भूगोलाशी, सद्य राजकीय परिस्थितीशी परिचित झाले ही कमाई काही थोडी नाही आफ्रिकेतून आलेल्या राष्ट्रप्रमुखांत झांबियाचे केनथ कौंडा व टान्झानियाचे न्येरेरे यांना सर्वांत अधिक मान होता कौंडानी तटस्थतेतही अभिप्रेत असलेले बड्या राष्ट्रांच्या मैत्रीचे स्वातंत्र्य फार चांगल्या तऱ्हेने मांडले. मोझांबिक पोर्तुगालच्या जोखडातून मुक्त झाले. परंतु दक्षिण आफ्रिकेच्या लष्करी हस्तक्षेपातून त्यास अजून मुक्त व्हावयाचे आहे. नामिबियाच्या स्वातंत्र्यलढ्यास या परिषदेने पूर्ण पाठिंबा दिला. हे नामिबिया कुठे आहे? दक्षिण आफ्रिकेच्या एकापरीने ते पोटात आहे व दक्षिण आफ्रिकेसारख्या वर्णविद्वेषी देशाच्या तावडीतून सुटका करण्याचा प्रयत्न ते करते आहे शेवटी नेहरू, नासर, टिटो यांनी स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या देशांसाठी, वसाहतवादातून मुक्त होण्यासाठी धडपडणाऱ्या राष्ट्रांसाठी ही तिसऱ्या जगाची शक्ती, अलिप्त राष्ट्रांचे व्यासपीठ उभे केले त्याचे विकसित स्वरूप दिल्लीत पाहावयास मिळाले. "ही अलिप्त राष्ट्रे युनोतही भरीव कामगिरी करू शकतील, आपल्या विचाराचा प्रभाव पाडू शकतील" असे युनो सरचिटणीस म्हणाले.

परंतु विचाराचा प्रभाव व पैशाचा प्रभाव यांच्यात खरा संघर्ष असल्याने व पैशाचा पराभव करणे कठीण जात असल्याने ही अलिप्त राष्ट्रे मनाने पराभूत आहेत. या राष्ट्रांसाठी नवी व वेगळी बँक उघडावी अशी सूचना हवानात आली. नवी आर्थिक रचना—न्यू एकॉनॉमिक ऑर्डर—तिच्या विचारासाठी खास परिषद हा विचार हवानात सुरू झाला, तो या परिषदेत दृढ झाला व तो पुढे नेण्यात या परिषदेचे नेते यशस्वी झाले तर भरीव असे काही निर्माण होऊ शकेल. या १०० राष्ट्रांचा परस्पर व्यापार वाढला पाहिजे, परंतु त्यासाठी मैत्री हवी. ती शंभर राष्ट्रे दिल्लीत एकत्र आली ती एकमेकांची मित्र नव्हती हे या परिषदेचे सर्वांत मोठे वैगुण्य! भारत-पाकिस्तान मैत्रीसारखी सर्वांची मैत्री अधांतरी. विजय चौकातील कार्यक्रम साडेपाच वाजता

होता तर पाकिस्तानचे झिया येथे ४.४५ वाजताच आले. पाच वाजता श्रीमती गांधी आल्या. त्या सरळ आपल्या खुर्चीकडे चालल्या होत्या. इतक्यात त्यांचे उजवीकडे लक्ष गेले म्हणून बरे. कारण तेथे झिया बसले होते. चाल-ण्याचा वेग थांबवून श्रीमती गांधी वळल्या झियांना भेटल्या, बोलल्या आणि दोन मिनिटांतच आपल्या खुर्चीत जाऊन बसल्या. दोन शेजारी राष्ट्रांचे प्रमुख नेते पाच मिनिटे काही बोलत उभे राहिले नाहीत दोघेही नंतर १५ मिनिटे आपल्या खुर्चीत परंतु अंतरावर बसून होते मैत्री नसले की असे होते दुसऱ्या दिवशी त्यांची अधिकृत भेट झाली आफ्रिकेतील राष्ट्रांचे पुरुष प्रतिनिधी मात्र एकमेकांची चुंबनेही घेत होते युरोपातील राष्ट्रांनी हा संस्कार त्यांना जाताना दिला असावा

खरी मैत्री—खोटी मैत्री, वरकरणी मैत्री आणि उघड शत्रुत्व यांचे देशा-देशांतील चित्र या परिषदेत पाहावयास मिळाले. लिबियाच्या प्रमुखाची वार्ताहर परिषद झाली. आज इजिप्तचे सादत असते तर त्यांना किती मान या परिषदेत मिळाला असता? त्याऐवजी इजिप्तच्या पत्रकाराचा उघड अपमान लिबियाचा हा प्रमुख करीत असताना पत्रकारांनी पाहिला. प्रश्न विचारताना प्रत्येकास आपले नाव व वृत्तपत्राचे नाव सांगावे लागे. इजिप्तच्या पत्रकाराने ती माहिती देताच लिबियाचे प्रमुख म्हणाले, “ तुमचे सरकारी पत्र आहे. तुमच्या प्रश्नाचे उत्तर मी देणार नाही? ” जणू काही लिबियात पूर्ण वृत्तपत्र स्वातंत्र्य होते. इजिप्त व लिबियात सध्या विस्तव जात नाही व दोघांचे प्रतिनिधी येथे वावरत होते.

पॅलेस्टाइन गनिमांच्या वतीने अराफत पत्रकारांसमोर आले नाहीत, कारण पुन्हा सुरक्षिततेचा प्रश्न या पत्रकार परिषदा ‘ मिडिया सेंटर’मध्ये चालत. तेथेच ठेवलेल्या अनेक टेलिव्हिजन सेटसवर पत्रकारांनी विज्ञानभवनातील घटना व भाषणे पाहावयाची या गनिमांच्या प्रवक्त्याला व लिबियाच्या प्रमु-खासही एक रोखठोक प्रश्न पत्रकारांनी विचारला. “ लेबनॉनमध्ये इस्रायली सैन्याने इतका धुमाकूळ माजविला तेव्हा एकही अरब राष्ट्र तुमच्या मदतीस आले नाही हे कसे,” असा प्रश्न पॅलेस्टाइनच्या प्रवक्त्यास विचारण्यात आला तसेच तुम्हीच पॅलेस्टाइन गनिमांची चळवळ शस्त्रे देऊन चालविता तर त्यांच्या मदतीस लेबनॉनमध्ये का गेला नाहीत, असा प्रश्न लिबियाच्या

प्रमुखास विचारण्यात आला. दोघांनाही या प्रश्नाचे उत्तर देता आले नाही. दोघांनीही मूळ प्रश्नाला बगल दिली. लेबनॉनच्या सीमेजवळ आम्ही नाही असे लिबियाचे प्रमुख म्हणाले. परंतु शेवटी लेबनॉनमध्ये पॅलेस्टाइन मुक्ति-सेनेचे सैनिक पराभव पत्करत होते. अराफतना तेथून पळून जाण्याची वेळ आली तेव्हा अरब एकात्मता त्यांच्या मदतीस आली नाही.

याउलट लेबनॉनचे तरुण राष्ट्रप्रमुख अमीन गेमायल भाषण करण्यास आले तेव्हा त्यांच्या मुखातून सुरुवातीस निघालेले वाक्य मार्मिक होते. " आमच्या भूमीवर दुसऱ्याच्याच लढाया चालू आहेत ! " " कुणाच्याच खांद्यावर कुणाचेच ओझे. " पॅलेस्टाइनचे ओझे जखमा सांभाळत मध्यपूर्वेत वावरते आहे इराण-इराक युद्ध पेटत राहावे असे इस्रायलला वाटते, आणि आपण युद्ध करू नये असे त्या दोघांना मात्र वाटत नाही इराण-इराक युद्ध थांबले आहे, पॅलेस्टाइनला आपली भूमी थोडी का होईना मिळाली आहे. मोझांबिकमधून दक्षिण आफ्रिकेचे सैन्य मागे गेले आहे, नामिबियाला दक्षिण आफ्रिकेने स्वातंत्र्य बहाल केले आहे, नेल्सन मंडेलांची सुटका प्रिटोरियाच्या सरकारने केली आहे, काश्मीरची फाळणी मान्य करून आंतरराष्ट्रीय सीमा रेषा स्वीकारली गेली आहे. अफगाणिस्तानातून रशियाचे व काम्पुचियातून व्हिएतनामची सेना परतली आहे, दियागो गार्सिया हे बेट अमेरिकेने सोडले आहे व मॉरिशसला ते परत मिळाले आहे अशा अद्‌भुत आदर्शाकडे निघालेली अलिप्त राष्ट्रांची सातवी ऐतिहासिक परिषद शेवटी संपली सर्व नेते सुरक्षित परतले हीच या परिषदेची मोठी कमाई. सर्वांना आपल्या जखमा उघड्या करून सांगता आल्या ही दुसरी कमाई. शुचिर्भूत शब्दांची शुभ्रांके शस्त्रांच्या व अस्त्रांच्या तबकावर टाकून आपले अर्थ-कारण कसे सुधारता येईल यास प्राधान्य देण्याचा विचार या परिषदेने केला ही तिची तिसरी कमाई. ' साऊंड एकॉनॉमिक सेन्स हे श्रीमती गांधींच्या भाषणातील शब्द भारतासह सर्व राष्ट्रांना मार्गदर्शन ठरोत आर्थिक कारणासाठी फक्त बडी राष्ट्रे हस्तक्षेप करीत नाहीत तर आपल्या मतभेदामुळे त्यांना ती संधी मिळते हा विचार येत्या चार वर्षांत रुजत्या तर आठव्या परिषदेच्या वेळी शांततेच्या कबुतराला पंख फुटू शकतील. आमने सामने येण्याने वैराची धार कमी होते, मैत्रीची पालवी प्रफुल्लित होते तसेही पुष्कळ

घडेल फिडेल कॅस्ट्रो याच्या तावडीतून ही अलिप्त राष्ट्राची परिषद बाहेर यावी असे वाटणाऱ्यांचे पूर्ण समाधान भारताने या सातव्या परिषदेत केले. एकून २२ व्हाइस चेअरमन असलेल्या सदस्याची जी कार्यवाही समिती पुढील तीन वर्षांसाठी नेमली गेली त्यात क्युबा नाही. पाकिस्तानही नाही आशिया व आफ्रिकेतील आठ देश आहेत तर लॅटिन अमेरिकेतील चार व युरोपातील दोन देश असून भारताचे श्री नटवरसिंग हे सेक्रेटरी जनरल झाले आहेत. या शभर राष्ट्रातील रशियाचे मित्र किती व अमेरिकेचे किती असा प्रश्न एका ज्येष्ठ पत्रकारास दिल्लीत विचारला तेव्हा त्याने दिलेले उत्तर असे रशिया ३० टक्के, अमेरिका ५० टक्के, २० टक्के खरे तटस्थ !

एक पत्रकार म्हणाला, " या जगात तटस्थ राष्ट्रे खरी तीनच आहेत. अमेरिका, रशिया व चीन." अमेरिका-पाकिस्तान मित्र असल्यामुळे चीन-पाकिस्तान मित्र बनतात रशिया-क्युबा मैत्रीमुळे क्युबा-भारत मैत्री होते. परतु नेहरूंची दूरदृष्टी व कणखरपणा याचा आजही वेध घेतला तरी जगाचे राजकारण यापुढे पोथीनिष्ठतेवर चालणार नाही या निष्कर्षावर आपल्याला यावे लागेल. ते प्रत्येक राष्ट्राच्या हितसंबंधावर चालणार आहे. तटस्थ राष्ट्राचे हितसबध एकमेकात गुंतलेले आहेत मग ती राष्ट्रे कुणाच्याही छायेत असोत. भरपूर साधने असलेल्या या सर्व तिसऱ्या जगातील राष्ट्रांचा अभ्युदय आधुनिक तत्रज्ञानाची कास धरली तरच होणार आहे. लोकसख्येचा स्फोट या तिसऱ्या जगातच आहे. क्युबापुढे ती समस्या आज नाही. हवामानाचे प्रश्न आहेत. परतु फिडेल कॅस्ट्रोचे क्युबा त्याच्यानतरही तसेच राहील याची खात्री देणारा तेथे आज कुणी नाही. कारण त्या प्रचंड वटवृक्षाखाली कोणते झाड वाढणार ? परंतु अमेरिकेने जुलमी सत्ताना पाठिंबा देण्याचे धोरण सोडले नाही तर क्रान्तीच्या गर्भातून आणखी कॅस्ट्रो निर्माण होतील. मध्य व दक्षिण अमेरिका पूर्ण कम्युनिस्ट बनेल, आफ्रिका खडही लाल बनेल व त्याची गडद छाया आशियावर पडेल. उत्तरेने सावकारी वृत्ती सोडणे हा एकच उपाय त्यावर आहे. पण पश्चिम क्षितिजावर विवेकाचा सूर्य कसा उगवेल ?

# १२

# ग्रेनेडातील आक्रमण

कॅरिबियन समुद्रातील ग्रेनेडा हे १ लाख ११ हजार वस्तीचे छोटेसे बेट. परंतु आज जगभर ते गाजते आहे. राष्ट्रकुल परिषद नवी दिल्लीत भरल्यामुळे व त्यात ग्रेनेडा गाजल्यामुळे भारतीयांनाही ते जवळचे वाटू लागले. १३३ चौरस मैल इतकेच क्षेत्रफळ असलेले हे बेट राष्ट्रकुलाचे सदस्य म्हणून जवळचे, तटस्थ राष्ट्र संघटनेतील एक घटक म्हणूनही जवळचे वाटते. त्यात अमेरिकेसारखे जगातील बलाढ्य राष्ट्र इतक्या छोट्या बेटावर सरळ सैन्य उतरविते व ते ताब्यात घेते हे गौडबंगाल आहे तरी काय, असा प्रश्न सर्वसामान्याना पडला. त्यात क्युबाचे ग्रेनेडा हे मित्र राष्ट्र. फिडेल कॅस्ट्रो व ज्याची दि. २० ऑक्टोबर १९८३ रोजी हत्या झाली ते ग्रेनेडाचे पतप्रधान मॉरिश बिशप हे मित्र. या मित्राची हत्या करून जो सत्तेवर आला, त्याच्याही सरक्षणासाठी ग्रेनेडात असलेल्या क्युबन सैन्याने प्रयत्नाची शर्थ केली. जखमी झालेले क्युबन सैनिक रेड क्रॉसच्या मदतीने जेव्हा हवानात परतले तेव्हा त्याच्या स्वागतासाठी फिडेल कॅस्ट्रो स्वत. विमानतळावर हजर होते. त्याना उपचारासाठी रुग्णालयात नेले तेथेही ते गेले. बाहेर फार मोठा जमाव जमला होता व त्या सर्वांनी मिळून क्युबाचे राष्ट्रगीत म्हटले. भाडवलशाही अमेरिकेने समाजवादी ग्रेनेडा गिळंकृत केला याचे दु ख त्याना झाले. ते त्यानी जाहीरपणे व्यक्त केले. कारण त्याच्या अतर्यामी समान प्रश्न होता. आज ग्रेनेडात झाले ते उद्या क्युबातही होईल !

असे हे क्युबाशी विचाराने जोडलेले ग्रेनेडा आज जगात चर्चेचा विषय झाला आहे, याचे मुख्य कारण असे की बड्या राष्ट्राने कुठेही आक्रमण केले तरी चालते, त्याची दादफिर्याद युनोपासून राष्ट्रकुल परिषदेपर्यंत लागू शकत नाही मग लहान राष्ट्राच्या स्वातंत्र्याचे काय? कोणत्या तरी बड्या राष्ट्राच्या छत्राशिवाय लहान देशांना स्वतंत्रपणे जगता येणार नाही या निष्कर्षाला जायचे काय, असे मूलभूत प्रश्न अमेरिकेने ग्रेनेडात केलेल्या आक्रमणाने उपस्थित केले. युनोच्या आमसभेने अमेरिकेच्या या आक्रमणाचा निषेध केला, १०८ देशानी अमेरिकेविरुद्धच्या ठरावाला पाठिंबा दिला, राष्ट्रकुल परिषदेने सैन्य मागे घेण्याची विनती केली, परतु हा लेख लिहीपर्यंत प्रत्यक्षात तसे काही घडलेही नाही अमेरिकेने काही केले तरी चालते अशी ही बड्या भाडवलशाही राष्ट्राची दडेली आहे.

ग्रेनेडा हे बेट छोटेसे आहे तरी अमेरिकेने हे लष्करी आक्रमण का केले याचा ऊहापोह करण्यापूर्वी त्याचे भौगोलिक स्थान समजून घेतले पाहिजे. ग्रेनेडा बेटाची लाबी फक्त २१ मैल आहे तर रुंदी फक्त १२ मैल आहे. मियामी या अमेरिकन शहरापासून क्युबा ९० मैलावर आहे, परतु ग्रेनेडा अमेरिकेपासून निदान एक हजार मैल इतके दूर आहे. या पुस्तकात दिलेला नकाशा आपण पाहिलात तर असे दिसून येईल की, वेस्ट इडिज बेटांची जी साखळी आहे, त्यात ग्रेनेडा बेट हे जवळजवळ शेवटी आहे. बॉर्बीडॉसपासून १६० मैल व दक्षिण अमेरिकेतील व्हेनिनझुएलापासून ते फक्त ८० मैलावर आहे. मध्य अमेरिकेतील राजकारणच अमेरिकेला भारी झालेले असताना ग्रेनेडासारख्या लहानशा व खूपच दूरवर असलेल्या बेटाच्या राजकारणात रेगन महाशयानी अशी अतिरेकी कारवाई करावी ही शरमेची गोष्ट होती. परतु ती त्यांनी केली व त्याची खरी कारणे जर लोकानी समजून घेतली तर देशातर्गत घटना व जगाच्या दुसऱ्या कोपऱ्यात घडलेल्या घटना यामुळे कोणती आपत्ती तिसऱ्याच देशावर येऊ शकते याचे नमुनेदार उदाहरण म्हणजे ग्रेनेडातील आक्रमण आहे हे त्याना सहज पटेल.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक एक वर्षावर आली आहे. रेगन महाशय पुन्हा निवडणूक लढविणार आहेत. पोलादी पुरुष अशी आपली प्रतिमा त्याना लोकासमोर सतत उभी करावयाची आहे, कारण घमेंडखोर

अमेरिकन लोकांना ती आवडते. परंतु दि. २३ ऑक्टोबर रोजी लेबनॉन-मधील बैरुत या राजधानीच्या शहरात चार देशांच्या संयुक्त सैन्याचा भाग म्हणून असलेल्या अमेरिकन व फ्रेंच सैनिकाना प्रचंड स्फोट घडवून ठार मारण्यात आले. २२९ अमेरिकन सैनिक सहजपणे मारले गेले. ५६ फ्रेंच सैनिकानाही तेथे मरण आले. या एका घटनेने रेगन यांच्या पोलादी प्रतिमे-वरचे शिंतोडे उडाले. ते शिंतोडे पुसून काढण्यासाठी त्यानी ग्रेनेडावर दोनच दिवसानी, दि. २५ ऑक्टोबर रोजी आक्रमण करण्याचा निर्णय घेतला. सर्व आतरराष्ट्रीय कायदे त्यानी झुगारून दिले. ग्रेनेडा राष्ट्रकुलातील देश असतानाही ब्रिटनच्या पंतप्रधान मार्गारेट थॅचर याची समती त्यांनी घेतली नाही. युनोची सनद, बोगोटाचा करार सरळ पायदळी तुडवला. शेवटी अमेरिकेला कुणी नमवू शकणार नाही, हे जगाला दाखविण्यासाठी रेगन यानी हे कृत्य केले. ते समर्थनीय नव्हते व कधीच ते समर्थनीय ठरू शकणार नाही. दि. २६ आक्टोबर रोजी रेगन यानी स्वत. वार्ताहर परि-षदेत या लष्करी कारवाईची दोन कारणे सागितली. ग्रेनेडामध्ये असलेल्या एक हजार अमेरिकन नागरिकांना वाचविण्यासाठी हे सैन्य पाठवावे लागत आहे असे त्यानी सागितले. प्रत्यक्षात तेथील अमेरिकन नागरिक अगदी आनदात होते, आपल्या देशाचे सैन्य हे एकदम का घुसले याबद्दल त्यांनी आश्चर्य व्यक्त केले असे आता सिद्ध झाले आहे. या अमेरिकन नागरिकाना ग्रेनेडाच्या नव्या सरकारने ओलिस म्हणून ठेवले असते असा प्रचारही रेगन यानी केला व अमेरिकन जनतेला घाबरवून टाकले. इराण प्रकरणापासून आपले नागरिक ओलिस ठेवले जाऊ नयेत असे अमेरिकन जनतेला वाटते हे तसे खरे आहे. आता सेनेटपुढे त्यांनी मान्य केले आहे की, ओलिस ठेवण्याच्या शक्यतेबाबत कसलाही पुरावा आपल्याकडे नव्हता.

आणखी एक अजब कारण त्यांनी दिले. कॅरिबियन समुद्रातील सहा देशाच्या विनतीवरून आपण कारवाई करीत आहोत हे रेगन यानी दिलेले दुसरे महत्त्वाचे कारण. कॅरिबियन कम्युनिटी अशी एक संस्था या 'बेट्या'नी स्थापन केली आहे, ही वस्तुस्थिती असली तरी हे देश म्हणजे ग्रेनेडा नव्हे. उद्या भारताच्या शेजारी असलेल्या पाकिस्तान, चीन, बागला देश व श्रीलंका या देशांनी भारतात कारवाई करा असे अमेरिकनाना सांगितले तर ते

आपल्याला चालेल काय ? उद्या आपण सर्वांनी मिळून पाकिस्तानमध्ये रशियाने कारवाई करावी, सैन्य घुसवावे असे सांगितले तर ते जितके मूर्ख-पणाचे व अतार्किक तितकीच ही सहा छोट्या राष्ट्रांची विनंती होती. या सहा राष्ट्रांपैकी डोमिनिका या बेटसमूहात आकाराने ठिपका असलेल्या देशाच्या अध्यक्षा युजेनिया चार्लस् या वॉशिंग्टनमध्येच होत्या. या सहा देशांच्या समितीच्या त्या अध्यक्षा. रेगन यांनी सैन्य पाठविल्याची घोषणा केली तेव्हा त्या अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या शेजारी उभ्या होत्या. परंतु ग्रेनेडा हा डोमिनिकाचा भाग नाही, त्याच्यापासून क्युबा जितके जवळ आहे, त्यापेक्षा दसपट दूर ग्रेनेडा असताना एका लहानशा बेटावर अमेरिकेने सैन्य उतरवावे असे सांगणारे हे देश म्हणजे अमेरिकेचे नुसते चमचे आहेत, इतकेच सिद्ध होते.

या सर्व लहान देशांवर ग्रेनेडामुळे नजिकच्या काळात काही संकट कोसळण्याची शक्यता होती काय याचा विचार येथे प्रस्तुत ठरतो. खुद्द अमेरिकेतील व ब्रिटनमधील वृत्तपत्रांनी आपले प्रतिनिधी पाठवून त्याची तपासणी केली. आणि ते या निष्कर्षास आले आहेत की, असे काहीही घडण्याची शक्यता नव्हती. मॉरिश बिशपची हत्या करून नव्याने सत्तेवर आलेला लष्करी नेता या जवळच्या सर्व बेटांवर आक्रमण करणार होता असे काहीही नव्हते. याउलट केवळ क्युबाला धडा शिकविण्यासाठी व अमेरिके-तील आपली पोलादी प्रतिमा उंचावण्यासाठी रेगन यांनी ग्रेनेडावर लष्करी आक्रमण केले, असा कौल अमेरिकन व ब्रिटिश वृत्तपत्रांनी दिला आहे. एक लाख वस्तीचे बेट घेण्यासाठी पाच हजार सैनिक उतरवले, आपले बडे नौदल तेथे नेले, आणि जणू काही भीम पराक्रम केला अशा थाटात रेगन यांनी भाषणे केली.

ग्रेनेडातील राजकीय परिस्थिती नेमकी कशी होती हेही समजून घेण्या-जोगे आहे. ग्रेनेडा ही ब्रिटिशांची वसाहत. ७ फेब्रुवारी १९७४ रोजी म्हणजे फक्त नऊ वर्षांपूर्वी हे इवलेसे बेट स्वतंत्र झाले. सेंट जॉर्ज ही ग्रेने-डाची राजधानी. इरिक गेरी हा स्वतंत्र ग्रेनेडाचा पहिला पंतप्रधान. १९७९ मध्ये मॉरिश बिशपने सर एरिक गेरीची सत्ता उलथविली. त्याचे कारणही तसेच घडले. ज्या हडसन् ऑस्टिनने दि. २० ऑक्टोबर १९८३ रोजी

बिशपला ठार मारले तोच ऑस्टिन हडसन् सर एरिक गेरीला सपविण्याच्या वेळी मॉरिसबरोबर होता. दि. २१ जानेवारी १९७४ रोजी मॉरिश बिशपच्या बापाला पतप्रधान एरिक गेरीने ठार मारले होते. येत्या जानेवारीस त्या घटनेला दहा वर्षे पूर्ण झाली असती. त्यामधून ही उलथापालथ झाली. पुढील वर्षी प्रचड सभेत मॉरिश बिशपचे आपल्या वडिलाच्या पुण्यस्मरणार्थ भाषण झाले असते, परतु ते व्हायचे नव्हते. लडनच्या 'ग्रेज् इन्' चा मॉरिश बिशप हा विद्यार्थी. ग्रेनेडा हा मूळ गुलामाचा देश. परतु त्यामधूनही पुढे आलेल्या मान्यवर कुटुबातील नेता. अतिशय लोकप्रिय असलेला, परतु शेवटी बड्याच्या राजकारणाचा तो बळी ठरला. कॅस्ट्रोच्या खाद्याला खादा लावून उभा राहणारा मॉरिश बिशप हा डाव्या विचारसरणीचा नेता अती डाव्यानी संपविला.

१९७९ मध्ये सत्ता सपादन केल्यावर मॉरिश बिशप, हडसन् ऑस्टिन् व बर्नार्ड कोर्ड या तीन प्रमुख नेत्यांनी 'न्यू ज्युवेल मुव्हमेंट'ची स्थापना केली. 'ज्युवेल' हा शब्द त्यानी ठरविलेल्या उद्दिष्टाच्या आद्याक्षरातून निर्माण झालेला होता. जॉईट एन्डेव्हर, वेल्फेअर, एज्युकेशन, आणि लिबरेशन या शब्दाची आद्याक्षरे घेऊन हे 'ज्युवेल' निर्माण झाले.

१९८३ च्या सप्टेंबर महिन्यात या 'ज्युवेल' च्या कार्यकारिणीची बैठक झाली. सत्तास्पर्धा सर्वत्रच असते. मॉरिश बिशपने १९७९ ते १९८३ या चार वर्षांत निवडणुका घेतल्या नाहीत याबद्दल कार्यकारिणीत बिशपवर टीका झाली व त्याने बर्नार्ड कोर्डला सत्तेत वाटेकरी केले पाहिजे अशी सूचना पुढे आली. बर्नार्डला पक्षात दुसऱ्या क्रमाकाचे स्थान होते, परतु राजकीय सत्ता सर्व बिशपकडे होती. त्यात प्रत्येक वादात एका स्त्रीची महत्त्वाकाक्षा गुंतलेली असते तसे येथेही झाले. या बर्नार्ड कोर्डची पत्नी जास्त तडफदार असल्याने आपले पतिराज पंतप्रधान व्हावेत अशी तिलाही घाई झाली होती 'बर्नार्ड पति-पत्नीने आपला खून करण्याचाच बेत योजिला होता' असा आरोप या बैठकीत मॉरिश बिशपने केला. त्याचा परिणाम उभयताच्या भाडणात झाला तेथे असलेल्या रशियन वकिलातीनेही त्यात भाग घेतला असावा. कारण बिशपला त्याच्या पतप्रधान-निवासातच बर्नार्डने नजरकैद केले.

ही बातमी बाहेर पसरली व दुसऱ्या दिवशी लोक जमले. पतप्रधान-निवासासमोर स्त्री-पुरुषांची प्रचड गर्दी जमली व त्यानी बिशपची मुक्तता केली. लोकानी त्याला आपल्या खाद्यावर उचलले. हे दि. १९ ऑक्टोबर रोजी घडले. हडसन् ऑस्टिन्चे सैनिक सगिनी रोखून उभे असताना घडले. त्याचा दुसऱ्या दिवशी परिणाम इतकाच झाला की, हडसन्ने मॉरिश बिशपला गोळ्या घालून ठार केले. परराष्ट्रमत्री व्हाउटमन् त्या वेळी जिनिव्हाहून परत आला होता. वाटेत बॉर्बोडॉसला तो थाबला होता. 'त ग्रेनेडात जाऊ नकोस ', असा सल्ला त्या देशाच्या पतप्रधानाने त्याला दिला. परतु त्याने तो ऐकला नाही मॉरिश बिशपला पाठिंबा देण्यासाठी तो ग्रेनेडात आला व त्या दिवशी बिशपबरोबर मारला गेला.

दि. २३ ऑक्टोबर, १९८३ च्या लंडन ' ऑब्झर्व्हर 'ने या सर्व घटनाचा खास वृत्तान्त दिला आहे. त्यात म्हटले आहे की, मॉरिश बिशपला मारल्यावर दुसऱ्या दिवशी हवानात शोक व्यक्त करण्यात आला, तर मॉस्कोत आनदोत्सव साजरा करण्यात आला. हवानातील मुख्य दैनिकाने काळ्या चौकटीत हे वृत्त दिले तर मॉस्कोने त्यास महत्त्व दिले नाही. ' स्टॅलिनिस्ट पर्ज ' असे वर्णन या घटनेचे क्युबात व ग्रेनेडात केले गेले.

या सर्व घटना विचारात घेतल्या तर मॉरिश बिशपला अमेरिकेने पाठिंबा द्यायला हवा होता. निदान स्टॅलिनिस्ट कडवा कम्युनिस्ट तेथे नाही याचे समाधान मानावयास हवे होते. बिशप मॉरिश स्वत'हून अमेरिकेला गेला होता. तेथील अधिकाऱ्याशी बोलणी केली होती. अमेरिकेचे ६०० विद्यार्थी ग्रेनेडातील मेडिकल कॉलेजात सुखाने शिकत होते. अमेरिकेत मेडिकल शिक्षण अतिशय महाग असल्याने हे ६०० विद्यार्थी ग्रेनेडाच्या मेडिकल कॉलेजात आले होते. आनदात राहात होते व त्याना कसलाही त्रास नव्हता ज्या वेळी अमेरिकन सैनिकानी ग्रेनेडात गोळी-बार सुरू केला तेव्हा या अमेरिकन विद्यार्थ्यानाही स्वत चे जीव वाचविण्या-साठी पळावे लागले. अमेरिकेची नेहमीची पद्धती अशी की, सैन्य घेऊन जाताना ते सदैव वार्ताहराना व दूरदर्शनच्या छायाचित्रकाराना घेऊन जातात या वेळी रेगन महाशयानी त्याना जाऊ दिले नाही. त्याचीही प्रति-क्रिया झाली. अमेरिकेतील पत्रकाराच्या सघटनेने रेगन यांचा निषेध केला

आहे. नंतर गेलेल्या अमेरिकन पत्रकारांना या अमेरिकन विद्यार्थ्यांनी सांगितले, "अहो, आमचे शिक्षण नीट चालले होते. तुम्ही कशाला आलात आम्ही अभ्यासक्रमाची फी भरली आहे. ती कोण परत देणार ?"

या अमेरिकन विद्यार्थ्यांची 'सुटका' करण्याची 'महान' कामगिरी रेगन यांनी केली व ते विद्यार्थी आता अमेरिकेत परत गेले आहेत. शेकडो अमेरिकन पर्यटक ग्रेनेडात समुद्रकिनाऱ्यासाठी येत होते. त्यांना मॉरिस बिशपने अटकाव तर केला नव्हताच, परंतु आपल्या देशाचा आर्थिक विकास होण्यासाठी त्यांना येऊ द्यावे अशी त्याची भूमिका होती. पर्यटका-साठीच मोठ्या धावपट्टीचा विमानतळ बांधण्याचे काम त्याने हाती घेतले होते. अशा बिशपला मदत करण्याऐवजी त्याच्याविरुद्ध प्रचाराचे मोहोळ उठविले. रशियन विमाने उतरविण्यासाठीच हा विमानतळ बांधण्यात येत होता असा प्रचार अमेरिकेने केला. जो आपली तळी उचलत नाही, जो आपल्याला सलाम मारीत नाही तो कम्युनिस्ट ही अमेरिकेची परराष्ट्रनीती असून त्यांना ती नेहमीच भोवली आहे. गुलामाच्या मदतीने राष्ट्र उभार-णाऱ्यांची मालकशाही कधीच नष्ट होत नाही, त्याचा हा पुरावा आहे. अमेरिकेने उद्या क्युबाला मान्यता दिली व राजनैतिक संबंध प्रस्थापित केले तर वातावरण बदलून जाईल. चीनशी मैत्री करणाऱ्या अमेरिकेला छोटासा क्युबा शत्रू वाटतो, कारण तो शेजारी आहे. परंतु नव्या अण्वस्त्र युद्धात व क्षेपणास्त्रांच्या युद्धात शेजारपणाला महत्त्व उरलेले नाही. अमेरिका युरोपात क्षेपणास्त्रे रोवते म्हणूनच त्यांना ग्रेनेडासारख्या छोट्या बेटाचेही भय वाटते. खरे भय छोट्या राष्ट्रांना बड्या राष्ट्रांकडून असते त्याचा विचारही ते कधी करीत नाहीत.

पाच हजार अमेरिकन सैनिक दि २५ ऑक्टोबर १९८३ रोजी एक लाख वस्तीच्या ग्रेनेडात उतरले त्यांच्या विमानांनी वेड्यांच्या इस्पितळा-वरही बॉम्ब टाकले. त्यात बिछान्यावरून उठूही न शकणारे वेडे मरण पावले. आता रेगन महाशयांनी उरलेल्या वेड्यांना ब्लँकेटस् पाठविली आहेत. ब्रिटनची ही जुनी वसाहत म्हणून तेथे ब्रिटिश गव्हर्नर जनरल होता. त्याच्याच नेतृत्वाखाली तेथे नवे सरकार स्थापन केले. १०८ देशांनी ह्या अमेरिकन आक्रमणाचा युनोत निषेध केला त्या अमेरिकेचे अनेक सैनिक

२० डिसेंबरपर्यंत ग्रेनेडात होते ग्रेनेडाची सत्ता तेथील लोकांच्या हवाली केलेली नव्हती उद्या ती केली जाईल, पण अमेरिकन युद्धनौका समुद्रात घुटमळत राहतीलच 'इंडिपेन्डन्स' हे त्यांच्या युद्धनौकेचे नाव आहे या बोटीलाही फक्त अमेरिकेचे स्वातंत्र्य अभिप्रेत असावे. दुसऱ्याच्या स्वातंत्र्याची त्यांना पर्वा नाही. खोटी कारणे देऊन बड्या राष्ट्राला कोणत्याही देशात आक्रमण करता येते असे मान्य झाले तर छोट्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचे काय ?

या प्रश्नाचीच चर्चा मुख्यत्वे राष्ट्रकुल परिषदेत झाली. गोऱ्याच्या निसर्गसंपन्न भूमीत बड्या राष्ट्राच्या या हिंसेचीच चर्चा झाली कॅरिबियन राष्ट्रे व आफ्रिकेतील देश यांच्यात मतभेद झाले. अमेरिका आज जागतिक अर्थ संस्थानून अंग काढून घेत आहे. ती आपल्या मित्र राष्ट्रांना हवे तितके पैसे राष्ट्र पातळीवर देण्यास तयार आहे. ग्रेनेडाच्या स्वातंत्र्याचे रक्षण युनो करू शकली नाही व श्रीमती गांधी म्हणाल्या की, अमेरिका राष्ट्रकुलात नसल्यामुळे हा प्रश्न युनोच्या पातळीवरच सोडवावयास हवा. कॅरिबियन समुद्रातील सहा राष्ट्रांनी राष्ट्रकुल परिषदेत अमेरिकेची बाजू घेतली, त्यामुळे या परिषदेत अमेरिकेचा निषेधही झाला नाही 'सैन्य मागे घ्या' इतकेच आवाहन झाले. कोणतीच आंतरराष्ट्रीय संस्था बड्या राष्ट्रांना रोखू शकत नाही याचा अनुभव पुन्हा मिळाला. अमेरिकेचे ग्रेनेडातील सैन्य, रशियाचे अफगाणिस्तानातील सैन्य, हे मागे घेतले जात नाही ही जगाची समस्या आहे. आणि ती सोडविण्यास युनो असमर्थ ठरली आहे.

स्वातंत्र्य व शांतता यांची भेट अजून होत नाही. ती कशी होईल हा आजच्या जगापुढील मुख्य प्रश्न आहे इराणने अमेरिकन पोलिस अडकवून ठेवले, लेबनॉनमध्ये २०० सैनिक मारले गेले, म्हणून रेगन ग्रेनेडात सैन्य उतरवतात. या आक्रमणाच्या भांडवलावर राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक ते जिंकतील. परंतु ग्रेनेडात ते ज्याला सत्तेवर बसवतील तो टिकणार नाही. कारण 'पपेटस्' लोकांना आवडत नाहीत. काळ त्यांचा बळी घेतो.

फिडेल कॅस्ट्रो हयात आहे तोपर्यंत क्युबाचे स्वरूप बदलणार नाही तोपर्यंत रेगनही जगातील सहजीवनाचा विचार मांडणारा नेता तेथे आहे

तरच कॅरिबियन समुद्रातील वादळे शमतील, ते निळे डोंगर रक्तलांछित होणार नाहीत. 'जगा व दुसऱ्यानाही जगू द्या' हा विचार जोपर्यंत बडी राष्ट्रे स्वीकारीत नाहीत तोपर्यंत ही आक्रमणे थांबणार नाहीत. मॉरिस बिशप जेव्हा अमेरिकेत गेला होता, तेव्हा त्यास तावडतोब निवडणुका घेण्याचा आग्रह उच्चपदस्थ अमेरिकनांनी केला. हाच आग्रह ते पाकिस्तानला करीत नाहीत चीनला ते करू शकत नाहीत व छोट्या ग्रेनेडाला करतात कारण डॉलर्स ओतून तेथे आपली माणसे ते निवडून आणू शकतात. कम्युनिझमचा पोलादी पडदा जसा वितळू लागला आहे, त्याचप्रमाणे भांडवलशाहीची पकडही थोडी ढिली व्हावयास हवी. कोणत्याही *राष्ट्राची बड्या राष्ट्राचे पूर्ण अंकित होऊन* जगण्याची आज इच्छा नाही. सुरक्षित अंतरावर सारे राष्ट्र इच्छितात मग भारत असो की क्युबा. परंतु अमेरिका व रशियाला ते मान्य नाही त्यामधूनच निर्माण होणारे हे संघर्ष आहेत. म्हणून तटस्थ राष्ट्रांचे संघटन वाढावे असे मला वाटते त्याची शक्ती व सामर्थ्य जसे वाढेल तशी त्याची तटस्थता वाढेल. यांपैकी बहुसंख्य देशात लोकशाही नाही तो वारसा त्यांना द्यावयास हवा तसे घडत गेले तरच अमेरिका व रशिया यांचे भांडण तटस्थ राष्ट्राच्या अंगणातून बाहेर येईल. क्युबाचा दौरा करून तटस्थ राष्ट्राच्या परिषदेसाठी मी दिल्लीस उतरलो ती परिषद पाहिली व ग्रेनेडाच्या आक्रमणाने व्यापलेली राष्ट्रकुल परिषद तर दूरदर्शनवर सर्वांनीच पाहिली. या सर्वांचे सार एकच आहे समर्थ लोकशाहीचे संवर्धन व समाजवादी अर्थकारण यांची कास तटस्थ राष्ट्र इच्छिणाऱ्या देशांनी धरावयास हवी. तरच कॅस्ट्रोनंतरही क्युबा स्वतंत्र राष्ट्र राहू शकेल व ग्रेनेडातील अमेरिकन सैनिक परत जातील

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६९६
वा. क्र. २३२०९

REFBK-0024201

REFBK-0024201